पुणे, बुधवार, ९ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 131 • वर्ष ४ थे, अंक १३१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



'पीएमपी'च्या मुजोर चालकांना 'वेसण' P3




लखनौचा थरारक विजय १२

## हरियाणाच्या ठेकेदारावर राज्य सरकार मेहेरबान

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

# पंचवीस कोटींचा 'ई- रिक्षा घोटाळा'!



## रिक्षा महाराष्ट्रात; सर्व्हिस सेंटर हरियाणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील दिव्यागांना रोजगार मिळावा या उदात्त हेतूने राज्य शासनाने खरेदी केलेल्या 'ई-पिंक' रिक्षा दोन ते अडीच महिन्यांच्या कालावधीतच भंगारात काढण्याची दुर्दैवी वेळ दिव्यागांवर आली आहे, या रिक्षा मध्येच बंद पडत असल्याने हाताने अथवा पायाने दिव्यांग असलेल्या तरुणांना या रिक्षा ढकलत न्याव्या लागत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे त्यासाठी नेमलेल्या खासगी ठेकेदाराने चक्क सरकारलाच तब्बल पंचवीस कोटी रुपयांचा गंडा घातला आहे; त्यातच दिव्यागांनी त्यासाठी पिच्छा पुरविल्याने दिव्यांग आयुक्तालयच 'घायाळ' झाले आहे.

धक्क्कादायक बाब म्हणजे या रिक्षा खरेदी करण्यासाठी राज्य शासनाने चक्क हरियानाच्या ठेकेदाराची नेमणूक केली आहे; त्यातूनच या ठेकेदाराची आणि त्यांच्या कामगारांची मुजोरी वाढली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या रिक्षा दुरुस्त करण्यासाठी राज्यात एकही सर्व्हिस सेंटर उपलब्ध नाही, त्यामुळे रिक्षा दुरुस्ती करायची असेल तर थेट हरियानाला जा असा अजब सल्ला या दिव्यागांना दिला जात आहे.



> या 'ई-पिंक' रिक्षाची खरेदी दिव्यांग महामंडळाच्या मार्फत करण्यात आली आहे; त्यासंदर्भात संबधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याची योग्य ती तपासणी करण्यात येणार असून त्यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे, त्यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही."
> — **प्रविण पुरी,** आयुक्त, दिव्यांग आयुक्तालय, महाराष्ट्र

राज्यातील दिव्यागांची संख्या काही लाखांच्या आसपास आहे; त्यांना रोजगार मिळत नसल्याने ते हवालदिल झाले होते. त्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी या अपगांना 'ई-पिंक' रिक्षा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी राज्याच्या दिव्यांग आयुक्तालयाला अनुदान देण्यात आले असून त्यामाध्यमातून पुण्यासह राज्यात तब्बल सातशे रिक्षांचे दिव्यांग लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

वास्तविक या रिक्षाची किंमत दीड लाखांच्या आसपास असल्याचे जाणकारांचे मत आहे, हे वास्तव असतानाही दिव्यांग आयुक्तालयाने एका रिक्षासाठी तब्बल साडेचार लाख रुपये मोजले आहेत. या रिक्षाचा वितरण समारंभ मोठ्या थाटामाटात काही महिन्यापूर्वीच संपन्न झाला होता, त्यातून आपल्याला रोजगार मिळेल आणि रोजीरोटीच प्रश्न मार्गी लागेल असा बहुतांशी दिव्यांग बांधवांचा कयास होता. विशेष म्हणजे यातील अनेक दिव्यागांनी त्यासाठी आवश्यक असलेली अनामत रक्कम खासगी सावकाराकडून व्याजाने घेतलेली आहे.



> हातापायाने अपंग असलेल्या दिव्यागांच्या खरेदीत अशा प्रकारचा आर्थिक घोटाळा करणे ही निश्चितच खेदजनक बाब आहे, असा भ्रष्ट्राचार करणे म्हणजे मयताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचाच हा प्रकार आहे. या माध्यमातून सरकार दिव्यागांची चेष्टा करत असल्याचे स्पष्ट झाले आहे, त्यामुळे हा भ्रष्टाचार आवरा अन्यथा सरकारला धडा शिकवावाच लागेल."
> — **धर्मेंद्र सातव पाटील,** प्रदेशाध्यक्ष, दिव्यांग प्रहार क्रांती आंदोलन

### अशा आहेत दिव्यांग लाभार्थ्यांच्या समस्या

- चार्जिंग करुनही रिक्षा सुरु न होणे
- मानसिक, आर्थिक आणि शारीरीक त्रास
- मध्येच ब्रेक फेल होणे
- रिक्षांचा दर्जाच निकृष्ठ
- राज्यात एकही सर्व्हिस सेंटर नाही
- वाटपात ठेकेदाराचीच लुडबुड
- प्रखर दिवे नसल्याने रात्री प्रवास शक्य नाही



मात्र; अवघ्या दोन ते अडीच महिन्यांच्या कालावधीतच या दिव्यागांच्या आनंदावर विरजण पडले आहे, या रिक्षा मार्गावर मध्येच बंद पडत असल्याने पायाने अथवा हाताने अपंग असलेल्या दिव्यागांना या रिक्षा ढकलत न्याव्या लागत आहे. विशेष म्हणजे या रिक्षा दुरुस्तीसाठी कोणताही ठोस पर्याय उपलब्ध नसल्याने हे दिव्यांग हतबल झाले असून त्यांनी दिव्यांग आयुक्तालयाला धारेवर धरले आहे. त्यासंदर्भात दिव्यांग आणि संघटना सातत्याने पाठपुरावा करत असल्याने दिव्यांग आयुक्तालय अक्षरशः 'घायाळ' झाले आहे.

---


# धावपट्टी विस्तारीकरणाचे काम 'फास्टट्रॅक'वर

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे निर्देश; विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमानांची संख्या वाढावी आणि मोठ्या आकाराच्या विमानांना ये-जा करता यावी, यासाठी आवश्यक असणाऱ्या धावपट्टी विस्तारीकरणाला हिरवा कंदील मिळाल्यानंतर आता प्रत्यक्ष कामालाही वेग येणार आहे. कारण सदरील काम 'फास्टट्रॅक'वर करण्याचे निर्देश केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले. तसेच यात लोहगावकडे जाणाऱ्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला असून पुणे महापालिका हवाई दलाशी समन्वय साधून हा रस्ता करणार आहे.

काहीच दिवसांपूर्वी पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाला परवानगी मिळाली होती. त्यानंतर विस्तारीकरणासाठी आवश्यक असणारे भूसंपादन, लोहगावचा पर्यायी रस्ता करणे आणि इतर तांत्रिक बाबी याबाबत केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची सविस्तर बैठक बोलावून विविध निर्देश दिले. या बैठकीला विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, विमानतळाचे संचालक संतोष ढोके, हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारी, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांच्यासह इतर » पान ७ वर



> पुणे विमानतळाची तातडीची गरज लक्षात घेता विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार वेगाने होणे आवश्यक आहे. म्हणूनच बैठक घेऊन ही प्रक्रिया 'फास्टट्रॅक'ने करण्याचे निर्देश दिले आहेत. पुरंदर विमानतळाची प्रक्रिया सुरू झाली असली, तरी पुणे शहर आणि परिसराची तातडीची गरज लक्षात घेता, आंतरराष्ट्रीय उड्डाणे वाढणे हे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच ही सर्व प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विस्तारासाठीचे भूसंपादन राज्य सरकारकडून वेगाने केले जाणार आहे, मात्र त्यासाठीची पूर्व पूर्तताही वेळेत होणे गरजेचे आहे. म्हणूनच या बैठकीत सविस्तर आढावा घेत वेगवेगळे निर्देश दिले आहेत." — **मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय राज्यमंत्री


---

# पंढरीच्या वारीवर 'एआय'चे गारूड

## गर्दीचे व्यवस्थापन; प्रमाण, घनता येणार मोजता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र, भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी-भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते.



या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी चैत्र एकादशी दिवशी पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.

वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणा-या एआय तंत्रज्ञानाची चाचणी पंढरपूर येथील बसस्थानक येथून घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात » पान ७ वर

---

## पुण्यात भोंगळ कारभार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत म्हणजेच एससीईआरटीच्या 'पायाभूत चाचणी परीक्षा-दोन' ची प्रश्नपत्रिका युट्यूब वरून फुटल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित युट्युब चॅनल आणि युट्युब चालकाविरोधात पुणे पोलिसात गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. राज्यातील सर्व शाळांमधील इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा आणि पेट परीक्षा एससीईआरटीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसारच घेण्यात यावी, असा आदेश » पान ७ वर

---

सोमनाथ सुर्यवंशी हत्या प्रकरण

# न्यायालयाची राज्य सरकारला नोटीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** परभणी पोलिसांच्या मारहाणीत न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सुर्यवंशी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात राज्य सरकार विरोधात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर आज औरंगाबाद न्यायालयात सुनावणी होती. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी याचिकाकर्त्यांकडून न्यायालयात बाजू मांडली.



न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्यावर मॅजिस्ट्रेटने चौकशी केल्यानंतर पुढे काय करावे? याविषयी कायदा अपूर्ण आहे. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणात नियमावली तयार करावी, अशी मागणी ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयाकडे केली. सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणात एसआयटी नेमण्याची मागणीही त्यांनी केली.

ही एसआयटी कोर्टाने नेमावी आणि कोर्टाच्या अधिपत्याखाली ती चालावी. सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणात आरोपी हे राज्य सरकार आहे. त्यामुळे प्रकरणात आरोपी असलेले राज्य सरकार त्याच प्रकरणाचा तपास कसा करू शकतो? असा युक्तिवाद प्रकाश आंबेडकरांनी कोर्टात केला.

बदलापूर प्रकरण आणि परभणी प्रकरण एक सारखे आहे. बदलापूर प्रकरणी तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली सुरू आहे, याही प्रकरणात तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावा, अशी मागणी प्रकाश आंबेडकर यांनी कोर्टात केली. मध्यंतरी सीआयडीने सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेत चौकशी केली होती, त्याविषयी बोलताना ॲड. आंबेडकर म्हणाले की, पुढच्या सुनावणीच्या वेळी सीआयडीला आरोपी करू. हायकोर्टकडून राज्य सरकारसह संबंधित यंत्रणांना नोटीस जारी करण्यात आली आहे. २९ एप्रिल पूर्वी आपले म्हणणे सादर करायला सांगितले आहे.

---

## हर्षवर्धन पाटील पुन्हा 'निर्णय' घेणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर विरोधक काहीसे शांत झाले आहेत. त्यात विरोधी पक्षातल्या अनेकांनी सत्तेच्या वळचणीला जाण्याचा मार्ग स्वीकारला आहे. या सगळ्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची सगळ्यात जास्त चर्चा होत आहे. कारण ते वारंवार भाजप नेत्यांच्या भेटीसाठी घेत आहेत. मागील आठवड्यात » पान ७ वर

---

# घरकुलांसाठी ५ ब्रास वाळू मोफत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील काही निर्णयांबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार आता राज्यभरातील घरकुलांसाठी ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू मिळणार आहे. तसेच सिंधी समाजाला त्यांची घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने कायदेशीर करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. ते आज मुंबईत माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

राज्यातील घरकुलांना आपण पाच ब्रास मोफत वाळू देणार आहोत. प्रत्येक वाळूघाटात १० टक्के आरक्षण हे घरकुलांसाठी असेल. ज्या ठिकाणी पर्यावरण मंजुरी नाही, त्या ठिकाणी स्थानिक ग्रामपंचायती यांनीही पुढची कारवाई करायची आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले आहे. तसेच, नैसर्गिक वाळू देण्याचे धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणणार आहोत.. एम सँड म्हणजे कृत्रिम वाळू तयार करण्यात येईल. » पान ७ वर

---

# जयपूर बॉम्बस्फोटातील ४ दहशतवाद्यांना जन्मठेप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जयपूर :** साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी चार दहशतवाद्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जयपूरच्या विशेष न्यायालयाने मोहम्मद सैफ, मोहम्मद सरवर आझमी, सैफुर्रहमान आणि शाहबाज अहमद यांना दोषी ठरवले होते. यानंतर त्यांना मंगळवारी (८ एप्रिल) ही शिक्षा सुनावण्यात आली.

१३ मे २००८ रोजी जयपूर येथे एकापाठोपाठ एक असे आठ बॉम्बस्फोट झाले होते. एक बॉम्ब चांदपोल बाजारातील एका मंदिराजवळ सापडला होता. जो निकामी करण्यात आला. या साखळी बॉम्बस्फोटात ७१ जणांचा मृत्यू झाला होता.

### तीन आरोपी फरारच

- या प्रकरणात पोलिसांनी एकूण १३ जणांना आरोपी केले होते. यांतील तीन जण अद्यापही फरार आहेत. अन्य दोन जण हैदराबाद आणि दिल्लीतील कारागृहात आहेत. तर दोन जण दिल्लीतील बाटला हाऊस एन्काउंटरमध्ये मारले गेले होते.

जयपूर बॉम्बस्फोटाशी संबंधित प्रकरणांत चौघांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. यानंतर, राजस्थान उच्च न्यायालयाने मार्च २०२३ मध्ये सर्वांना निर्दोष सोडले होते. सरकारी वकिलांनी ११२ साक्षीदारांचे जबाब नोंदवले.

---

# महायुती सरकारमध्ये धुसफूस; राज्यमंत्री नामधारीच

राजकारण

**सर्व सहाही राज्यमंत्री हे केवळ नामधारीच असल्याचे समोर आले आहे. कॅबिनेट मंत्र्यांनी फारच तुटपुंजे अधिकार दिल्याने हे पद शोभेचे आणि नामधारी असल्याची भावना राज्यमंत्री व्यक्त करत आहेत.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** फडणवीस सरकारमधील सर्व सहाही राज्यमंत्री हे केवळ नामधारीच असल्याचे समोर आले आहे. कॅबिनेट मंत्र्यांनी फारच तुटपुंजे अधिकार दिल्याने हे पद शोभेचे आणि नामधारी असल्याची भावना राज्यमंत्री व्यक्त करत आहेत. ही नाराजी घेऊन सर्व राज्यमंत्री फडणवीस यांना भेटून अधिकार देण्याची मागणी करणार असल्याची माहिती आहे.

फडणवीस सरकारमध्ये आशिष जयस्वाल, योगेश कदम, पंकज भोयर, इंद्रनील नाईक, मेघना बोर्डीकर, माधुरी मिसाळ हे सहा राज्यमंत्री आहेत. या सहा मंत्र्यांकडे १२ खाती वगळता अन्य खात्यांची जबाबदारी आहे. मात्र या राज्यमंत्र्यांना केवळ ३ आणि ४ वर्गातील कर्मचा-यांबाबतचे अधिकार देण्यात आले आहेत. म्हणजे शिपाई, कारकून आणि अव्वल कारकून यांच्या बदल्या, पदोन्नती यांचे अधिकार आहेत. याशिवाय वर्ग दोनच्या अधिका-यांच्या विभागीय चौकशीचा अधिकार मिळाला आहे.





मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडताच राज्यमंत्र्यांचा सन्मान राखला जाईल असे अधिकार प्रदान करण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले होते. तुम्ही असे अधिकार दिले नाहीत तर मी स्वतःच राज्यमंत्र्यांना अधिकार देईन, अशी तंबीही दिली होती. यानुसार फडणवीस यांनी स्वतः योगेश कदम यांना काही अधिकार दिले. तर काही कॅबिनेट मंत्र्यांनी राज्यमंत्र्यांना कुठले अधिकार दिले याचे परिपत्रक काढले. पण कॅबिनेट मंत्र्यांनी दिलेले अधिकारही अगदी किरकोळ होते.



सहापैकी ३ भाजपचे, २ शिवसेनेचे आणि एक राष्ट्रवादीचे राज्यमंत्री आहेत. पण या पक्षांच्या कॅबिनेट मंत्र्यांनीही त्यांना अधिकार देताना हात आखडता घेतल्याचे चित्र आहे. त्यांच्याच पक्षाचे मंत्री मनाचा मोठेपणा दाखवायला तयार नाहीत. हीच नाराजी आता शिगेला पोहोचली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन अधिकार द्यावे यासाठी साकडे घालणार असल्याची माहिती आहे.



#रा

## प्रमोद जेजुरीकर यांना सर्वोच्च आंतरराष्ट्रीय पुरस्कार



**पुणे :** रोटरीचे माजी प्रांतपाल व शिक्षण तज्ञ, सिंबायोसिस संस्थेचे प्रथम पासून सदस्य प्रमोद जेजुरीकर यांचा त्यांच्या अमृत महोत्सव वर्ष निमित्त पुणे येथे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंबायोसिसचे संस्थापक डॉ.शां.ब.मुजुमदार होते. रोटरीच्या माध्यमातून प्रमोद जेजुरीकर यांनी सुरु केलेला इ लर्निंग हा प्रकल्प आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. सध्या भारतात ४०,००० पेक्षा जास्त गरजू शाळांमध्ये रोटरी ई लर्निंग ची सोय करण्यात आली असून आठ लाख मुलांना त्याचा फायदा झाला आहे. इंडिया लिटरसी मिशन या संस्थेचे ई लर्निंग समितीचे प्रमुख म्हणून त्यांची निवड झाली होती. भारतात व परदेशात प्रमोद जेजुरीकर यांना ई लर्निंग विषयावर सादरीकरणासाठी अनेकदा निमंत्रित करण्यात येते. सिंबायोसिस या आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थेचे ते संस्थापनेपासून सदस्य आहेत. प्रमोद जेजुरीकर यांच्या कार्याचा गौरव म्हणून Service Above Self हा रोटरीचा सर्वोच्च आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांना देण्यात आला आहे. कार्यक्रमास माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, सुप्रसिद्ध उद्योजक रवी पंडित, डॉ.रवींद्र कुलकर्णी, पुण्याचे माजी पोलीस आयुक्त जयंत उमराणीकर, महाराष्ट्र बँकेचे माजी अध्यक्ष डॉ.वसंतराव पटवर्धन, इत्यादी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस यांचा रविवारी सत्कार



**पुणे :** ज्योतिष परिषद, पुणेच्या वतीने ज्योतिष परिषदेचे संस्थापक सदस्य, डीआरडीओतील प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस यांचा अमृतमहोत्सवी सत्कार सोहळा रविवारी आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रम रविवार, दि. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता उद्यानप्रसाद मंगल कार्यालय, सदाशिव पेठ येथे होणार आहे. श्रीराम सबनीस हे ३८ वर्षे डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. त्या काळात आकाश, पृथ्वी, नाग, पिनाक या क्षेपणस्त्राच्या प्रज्वलन प्रणालित त्यांचा सहभाग होता.

ज्योतिष परिषद, पुणेचे अध्यक्ष, ख्यातनाम ज्योतिषी व. दा. भट यांनी लिहिलेल्या कुंडलीनी तंत्रमंत्र भाग १ व २ या पुस्तकाला ६० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त या वेळी कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ विचारवंत, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होत असून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह ॲड. प्रमोद आडकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती उमेश चाचर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## रविवारी गझल संमेलन



**पुणे :** रंगत-संगत प्रतिष्ठान आणि कमर प्रतिष्ठानतर्फे रविवारी एक दिवासीय मराठी गझल संमेलन, गझलविषयक परिसंवाद आणि गझलमित्र पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रम रविवार, दि. १३ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळात पत्रकार भवन, पहिला मजला, नवी पेठ येथे होणार आहे. प्रतिष्ठेच्या गझलमित्र पुरस्काराने गझलगंधर्व सुधाकर कदम यांचा गौरव केला जाणार असून पुरस्काराचे वितरण प्रसिद्ध कथाकार, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या होणार आहे, अशी माहिती रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. प्रज्ञा महाजन, मैथिली आडकर, वैशाली माळी संमेलनाचे संयोजन करीत आहेत.

सकाळी १० ते ११ या वेळात गझलमित्र पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. सकाळी ११:१५ ते १२:१५ या वेळात पहिले गझल संमेलन होणार असून यात कालिदास चवडेकर, शिवाजी सुतार, गिरीश जोशी, ईश्र्वर मते, डॉ. शिवाजी काळे, योगेश काळे, निलोफर फणीबंद, विशाल राजगुरू यांचा सहभाग असणार असून विशाल राजगुरू अध्यक्षस्थानी असणार आहेत तर संचालन डॉ. शिवाजी काळे करणार आहेत.

## 'एआय सर्वत्र' विषयावर व्याख्यान

**पुणे :** पुण्यातील उद्योग क्षेत्रातील समान विचारसरणी असलेल्या तंत्रज्ञांचा समूह असलेल्या 'टेक फोरम' यांच्या वतीने 'एआय सर्वत्र : कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा दृष्टिकोन' या विषयावर १०१ वे सदीप सादरीकरण,व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.'लाइफ पॅच एआय, पुणे'चे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौतम मोरे यांचे हे व्याख्यान शनिवार,दि. १२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता, फिरोदिया सभागृह, इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअर्स(शिवाजीनगर, पुणे )येथे होणार आहे.हा कार्यक्रम इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), पुणे लोकल सेंटर आणि 'टेक फोरम' यांचा संयुक्त उपक्रम आहे.

'टेक फोरम'चा प्रमुख उपक्रम असलेल्या 'इव्ही टेक्नॉलॉजी डे'चे सादरीकरण हेमंत पाध्ये करतील, तर सुरेंद्र अग्रवाल मेडिकल डिव्हायसेस ग्रुप विषयी माहिती देतील.याच कार्यक्रमात टेक फोरमच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटनदेखील करण्यात येणार आहे.इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअर्स ,पुणे लोकल सेंटर यांच्या सहकार्याने 'टेक फोरम' दर महिन्याला दोन तांत्रिक व्याख्याने,सादरीकरणे ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष स्वरूपात आयोजित करत असतो.ही माहिती टेक फोरमचे विलास रबडे यांनी दिली.

## 'सावज जाळयात'...!




**पुणे** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी टोळीला सायबर पोलिसांनी अटक केली. नगर रस्त्यावरील वाघोली परिसरातील एका बँकेचा संचालकासह तांत्रिक सहायक कर्मचारी या गुन्ह्यात सामील असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

## सायबर टोळीच्या मुसक्या आवळल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी टोळीला सायबर पोलिसांनी अटक केली. नगर रस्त्यावरील वाघोली परिसरातील एका बँकेचा संचालकासह तांत्रिक सहायक कर्मचारी या गुन्ह्यात सामील असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. आरोपींनी बँक खात्यांचा वापर फसवणुकीच्या गुन्ह्यासाठी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी सहाजणांना अटक करण्यात आली आहे.

गोविंद संजय सूर्यवंशी (वय २२, रा. वाघोली, नगर रस्ता, मूळ रा. हिंगोली), रोहित सुशील कंबोज (वय २३, रा. वाघोली, नगर रस्ता, मूळ रा. पंजाब), बाबाराव उर्फ ओंकार भवर (वय २२, रा. वाघोली, नगर रस्ता, मूळ रा. हिंगोली), जब्बरसिंह अर्जुनसिंह पुरोहित (वय ४५, रा. चऱ्होली, मूळ रा. धारावी, मुंबई), निखील उर्फ किशोर जगन्नाथ सावंत (वय ३२, रा. वाघोली, नगर रस्ता), केतन उमेश भिवरे (वय २७, रा. खराडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. न्यायालयने आरोपींना १२ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# परवान्यावर 'शिक्कामोर्तब'...!

### यंदाच्या आर्थिक वर्षात २३ हजार ६९८ पक्के वाहन परवाने वाढले

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. वाहन परवाना नसणे, ट्रिपल सीट वाहन चालविणे, उलट्या दिशेने वाहन चालविणे, सिग्नल जम्प करणे आदी नियमंभग होण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळेच अशा मुजोर वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पोलीसांची फौज रस्त्यावर उतरली असून गेल्या एक ते दीड वर्षांच्या कालखंडात पोलीसांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल जमा केला आहे, ही बाब लक्षात घेऊन कारवाई टाळण्यासाठी वाहनचालकांनी आता पक्क्या परवान्यासह वाहनांच्या कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु केली आहे. ही निश्चितच समाधानाची बाब आहे, त्यामुळे अपघातांच्या संख्याही कमी होणार आहेत.

> नवीन वाहन घेणाऱ्यांची संख्या जास्त असल्याने वाहन परवान्यांमध्ये वाढ होत आहे. वाहनचालक परवाने काढत असल्याची बाब चांगली असून, ज्या वाहनचालकांनी अद्याप परवाने काढलेले नाहीत, त्यांनी परवाने काढून घ्यावेत. शिकाऊ परवान्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
> **-स्वप्नील भोसले,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदाच्या आर्थिक वर्षात २३ हजार ६९८ पक्के वाहन परवाने वाढले असून, एकूण एक लाख ५६ हजार पक्के परवानाधारक झाले आहेत. शिकाऊ वाहन परवानेदेखील गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा २९ हजार ४३० अधिक दिले आहेत. शिकाऊ परवान्यांमध्ये सर्वाधिक वाढ झाली असून, यंदा एकूण तीन लाख ७ हजार ३३४ परवानाधारक असल्याची माहिती 'आरटीओ'कडून देण्यात आली.

पुणे शहरात शिकाऊ आणि पक्क्या वाहन परवान्यांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा २९ हजारांहून अधिक शिकाऊ, तर साडेतेवीस हजारांहून अधिक पक्के वाहन परवाने वाढल्याचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.दुचाकी किंवा चारचाकी वाहनचालकांसाठी शहरात 'आरटीओ'चा संगमवाडी येथे शिकाऊ चाचणी विभाग आहे, तर पक्क्या परवान्याच्या चाचणीसाठी आळंदी रस्ता येथील कार्यालयात आणि चारचाकीसाठी भोसरी येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च' (आयडीटीआर) येथील चाचणी केंद्रात जावे लागते.

आंतरराष्ट्रीय परवाने काढण्याच्या संख्येत फारशी वाढ झाली नसून, गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत केवळ ५६ परवानाधारक वाढले आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात पाच हजार २१० आंतरराष्ट्रीय परवाने होते. त्यात ५६ नी वाढ होऊन यंदा पाच हजार २६६ परवानाधारक झाले आहेत.

## काँग्रेस देणार नवीन चेहऱ्याला संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शहर जिल्हा काँग्रेस समितीची आढावा बैठक सतेज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आजी-माजी आमदार, खासदार, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. यानिमित्ताने काँग्रेस भवनात त्यांच्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, अजित दरेकर, अविनाश बागवे यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

सत्तेसाठी जे कोणी काँग्रेस सोडत आहेत, त्यांच्यासंदर्भात काही करू शकत नाही. मात्र, जे पक्षात आहेत तेच काँग्रेसचे शिलेदार आहेत. पक्षासाठी वेळ देणाऱ्या नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचे धोरण आहे. त्यानुसार येत्या काही दिवसांत संघटनेत फेरबदल होतील,' असे माजी गृहराज्यमंत्री, पुण्याचे निरीक्षक सतेज उर्फ बंटी पाटील यांनी येथे सांगितले.

'राज्याच्या दृष्टीने पुणे महत्त्वाचे शहर आहे. त्यामुळे पक्ष म्हणून काय करता येईल, यासंदर्भात पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेसने शहराचे नेतृत्व केले होते. काँग्रेसचे दायित्व जनतेशी आहे. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आघाडी उघडण्यात येईल,' असे पाटील यांनी सांगितले.

ते म्हणाले की, महापालिका निवडणुका कधी होतील, याबाबत संदिग्धता आहे. गेल्या काही वर्षांपासून महापालिकेत प्रशासकराज आहे. नागरिकांच्या प्रश्नांना कोणी वाली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढायच्या की महाविकास आघाडी म्हणून याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. मात्र निवडणुकीच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणी करून महापालिकेतील गैरव्यवहार पुढे आणले जातील. सशक्त लोकशाहीसाठी विधानसभेचा विरोधी पक्षनेता निवडण्याचा निर्णय घेणे आवश्यक आहे. मात्र आम्ही नाव देऊनही त्याकडे महायुतीकडून दुर्लक्ष केले जात आहे, असा आरोपही पाटील यांनी केला.

## अन् लोहगावची मराठी शाळा झाली चकाचक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोहगाव मधील शाळा क्रमांक एक व शाळा क्रमांक दोन ह्या शाळा जिल्हा परिषद शाळेमध्ये असताना शाळेची ना दुरावस्था होती, शाळेचा खिडक्या शाळेचे दरवाजे तसेच खेळणी साहित्य नादुरुस्त अवस्थेत असून, शाळेच्या इमारतीचा रंगही उदास झालेला होता, तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शाळेमध्ये येण्याचा कल कमी असून,अजूनही भरपूर समस्या असल्यामुळे शाळेची अवस्था खराबच होती.

काही दिवसांपूर्वी पुणे महानगरपालिका शेजारील ग्रामपंचायत ह्या पुणे महानगरपालिके अंतर्गत वर्ग झाल्या, त्यामध्ये शाळा ही वर्ग झाल्या. शाळांच्या अवस्था बघून थिंकशार्प फाउंडेशन यांच्या मदतीने शाळांची पाहणी करून घेतली. कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी या अंतर्गत या शाळेचे रंगरूप बदलण्याचा निर्णय घेतला, एस.एल. बी. इंडिया कंपनीला प्रस्ताव दिल्यानंतर कंपनीनेही सकारात्मक निर्णय देऊन शाळेच्या कामकाजाला सुरुवात केली.

इमारती मध्ये छोट्या-मोठ्या सर्व दुरुस्त्या विद्यार्थ्यांकडून करून घेतल्या त्यामळे प्रत्येक क्लासरूमचे नुतनीकरण केल्याचे दिसत होते.




**पुणे** थिंकशार्प फाउंडेशनच्या मदतीने शाळेचे रुप पलटले आहे. कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी या अंतर्गत या शाळेचे रंगरूप बदलण्याचा निर्णय घेतला. सोबतच्या छायाचित्रातील टीमने यासाठी परिश्रम घेतले.

## जितोच्या वतीने भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) पुणे चॅप्टरच्या वतीने विश्व नवकार महामंत्र दिवसाच्या पार्श्वभूमीवर आज (दि. ८) पुणे शहरात भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस सर्वधर्मीय नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शहराच्या विविध भागांतून एकाच वेळी निघालेल्या या रॅलीत हजारो नागरिक सहभागी झाले होते. नवकार महामंत्र सामूहिक जप सोहळ्याबाबत जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

९ एप्रिल रोजी सकाळी ७:०२ ते ९:३६ या वेळेत एस. पी. कॉलेज ग्राउंड, टिळक रोड, पुणे येथे नवकार महामंत्राचा सामूहिक जप करण्यात येणार आहे. भारतासह १०८ देशांतील नागरिक या दिवशी एकत्रितपणे नवकार महामंत्र पठण करीत विश्वशांती व विश्वकल्याणासाठी प्रार्थना करणार आहेत.

दिल्ली येथे होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार असून, ते स्वतः नवकार महामंत्राचा जप करतील आणि नंतर देशवासियांना संबोधित करतील. पुण्यातील कार्यक्रमस्थळी पंतप्रधानांचे भाषण थेट प्रक्षेपणाद्वारे दाखविण्यात येणार आहे.

सदर उपक्रमाचे आयोजन जितो पुणेच्या वतीने करण्यात आले असून, अधिकाधिक नागरिकांनी या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जितोचे चेअरमन इंद्रकुमार छाजेड, चीफ सेक्रेटरी दिनेश ओसवाल, सेक्रेटरी लक्ष्मीकांत खाबिया आणि मीडिया कोऑर्डिनेटर अभिजित डुंगरवाल यांनी केले आहे.



## गीतेच्या संशोधनातून १६ पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**पुणे :** श्रीमद् भगवद्गीतेच्या व्यावहारिक आणि आध्यात्मिक पैलूंवर आधारित सखोल संशोधनातून निर्माण झालेल्या १६ पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रामसुख अप्लाईड श्रीमद् भगवद्गीता रिसर्च फाउंडेशन या संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य समारंभ रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता पुण्यातील स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉल येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक प्रल्हाद नारायणदास राठी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आलोक कुमार उपस्थित राहणार असून, विशेष अतिथी म्हणून गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच, सहप्रार्थी म्हणून प्रा. डॉ. मुकुंद दातार, संजय मुद्राळे, महेश पोहनेरकर, किरण शेलार, अजिंक्य कुलकर्णी, संजय भोसले, डॉ. सुनंदा राठी, डॉ. प्रज्ञा कुलकर्णी, संदीप संघवी, डॉ. आनंद मानधने, विश्वतेज पवार आणि मनोज पोचट हे उपस्थित राहतील.



## भारतरत्न पंडित रवी शंकर यांच्या जयंतीनिमित्त मैफल

**पुणे :** भारतरत्न पंडित रवी शंकर यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त श्रुती गुंजनतर्फे शनिवार दिनांक १२ एप्रिल रोजी 'सतार भास्कर पंडित रविशंकर' या अनोख्या सतार मैफलीचे आयोजन करण्यात आले असून मुंबईचे प्रख्यात सतारवादक पंडित चंद्रशेखर फणसे या मैफलीत सतारवादन करणार असून हा कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य खुला आहे.

पंडित चंद्रशेखर फणसे यांनी खैरागड विद्यापीठातून सतार विषयात एम.ए. ची पदवी प्राप्त केली असून "सिंगिंग सितार" साठी ते प्रसिद्ध आहेत. या मैफलीची संकल्पना पंडित चंद्रशेखर फणसे यांची असून या मैफलीत पंडित रविशंकर यांनी सृजन केलेले परमेश्वरी, तिलकश्याम, रफिया यासह विविध राग चंद्रशेखर फणसे सतारीवर सादर करणार आहेत. तसेच पंडितजींनी स्वरबद्ध केलेली हिंदी सिनेमातील सुप्रसिद्ध गाणी, पुण्याच्या प्रख्यात गायिका श्रुती करंदीकर सादर करणार आहेत. या वादक आणि गायक कलाकारांना तबल्यावर समीर सूर्यवंशी साथसंगत करणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जगप्रसिद्ध ध्रुपद गायक पंडित उदय भवाळकर उपस्थित राहणार आहेत.

## ग्रीन एक्स्पोचे आयोजन

**पुणे :** रोटरी इंटरनॅशनलने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रकल्प राबवण्यास कायमच प्रथम



प्राधान्य दिले आहे. या अनुषंगाने रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम आणि सिनर्जी क्लब्ज ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ ने गेल्या काही वर्षात कचरा व्यवस्थापन, पाणीबचत, जमिनीतील पाण्याची पातळी वाढवणे, नाला खोलीकरण, बंधारे, जलकुंड, ग्रीन सोसायटी प्रकल्प अशा स्वरूपाचे विविध प्रकल्प यशस्वीरित्या राबवले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम आणि सिनर्जी क्लब्ज ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ तर्फे दिनांक १२ आणि १३ एप्रिल रोजी गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट, पुणे येथे ग्रीन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य खुला आहे, अशी माहिती ग्रीन एक्स्पोचे आणि प्रकल्प संचालक केशव ताम्हनकर आणि रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमचे अध्यक्ष नीलेश धोपाडे यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमच्या स्वाती यादव, रोटरी क्लब ऑफ पुणे विझडमचे आनंद कुलकर्णी, रोटरी क्लब ऑफ पुणे विझडम माजी अध्यक्ष हेमंत पुराणिक आदी उपस्थित होते. या ग्रीन एक्सपोचे उद्घाटन शनिवार दिनांक १२ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता राज्याचे क्रीडा, युवक अल्पसंख्यांक विकासमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे.

# 'पीएमपी'च्या मुजोर चालकांना 'वेसण'

## थेट प्रशासनच करणार कारवाई; सीएमडींची ग्वाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बेशिस्त बसचालक आणि वाहकांवर कारवाई करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून, त्यायाबाबत सोमवारी परिपत्रक काढण्यात आले. त्यामुळे यापुढील कालावधीत बस चालविताना मुजोरपणा केल्यास चालकांना आता चांगलाच महागात पडणार असून त्यांना 'वेसण' घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

परिपत्रकात म्हटले आहे, "पीएमपीएमएल'च्या स्वत:च्या आणि कंत्राटी बसचालकांना बसमध्ये मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरता येणार नाहीत. भरधाव बस चालविणाऱ्या चालकांवर नियंत्रण ठेवण्याबाबत सूचना करण्यात आली आहे. गैरवर्तणूक आढळल्यास चालक आणि वाहकांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात नागरिकांनी 'पीएमपी'च्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ- मुंडे यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला होता. 'पीएमपी'च्या तक्रार केंद्रावर ऑनलाईन अर्ज केल्यानंतरही कारवाई होत नसल्याचे मांडण्यात आले होते.





बस वेगात चालविल्याने बसमधील प्रवाशांसह रस्त्यावरील नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणे चुकीचे आहे. त्यामुळे शिस्त लावण्यासाठी कारवाईचा बडगा उगारणे महत्त्वाचे आहे.

**-दीपा मुधोळ - मुंडे,**
अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

### चालक-वाहकांसाठी या सूचना

- बस संचलन करताना मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा (हेडफोन) वापर करू नये
- मद्यपान किंवा धूम्रपान करू नये
- वाहतूक नियंत्रण दिवा (लाल) लागल्यास बस चिन्हांकित पट्ट्याच्या (झेब्रा क्रॉसिंग) मागे थांबवावी.
- मार्गिकेवरील बस थांब्यांवरच बस उभ्या कराव्यात
- मार्गिका शिस्तीचे पालन करावे
- बस भरधाव चालवू नये

### कंत्राटी बसचालकांना सूचना

- 'पीएमपी'कडे चार हजार ९२८ चालक आहेत. यापैकी दोन हजार ६८२ बसचालक पीएमपीचे, तर दोन हजार २४९ चालक हे कंत्राटी (ठेकेदार) आहेत. पीएमपी प्रशासनासह कंत्राटी चालकांनाही या सूचना लागू राहणार असल्याचे यावेळी 'पीएमपी'तील अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले.

## गिर्यारोहण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे : उमेश झिरपे

**पुणे :** केवळ भटकंती करणे म्हणजे पर्यटन, असा सर्वसामान्यांमध्ये गैरसमज निर्माण झालेला आहे. भटकंती कोणीही करू शकतो, परंतु गिर्यारोहणासाठी ठराविक प्रशिक्षण आणि त्याचा सराव असणे गरजेचे असते. गिर्यारोहण हे आयुष्य जगण्यासाठी सकारात्मक ऊर्जा देते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी गिर्यारोहण करणे गरजेचे असून, त्याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचली पाहिजे, असे मत ज्येष्ठ गिर्यारोहक तज्ज्ञ आणि 'गिरीप्रेमी' संस्थेचे प्रमुख उमेश झिरपे यांनी व्यक्त केले. सद्गुरु श्री जंगली महाराज मंदिर ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सद्गुरु श्री जंगली महाराज यांच्या १३५व्या पुण्यतिथी महोत्सवात उमेश झिरपे यांचे "एव्हरेस्ट आणि गिर्यारोहण" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र तांबेकर यांच्या हस्ते उमेश झिरपे यांचा सत्कार करण्यात आला.

उमेश झिरपे म्हणाले, एव्हरेस्ट सर करणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. परंतु प्रत्येक गिर्यारोहकाने एव्हरेस्ट सर केलेच पाहिजे, असे नाही. मात्र गिर्यारोहण करताना आयुष्यामध्ये जे सकारात्मक बदल आपल्याला अनुभवायला मिळतात.

# 'शहाणपण' पण उशीराच...!

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहरातील धर्मादाय आयुक्तालयाच्या अखत्यारीत खासगी रुग्णालयांचा चांगलाच अनागोंदी कारभार सुरु आहे, राज्य शासन आणि महापालिका प्रशासनाचे लाभार्थी असूनही या रुग्णालयांनी आतापर्यंत त्यांच्याच आदेशाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. धक्कादायक म्हणजे त्यासाठी मोठे 'घबाड' मिळत असल्याने महापालिकेचेच अधिकारी आणि कर्मचारी या खासगी रुग्णालय प्रशासनाला पाठीशी घालत होते. मात्र; दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झालेल्या प्रकाराने महापालिका प्रशासन वठणीवर आले असून त्यांना अनामत रक्कम न घेण्याचे उशीरा 'शहाणपण' सुचले आहे. मात्र; पालिका प्रशासनाचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता याचे केवळ 'कागदी घोडे' नाचविले जाऊ नयेत अशी माफक अपेक्षा सर्वसामान्य रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक बाळगून आहेत.

तातडीच्या उपचारांसाठी नातेवाईक त्यांच्या रुग्णांना घेऊन येतात, त्यावेळी त्यांच्याकडून अनामत रक्कम भरण्याची सक्ती करू नये. रुग्णावर तातडीने उपचार करण्यास प्राधान्य देण्यात यावे.
**-डॉ. नीना बोराडे,** आरोग्य प्रमुख, पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेने शहरातील सर्व खासगी रुग्णालयांना रुग्णांवरील तातडीच्या उपचारांसंदर्भात नोटीस पाठविली आहे. तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रूग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून अनामत रक्कम घेऊ नये.




रुग्णावर पहिल्यांदा उपचार करण्यास प्राधान्य द्यावे, असे महापालिकेने रुग्णालयांना पाठविलेल्या नोटीसमध्ये नमूद केले आहे. महापालिकेच्या या भूमिकेमुळे तातडीच्या उपचारांसाठी रुग्णालयात दाखल होणारे रूग्ण व त्यांच्या नातेवाइकांना चांगलाच दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये तातडीचे उपचार न केल्याने तनिषा भिसे या गरोदर मातेच्या मृत्यूची घटना नुकतीच घडली. पैशांच्या मागणीवरून रुग्णाचा जीव गेल्याच्या या घटनेनंतर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी रुग्णालयाच्याविरुद्ध तीव्र आंदोलने केली.

दरम्यान, रुग्णालयाने या प्रकरणाची दखल घेत तातडीच्या उपचारांसाठी दाखल झालेल्या रुग्णांकडून अनामत रक्कम न घेण्याची भूमिका जाहीर केली. त्यानंतर पुणे महापालिकेला अखेर जाग आली आणि महापालिकेने शहरातील सर्व खासगी रुग्णालयांना नोटीस बजावली आहे.

तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना ताटकळत ठेवून रुग्णालये अनामत रक्कम भरण्यासाठी रुग्णाच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार करतात. उपचार वेळेत न मिळाल्यामुळे रुग्णांना आपला जीव गमावण्याची वेळ येते. तनिषा भिसे यांच्या मृत्यूच्या घटनेनंतर या प्रकरणातील गांभीर्य अधिक स्पष्ट झाले.

पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील खासगी हॉस्पिटल्स, नर्सिंग होम्स, रुग्णालये यांना संबंधित नोटीस बजावण्यात आली आहे. सर्व शुश्रुषागृहांनी रुग्णांच्या आर्थिक क्षमतेचा विचार न करता गंभीर रुग्णांना प्राधान्याने मूलभूत जीवित रक्षणाच्या सेवा द्यावी व जीवित रक्षणासाठीच्या सुवर्णकालिन उपचार पध्दतीचे, निकषांचे पालन केले जाईल, असेही नोटीसमध्ये नमूद केले आहे. आरोग्य विभागाकडून ८९ रुग्णालयावर कारवाई

राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने दिलेल्या आदेशानुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील रुग्णालयांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार शहरातील ८६० रुग्णालयांची तपासणी करण्यात आली. या तपासणीस दर्जेदार सेवा, रुग्णांना सेवा मिळण्यास काही अडचणी आहेत का या पाहणीसह रुग्ण हक्क संहिता, दरपत्रक लावणे, टोल फ्री क्रमांक लावले आहे का याची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ८९ रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत, संबंधित रुग्णालयांना महापालिकेच्या आरोग्य विभागाने नोटीस बजावली आहे.

### टोल फ्री वर करा संपर्क

- रुग्णालयांनी अनामत रक्कम भरण्याची सक्ती केल्यास किंवा वैद्यकीय नियमांचे पालन ने केल्यास या १८००२३३२१५१ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार करण्याचे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

# ऑनलाईन सट्टेबाजांच्या मुसक्या आवळल्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अश्वशर्यतीवर ऑनलाइन सट्टा घेणाऱ्या चौघांना वानवडी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून सट्टेबाजीसाटी वापरलेले मोबाइल संच, तसेच 'रेसिंग बुक' असा ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मेहमूद इब्राहिम शेख, फैज मेहमूद शेख (वय २९, दोघे रा. फातिमानगर, वानवडी), चाँद शमशुद्दीन शेख (वय २९, रा. वानवडी), अकबर अन्वर खान (वय ४६, रा. लष्कर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी सोमनाथ कांबळे यांनी याबाबत वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मुंबईतील रेसकोर्सवर सुरू असलेल्या अश्वशर्यतींवर मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन सट्टेबाजी सुरू असल्याची माहिती पोलीस कर्मचारी कांबळे यांना मिळाली.

त्यानंतर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यजीत आदमाने, उपनिरीक्षक धनाजी टोणे आणि पथकाने फातिमानगर भागातील एका सदनिकेत छापा टाकला. तेव्हा सदनिकेत फैज, चाँद, अकबर हे मोबाइलवर ऑनलाइन सट्टा घेत असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. तेव्हा फैज याने वडील मेहमूद सट्टेबाजीचा व्यवहार सांभाळत असल्याची माहिती दिली. सदनिकेतून फैज, मेहमुद, चाँद, अकबर यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून सट्टेबाजीसाठी वापरलेले मोबाइल संच, तसेच रेसिंग बुक जप्त करण्यात आले.

# शास्त्रीय सूर संगीतातून रंगली मैफल

## श्री जंगली महाराज पुण्यतिथी महोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुस्वर स्वर, शास्त्रीय संगीतातील विविध रागांमधील बंदिशींचे चपखल सादरीकरण आणि रसिकांची मनमुराद दाद, अशा भारावलेल्या वातावरणात ज्येष्ठ शास्त्रीय गायिका विदुषी कलापिनी कोमकली यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम पार पडला.

सद्गुरु जंगली महाराज देवस्थान ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सद्गुरु श्री जंगली महाराज यांच्या १३५ व्या पुण्यतिथी महोत्सवात विदुषी कलापिनी कोमकली यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम झाला. यामध्ये त्यांनी शास्त्रीय संगीत व भजन सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

प्रशांत पांडव (तबला), स्वानंद कुलकर्णी (संवादिनी), आणि राजगोपाल गोसावी (पखवाज) यांनी कलापिनी कोमकली यांना सुमधुर साथ संगत केली. ट्रस्टचे राजेंद्र तांबेकर यांच्या हस्ते कलापिनी कोमकली यांचे स्वागत करण्यात आले. विदुषी कलापिनी कोमकली यांनी त्यांच्या वडिलांनी आणि गुरूंनी पंडित कुमार गंधर्व यांनी रचलेल्या 'देवो दान मोहे' या राग कल्याणमधील बंदिशीने मैफिलीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी बडा खयाल आणि धृत रचनांनी मैफल रंगवत नेली. रसिकांनी त्यांच्या गायनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



पुणे सद्गुरु जंगली महाराज देवस्थान ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सद्गुरु श्री जंगली महाराज यांच्या १३५ व्या पुण्यतिथी महोत्सवात शास्त्रीय गायन करताना विदुषी कलापिनी कोमकली

# श्रीरामराज्याभिषेक सोहळा तुळशीबाग श्रीराम मंदिरात उत्साहात साजरा

## श्री रामजी संस्थान तुळशीबाग तर्फे आयोजन ; श्रीरामनवमी उत्सवाचे यंदा २६४ वे वर्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम... श्रीराम जय राम जय जय राम च्या अखंड गजरात प्रभू श्रीरामांच्या गाभा-यातील मूर्तीपासून पाऊले उमटलेली शुभ्रवस्त्रे तुळशीबाग श्रीराम मंदिराच्या सभामंडपात आली. पुणेकरांनी त्यावर फुलांची उधळण करीत श्रीरामराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा केला. संपूर्ण भारतात पायघड्यांचा



हा सोहळा पुण्यातील तुळशीबागेतील श्रीराम मंदिरात साजरा होतो.

श्री रामजी संस्थान तुळशीबाग च्यावतीने तुळशीबाग येथील श्रीराम मंदिरात लळीत पायघडीचे कीर्तन व श्रीराम राज्याभिषेकाच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले, विश्वस्त डॉ. रामचंद्र तुळशीबागवाले, कोटेश्वर तुळशीबागवाले, रामदास तुळशीबागवाले, श्रीपाद तुळशीबागवाले, राघवेंद्र तुळशीबागवाले यांसह तुळशीबागवाले परिवार उपस्थित होता. पुणे प्रांताचे



सरसुभेदार श्रीमंत नारो अप्पाजी तुळशीबागवाले यांनी सन १७६१ साली स्थापन केलेल्या देखण्या मंदिरामध्ये यंदाचे श्रीरामनवमी उत्सवाचे अखंडीत २६४ वे वर्ष साजरे होत आहे.

लळीत पायघडीचे कीर्तन सुरु असताना राज्याभिषेक सोहळा अनुभविण्यासोबतच रत्नजडित सिंहासन वरी शोभे रघुनंदन... ही पदे देखील तुळशीबागवाले कुटुंबियांकडून म्हणण्यात आली. कुटुंबातील सदस्य व संस्थानचे कार्यकारी विश्वस्त भरत तुळशीबागवाले यांच्या हस्ते श्रीराम राज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उत्सवकाळातील मानक-यांचा सन्मान देखील करण्यात आला. कीर्तनकार ह.भ.प. दर्शन बुवा वझे यांचे कीर्तनही झाले.

श्रीरामजन्मानंतर पायघड्यांचा हा सोहळा फक्त तुळशीबागेतील राम मंदिरात साजरा केला जातो. नविन पांढऱ्या शुभ्र वस्त्रावर श्रीरामांच्या पावलांचे ठसे उमटविले जातात आणि हे वस्त्र गाभाऱ्यापासून सभामंडपापर्यंत आणले जाते. यावेळी लळीत पायघड्यांचे कीर्तन करण्यात येते. त्यानंतर श्रीरामांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न होतो.

**—भरत तुळशीबागवाले,**
कार्यकारी विश्वस्त, श्री रामजी संस्थान तुळशीबाग




## महिलांची फसवणूक, बबली अटकेत

**पुणे :** महिलांची दिशाभूल करुन त्यांची आर्थिक फसवणूक करत असलेल्या 'बबली' ला पोलीसांनी अटक केली आहे; तिच्याशी अन्य महिलांनी कोणताही आर्थिक व्यवहार करु नये आणि ज्यांची फसवणूक झाली असेल त्यांनी संपर्क साधावा असे आवाहन पोलीसांनी केले आहे. श्यामल संतोष मोरे उर्फ रुपा भोसले (रा. स्वामिनी रेसिडन्सी सिंहगड रोड) ह्या महिलेला अनेक महिलांची आर्थिक फसवणूक केल्याच्या गुन्ह्यात अटक केली आहे. सदर महिला अनेक ग्रुपमध्ये जाऊन महिलांसोबत मैत्री करून जवळीक वाढवते. साड्यांचा व दागिन्यांचा व्यवसाय करते त्यात तिला खूप नफा मिळतो असे सांगते. कुमठेकर रोडवर तिचे दुकान आहे व त्याचे पंचवीस हजार भाडे येते असे सांगते. महिला मदत करत आहेत हे लक्षात आल्यावर तिने अनेक महिलांकडून लाखोने पैसे घेतले. मोरे हिला कमी कालावधीत ग्लॅमरच्या दुनियेत प्रसिद्ध होण्याची इतकी चटक लागली की तिने मैत्री करून अनेक महिलांची लाखोंची फसवणूक करून त्यांना मानसिक त्रास देऊन स्वतः मात्र बिनधास्तपणे एन्जॉय करत होती.



## बोअरवेल भूजलपातळी मॉनिटरिंग प्रशिक्षण

**पुणे :** केंद्र सरकार अनुदानित भूजल ॲप हे कृषी मंत्रालयाने नावीन्यपूर्ण संशोधन म्हणून मान्य केलेले पेटन्टेड मोबाईल ॲप आहे. या भूजल ॲपची वैशिष्ट्य म्हणजे याद्वारे घरबसल्या बोअरवेलमधील पाण्याची पातळी अवघ्या एक मिनिटात मोजता येते. या ॲपच्या वापरासंदर्भात मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण १५ एप्रिलला आयोजिले आहे. प्रशिक्षणात भूजल ॲपच्या मदतीने बोअरवेल व्यवस्थापन, भूजल पातळी मॉनिटरिंग करण्याच्या अत्याधुनिक पद्धती, शाश्वत शेतीसाठी पाणीबचत आणि नियोजन, वीज आणि पाणी बचतीचे फायदे आदींबाबत मार्गदर्शन होणार आहे. शेतकऱ्यांसाठी भूजल ॲप वापरण्याचे फायदे म्हणजे याद्वारे बोअरवेलचे योग्य व्यवस्थापन होते, पाण्याच्या उपलब्धतेनुसार अधिक फायदेशीर शेती करता येते व उन्हाळ्यात पिकांचे नुकसान टाळता येते, जनावरांसाठी व आपत्कालीन वापरासाठी पाणी राखून ठेवता येते, वीज बचत व शाश्वत जलसंधारण ही उद्दिष्टे साधता येतात.



## कमर्शिअल लँडस्केप गार्डनिंग प्रशिक्षण शिबीर

**पुणे :** कंपन्या, शासकीय वा खासगी कार्यालये, गृहनिर्माण सोसायटी, शहरी उद्याने, चौक वा रस्त्यांवरील उद्यानांच्या सुशोभीकरणासाठी लँडस्केप डिझायनर्सची मागणी असून या व्यवसायातही खूप संधी आहेत. लँडस्केप डिझायनिंग कसे करतात, व्यवसायातील संधी, विद्यार्थी, महिला, बेरोजगारांसाठी करिअरला वाव, लँडस्केपिंगसाठी जागेची निवड इ.विषयी ऑनलाइन कार्यशाळा १५ एप्रिलपासून आयोजिली आहे. यात लँडस्केप डिझायनिंग क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. गृहिणी, नर्सरी मालक, कार्पोरेट क्षेत्रातील व कृषी क्षेत्रातील इच्छुक, अंतर्गत सजावट करणारे इंटिरियर डिझायनर, वास्तुरचनाकार आणि विविध व्यावसायिकांसाठी कार्यशाळा फायदेशीर आहे.



## ग्रेव्ही पेस्ट प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**पुणे :** बाजारपेठेची मागणी, सद्यःस्थितीची गरज पाहता रेडी टू कुक ओली ग्रेव्ही व पेस्ट यांची वाढती मागणी आहे. यातून नवीन उद्योग सुरू करण्याची संधी लक्षात घेता सहा महिने टिकतील अशा ग्रेव्ही व पेस्ट कसे तयार करावेत याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती देणारी कार्यशाळा १३ एप्रिलला आयोजिली आहे. यामध्ये टोमॅटो प्युरी, कांदा, हिरवी मिरची, पालक, आले-लसूण व चिंच या पेस्ट, इन्स्टंट कोल्हापुरी तांबडा-पांढरा रस्सा ग्रेव्ही, पंजाबी रेड, व्हाइट, हैदराबादी, महाराष्ट्रीयन, स्पेशल बिर्याणी, मिसळ, सावजी, चायनीज, फिश करी, सांबर, कोकणी, पाणीपुरी व भेळ ग्रेव्ही हे पदार्थ कृतीसह शिकवले जातील. या उत्पादनांना बाजारपेठेत असलेल्या संधी, प्रॉडक्ट मार्केटिंग, कॉस्टिंग, पॅकिंग, लेबलिंग, मशिनरी इ.विषयी मार्गदर्शन होणार आहे.

# महावितरणची कोटीच्या कोटी 'महाउड्डाणे'...!

## वार्षिक महसूलात ५ हजार १३७ कोटी ५५ लाख रुपयांनी वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पुणे परिमंडलाने छतावरील सौर प्रकल्पांना गती देत राज्यात सर्वाधिक ४७४ मेगावॅटची स्थापित क्षमता निर्माण केली आहे. गेल्या दोन वर्षांत महावितरणच्या पुणे परिमंडलामध्ये वीजबिलांचे अचूक बिलिंग, विविध उपाययोजनांनी वीजहानीमध्ये घट आणि विक्रमी ४ लाख ३४ हजार नवीन वीजजोडण्यांमुळे वार्षिक महसूलात ५ हजार १३७ कोटी ५५ लाख रुपयांनी वाढ झाली आहे. चालू वीजबिल वसूलीची वार्षिक कार्यक्षमता १०० टक्क्यांवर नेली आहे.

रास्तापेठ येथील 'प्रकाशदूत' सभागृहामध्ये पुणे परिमंडलाची वार्षिक आढावा बैठक नुकतीच झाली. तीत मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी ग्राहकसेवेसह विविध कामांचा मागील तीन आर्थिक वर्षांचा तुलनात्मक आढावा घेतला. यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री युवराज जरग, सिंहाजीराव गायकवाड, रवींद्र बुंदेले, संजीव नेहेते, अनिल घोगरे, सहायक महाव्यवस्थापक माधुरी राऊत (वित्त व लेखा) व शीतल निकम (प्रभारी, मानव संसाधन) यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या दोन वर्षांपासून पुणे परिमंडलामध्ये १०० टक्के अचूक बिलिंगचे लक्ष्य समोर ठेऊन विशेष प्रयत्न व उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. यामध्ये मुख्य अभियंता पवार यांच्याकडून मीटर रीडिंग एजन्सी आणि सर्व कार्यकारी अभियंता, लेखा अधिकाऱ्यांची द्वैमासिक संयुक्त आढावा बैठक घेण्यात येत आहे. त्यामुळे अचूक बिलिंगचे प्रमाण ०.७३ टक्क्यांनी वाढले आहे. तर सरासरी वीजबिलांच्या प्रमाणात ०.९३ टक्क्यांनी घट झाली आहे. यासोबतच पुणे परिमंडलामध्ये गेल्या दोन वर्षांत तब्बल ४ लाख ३४ हजार ८३६ विक्रमी नवीन वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत. सध्या सर्व वर्गवारीतील वीजग्राहकांची संख्या ३९ लाख १७ हजार ७०१ झाली असून राज्यात सर्वाधिक आहे. तसेच वीजबिल वसूलीची कार्यक्षमता वाढवून प्रामुख्याने घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील १२४ कोटींची थकबाकी सन २०२४-२५ अखेर ६९ कोटींवर आणली आहे. तर गेल्या दोन वर्षांत ६२ कोटी ४० लाख रुपयांच्या वीजचोरींचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

या सर्व कामगिरीची फलनिष्पत्ती म्हणजे गेल्या दोन वर्षांत वितरण हानीमध्ये ०.३६ टक्के, लघुदाब वीजहानीत ०.९६ टक्के तसेच तांत्रिक व वाणिज्यिक हानीमध्ये ०.३२ टक्के घट झाली आहे. सद्यस्थितीत पुणे परिमंडलाच्या तांत्रिक व वाणिज्यिक हानीचे प्रमाण ७.६९ टक्के आहे. परिणामी महावितरणच्या पुणे परिमंडलाचा वार्षिक महसूल २१ हजार २८० कोटी रुपयांवर गेला असून दोन वर्षांमध्ये त्यात तब्बल ५ हजार १३७ कोटी ५५ लाख रुपयांनी वाढ झाली आहे.

यासह पुणे परिमंडलाने सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये भरारी घेतली आहे. दोन वर्षांपूर्वी एकूण ९ हजार ९७७ ग्राहकांकडे छतावरील सौर प्रकल्पांची क्षमता २४९ मेगावॅट होती. यंदा मार्चअखेर २८ हजार ६०४ ग्राहकांकडे ही क्षमता राज्यात सर्वाधिक ४७४ मेगावॅट झाली आहे. राज्यात छतावरील सौर ऊर्जेच्या स्थापित क्षमतेत पुणे परिमंडलाचा सर्वाधिक १५ टक्के वाटा आहे, हे विशेष.



> महावितरणचा आर्थिक डोलारा वीजबिलांच्या वसूलीवरच आहे. 'दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवा', 'महसूलवाढ' आणि 'वीजबिलांची शून्य थकबाकी' या त्रिसूत्रीचे उद्दिष्ट घेऊन गेल्या दोन वर्षांत काम करण्यात आले. त्यास सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने पुणे परिमंडलाची ही आगेकूच झाली आहे. मात्र वीजक्षेत्रात काल केलेल्या कामगिरीवर आज तगू शकत नाही.
>
> **-राजेंद्र पवार,** मुख्य अभियंता, महावितरण, पुणे परिमंडल

## वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्युत जोडणी ही अत्यावश्यक सुविधा आहे. ग्राहकाचा विद्युत मीटर काढून नेण्यापूर्वी पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे, असे नमूद करत ग्राहकाचा विद्युत पुरवठा ४८ तासांच्या आत सुरळीत करण्याचा आदेश ग्राहक आयोगाने दिला.

अतिरिक्त पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अरुण गायकवाड, सदस्या प्रणाली सांवत व कांचन गंगाधरे यांनी हा निकाल दिला. या प्रकरणी योगेश रमेश देशमुख यांनी ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या वडिलांनी २००३ मध्ये घरगुती वापरासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीमार्फत वीज मीटर घेतला. फेब्रुवारी २०२४ मध्ये तक्रारदारांना कोणतीही पूर्वकल्पना अथवा नोटीस न देता त्यांचे मीटर काढून नेले. त्यास कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. अखेर, १३ ऑगस्ट २०२४ रोजी महावितरणमधून तक्रारदाराला फोन आला. यावेळी, कार्यालयात गेल्यानंतर त्यांनी १२ लाख तीन हजार ६९० रुपयांचे बिल देत ते तीन हप्त्यांमध्ये भरण्याची मुभा दिली. मात्र, तक्रारदारांना ही रक्कम मान्य नसल्याने त्यांनी ॲड. लक्ष्मण जाधव यांच्यामार्फत ग्राहक आयोगात धाव घेत तक्रार दाखल केली.

# रवींद्र धंगेकरांचा खळबळजनक आरोप



> रूग्णालयासाठी ज्यांनी जमिनी दिल्या, त्यांना तिथे प्रवेश सुद्धा दिला जात नाही. रूग्णालयाने महापालिकेचा करोडोंचा टॅक्स थकवला आहे. १०० ते १२५ कोटींचा दंड रूग्णालयाने भरला नाही. ही दादागिरी कुणाच्या जीवावर चालते आणि कुणामुळे चालते? पुण्यातील अनेक रूग्णालयांना अशा सवलती मिळत नाहीत. मग, दीनानाथ मंगेशकर रूग्णालयाला सवलती का?" मंगेशकर रूग्णालयातील युनिट जसे की सिटी स्कॅन आणि कॅन्सरच्या मशिनरींसाठी भाड्याने दिले आहे. यांच्याकडून रूग्णालय भाडे घेते. हे रूग्णालयाचे स्वतःचे युनिट नाही,"
>
> **-रवींद्र धंगेकर,** माजी आमदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तनिषा भिसे प्रकाराला भाजप आमदाराने वाचा फोडली. अन्यथा रूग्णालयात असे प्रकार सर्रास घडतात. हे उघडकीस येत नाहीत. रूग्ण गप्प निमूटपणे निघून जातात. संचालक मंडळात दादागिरी चालते. तिथे प्रशासक नेमले पाहिजेत. त्यामाध्यमातून रूग्णालयातील कारभार चांगला चालेल. रूग्णालयातील संचालक मालक म्हणून वावरतात. 'हा आमचा दवाखाना आहे. आम्ही येथील मालक आहोत. येथे येणारा नागरीक आमचा नोकर आहे,' अशी संचालकांची भूमिका असते," शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांना आपण देव मानतो. मात्र, दीनानाथ मंगेशकरमधील डॉक्टरांची कात्री ही गुन्हेगारांची आहे. खिसा कापायची कात्री आहे. मंगेशकर रूग्णालयात डॉक्टर राहिले नाहीत," असा हल्लाबोल माजी आमदार रवींद्र धंगेकरांनी केला आहे.

दीनानाथ मंगेशकर रूग्णालयात रूग्णाचे कपडे आणि त्यांच्या अंगावर असलेले दागदागिने पाहून प्रवेश दिला जातो. नाहीतर रूग्णालयात सुद्धा घेतले जात नाही, असा आरोप माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला आहे.भाजप आमदाराने तनिषा भिसेंच्या प्रकरणाला वाचा फोडली. अन्यथा रूग्णालयात सर्रास प्रकार घडतात, असा दावाही धंगेकर यांनी केला आहे.

रवींद्र धंगेकर म्हणाले, "मंगेशकर कुटुंबीयांचे देशासाठी योगदान आहे. या योगदानामुळे लोक सहानुभूतीने मंगेशकर कुटुंबीयांकडे पाहतात. पण, मंगेशकर कुटुंबीयांचे देशासाठीचे योगदान आणि रूग्णालय हे दोन्ही वेगळे विषय आहेत. मंगेशकर कुटुंबियांच्या नावामुळे आणि सर्वसामान्यांना उपचार मिळावेत म्हणून सरकारने रूग्णालयाला भाड्याने जमीन, सवलती दिल्या. पण, सर्वसामान्य रूग्णांना कधीही रूग्णालयात सुविधा मिळाल्या नाहीत. पंचतारांकीत हॉटेलपेक्षा रूग्णालयाची व्यवस्था चांगली आहे. रूग्णाचे कपडे आणि त्यांच्या अंगावर असलेले दागदागिने पाहून रूग्णालयात प्रवेश दिला जातो. अन्यथा रूग्णालयात सुद्धा घेतले जात नाही."

## मंगेशकर रुग्णालयाला दणका; मिळकतकर वसुलीसाठी नोटीस



**पुणे :** पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला. या घटनेनंतर हे रुग्णालय वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. अशामध्ये आता या रुग्णालयाला पुणे महानगर पालिकेने दणका दिला आहे. पालिकेकडून या रुग्णालयाला नोटीस पाठवण्यात आली आहे. मिळकतकर वसुलीसाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडे २०१४ पासूनची मिळकतकराची थकबाकी आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची २२ कोटी ६ लाख ७६ हजार रुपयेची थकबाकी देणे बाकी आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही थकबाकी भरणे आवश्यक आहे.

दोन दिवसांत २२ कोटीची थकबाकी न भरल्यास पुढील कारवाई करावी, असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कराधान नियम ४२ मध्ये तरतुदीनुसार रुग्णालयावर जप्तीचे कारवाई करण्याचे महापालिकाचे तोंडी आदेश देण्यात आले आहेत. पुणे महापालिका दीनानाथ रुग्णालय प्रकरणानंतर अलर्ट मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे.

## एकाच दिवसात दहा सराईतांची तडीपारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांवर ठोस कारवाई करुन गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी एकाचवेळी १० सराईत गुन्हेगारांना पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे जिल्ह्यातून २ वर्षांसाठी तडीपार केले आहे.२०२५ मधील पहिल्या तीन महिन्यात परिमंडळ ५ मधील ९ सराईत गुन्हेगारांवर एम पी डीए प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच ३ मोका कारवाईमध्ये २१ गुन्हेगार जेरबंद करण्यात आले आहे. फिरोज महंमद शेख (वय २९, रा. घोरपडे वस्ती, कदमवाक वस्ती, ता. हवेली) याच्यावर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमविणे, डॉ. राजकुमार शिंदे यांनी त्याला २ वर्षे पुणे जिल्ह्यातून तडीपार केले आहे.

प्रसाद दत्तात्रय जेठीथोर (वय २० रा. माळीमळा, लोणी काळभोर, ता. हवेली, सध्या रा. लोणी स्टेशन) याच्यावर बेकायदेशीर जमाव जमविणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगुन दहशत निर्माण करणे, मारहाण करणे दुखापत करणे, असे गुन्हे दाखल आहे.

चंद्रशेखर ऊर्फ चंद्रकांत ऊर्फ पिल्या दाजी चोरमोले (चोरमले) (वय २३, रा. लोणी काळभोर) याला बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मारहाण, असे गुन्हे दाखल आहे.

अजय दीपक जाधव (वय ३५, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा) याच्यावर बेकायदेशीर जमाव जमविणे, बलात्कार, असे गुन्हे दाखल आहे.

हनुमंत ऊर्फ बापू दगडु सरोदे (वय ४८, रा. कॅनॉल शेजारी, भीमनगर, मुंढवा) याच्यावर बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीची दारू विक्री करणे, असे गुन्हे दाखल आहे. साहिल राजू साठे (वय १९, रा. केशवनगर, मुंढवा) याच्यावर खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमविणे, दरोडा तयारी, शिवीगाळ करणे, मारहाण करणे,असे गुन्हे दाखल आहे.

वसीम सलीम पटेल (वय ४०, रा. पटेल क्लासिक, साईबाबानगर, कोंढवा खुर्द, मुळ रा. दांडेकर पुल) याच्याविरुद्ध जबरी चोरी, चोरी, विनयभंग, असे गुन्हे दाखल आहे.

वसीम ऊर्फ वस्सु शकील खान (वय २५, रा. भाग्योदयनगर, मुबारक मंजिल,कोंढवा) याच्यावर खुनाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमविणे, असे गुन्हे दाखल आहे.

ओंकार शिवानंद स्वामी (वय २३, रा. लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी) याच्यावर गंभीर दुखापत करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, धमकावणे, असे गुन्हे दाखल आहे.

आदिराज मनोज कामठे (वय २१, रा. भागीरथीनगर, साडेसतरानळी रोड, हडपसर) याच्यावर जबरी चोरी, मारहाण,असे गुन्हे दाखल आहे.

## गोडांबेवाडी ठरले देशातील पहिले संविधानमय गाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुळशी तालुक्यातील गोडांबेवाडी नं. १ हे गाव देशातील पहिले संविधानमय गाव झाले आहे. शासनाच्या 'घरघर संविधान' योजनेअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक विजय वडवेराव यांनी पुढाकार घेऊन गोडांबेवाडीतील प्रत्येक घरात संविधान पोहोचवले आहे. गावातील नागरिकांनी या उपक्रमाला प्रतिसाद देत भारतीय संविधानाचे महत्त्व स्वीकारून ते आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यावर भर दिला आहे.

सर्वसामान्य नागरिकांत संविधानाचा प्रचार व प्रसार व्हावा, संविधान जागृती व्हावी म्हणून विजय वडवेराव महाराष्ट्रभर संविधानदूत म्हणून कार्य करत आहेत. त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना संविधानदूत म्हणून तयार केले असून, स्वखर्चातून त्या सर्व विद्यार्थ्यांना संविधानदूत गणवेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देशिका व संविधानातील नागरिकांचे हक्क, अधिकार व कर्तव्ये तोंडपाठ करून घेतली आहेत. सर्व विद्यार्थ्यांना संविधानाची गोडी लावत शालेय वयातच त्यांच्या मनात संविधानाविषयी आदरभाव, प्रेम निर्माण करून त्यांच्यात सांविधानिक मूल्ये रुजवली आहेत.



पुणे मुळशी तालुक्यातील गोडांबेवाडी नं. १ हे गाव देशातील पहिले संविधानमय गाव झाले आहे. शासनाच्या 'घरघर संविधान' योजनेअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक विजय वडवेराव यांनी पुढाकार घेऊन गोडांबेवाडीतील प्रत्येक घरात संविधान पोहोचवले आहे.

# अनोख्या पद्धतीने मिळालेल्या श्रीराम मूर्तींचा जन्मोत्सव साजरा

## केतकी देशपांडे कुटुंबीयांची मंत्रमुग्ध करणारी कहाणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केतकी देशपांडे कुटुंबीय ,अपूर्व सोनटक्के, बाळासाहेब गिरम ,सुनील पांडे या श्रीराम भक्तांच्या पुढाकारातून दामले सभागृह विधी रस्ता येथे श्रीराम जन्माचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने गीतरामायणासह अनेक कार्यक्रमांचे आयोजन यावेळी करण्यात आले.

वृंदा बाम यांच्यासह त्यांच्या स्वरतरंग संगीत विद्यालय या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात गीत रामायण सादर केले. त्याचप्रमाणे राष्ट्रसेविका समिती प्रभावी शाखेच्या वतीने रामरक्षा पठण आणि राम नाम जपाचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे कुंदा पानसे यांच्या नेतृत्वाखाली ईशभक्ती भजनी मंडळाने भक्ती गीते सादर केली. केतकी देशपांडे अपूर्व सोनटक्के, बाळासाहेब गिरम, सुनील पांडे, आदींनी या अनोख्या सोहळ्याचे आयोजन केले होते.

रंजना नाईक, प्रिया रानडे, सुवर्णा ऋषी,योगेश जोगळेकर या रामभक्तांनी मनोभावे सेवा केली .

श्री महाराज यांची निस्सिम भक्ती करणाऱ्या केतकी देशपांडे कुटुंबिय यांना कुमठेकर रस्त्यावरील एका गणेशोत्सव मंडळाने सादर केलेल्या देखाव्यातील श्रीराम, सीतामाई, लक्ष्मण आणि हनुमान यांच्या मूर्ती अनपेक्षितपणे प्राप्त झाल्या. हा श्री गोंदवलेकर महाराज यांचा प्रसाद असल्याचे मानून केतकी देशपांडे कुटुंबीयांनी या मूर्तींचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला. आपले घर हेच एक मंदिर होऊन जावे, अशी देशपांडे यांची भावना आहे. त्याच दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू आहे. या वाटचालीत त्यांना अनेक श्रीराम भक्तांची साथ आहे.




## विश्व नवकार महामंत्र दिवस कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

**चिंचवड :** जैन समाजाची जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन ही आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारी नामांकित संस्था आहे. या संस्थेच्या वतीने बुधवारी ९ एप्रिल रोजी भारतासह इतर १०८ देशांमध्ये "विश्व नवकार महामंत्र दिवस" साजरा करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी आठ वाजता या कार्यक्रमात ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पिंपरी चिंचवड परिसरातील नागरिकांना पाहता यावे व सहभागी होता यावे यासाठी चिंचवड गावातील श्री फत्तेचंद विद्यालय येथे जीतो चिंचवड पिंपरी चॅप्टर फाउंडेशनच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती झोन चेअरमन राजेंद्र जैन यांनी प्रसिद्धीस दिली आहे. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, उमा खापरे, अमित गोरखे, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे उपस्थित राहणार आहेत.



## रहाटणीत पूर्ववैमनस्यातून तरुणावर खुनी हल्ला

**रहाटणी :** पूर्ववैमनस्यातून दोघांनी मिळून एका तरुणावर हल्ला करत खून करण्याचा प्रयत्न केला. ही घटना शनिवारी (दि.५) रामनगर, रहाटणी येथे घडली. विश्वजित रणजित वाघमारे (वय १९, रा. रहाटणी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार संदीप शिवाजी राजपांगे (वय १९), राहुल सीताराम वाघमारे (वय १८, दोघे रा. रहाटणी) यांना पोलिसांनी अटक केली.



## पुणे- मुंबई रोडवर दापोडी येथे कार जळून खाक

**दापोडी :** रस्त्याने धावणाऱ्या कारला अचानक आग लागली. या आगीत कार जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना सोमवारी पुणे- मुंबई रोडवरील दापोडी चौक येथील अशोका हॉटेलसमोर घडली. वाहनचालक गौरव प्रकाश बोरा हे गाडी चालवत होते. दापोडी चौकात अचानक इंजिन भागातून धूर येऊ लागल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. काही क्षणातच गाडीने पेट घेतला. प्रसंगावधान राखत त्यांनी वाहनातून बाहेर पडताच, आग आणखी भडकली. गौरव बोरा यांनी तात्काळ अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.

## माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात मंतरलेल्या दिवसांचा उजाळा



**पिंपरी :** तब्बल ५५ वर्षानंतर शाळेत पुन्हा येण्याचा अनुभव घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळेतील मंतरलेल्या दिवसांना उजाळा देत आपल्या आठवणी पुन्हा ताज्या केल्या. अनेक माजी विद्यार्थ्यांनी जुन्या काळातील प्रसंग, शिक्षकांची काढलेली खोड याचीही आठवण यावेळी करून दिली. निमित्त होते चिंचवड येथील व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये पार पडलेल्या माजी विद्यार्थी स्नेहमेळावा २०२५ कार्यक्रमाचे. या माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी तसेच शिक्षकही भाऊक झालेले पाहायला मिळाले.

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते अण्णा बनसोडे यांचा नागरी सत्कार

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. आज बुधवारी (दि.९) हॉटेल रागा पॅलेस, मदर तेरेसा उड्डाणपूल, काळेवाडी, पिंपरी, पुणे १८ येथे सायंकाळी पाच वाजता या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष योगेश बहल यांनी मंगळवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

## फळे वाटप



**पुणे** युवा नेते विशालभाऊ वाकडकर यांच्या वाढदिवसानिमित्त दापोडी येथील सरस्वती अनाथ आश्रमातील मुलांना शैक्षणिक साहित्य आणि फळे वाटप करण्यात आले. अजय कांबळे आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला.

## सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** सामाजिक बांधिलकी आणि लोकसंपर्क वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने युवा नेते विशालभाऊ वाकडकर (प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र राज्य) यांच्या ३ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

उपक्रमात वाकड येथे बांधकाम कामगारांना शिधा वाटप करण्यात आले. वाकडकर वस्ती येथे नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जवळपास ३५० नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच २३ रुग्णांचे मोतीबिंदू ऑपरेशन मोफत करण्यात येणार आहे. या उपक्रमांच्या पुढील टप्प्यात, १३ एप्रिल २०२५ रोजी दिघी येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचेही आयोजन मंगेश असवले आणि मित्रपरिवार यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमुळे सामाजिक जाणीवा अधिक दृढ झाल्या असून, विविध समाजघटकांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. आयोजकांनी यापुढेही समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# पाण्याच्या टाक्या खात आहेत 'भाव'

- प्लॅस्टिकच्या टाक्यांची मागणी वाढली !
- पाणी साठविण्यासाठी प्लॅस्टिकचे ड्रम, टाक्यांचा सरार्स वापर

### सण-उत्सवांमुळे पाण्याची मागणी वाढली

सध्याशहरी भागात अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे, तर काही शहरांत दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे. सण उत्सव, जत्रा यात्रांचा हंगाम सुरू असल्याने व उन्हाळ्यात पाण्याची जास्त गरज असल्याने नागरिकांकडून पाणी साठवणुकीचा पर्याय स्वीकारला जात आहे. किमान दोन दिवस पुरेल एवढा जलसाठा साठवून ठेवण्यासाठी तीनशे, पाचशे, हजार लिटर पाण्याच्या टाक्या नागरिक खरेदी करीत आहेत.

> नागरिकांना घरगुती वापरासाठी पाणी साठवून ठेवण्यासाठी पाण्याच्या टाकीची किंवा ड्रमची गरज भासत आहे. यामुळे तीनशे, पाचशे व एक हजार लिटर पाण्याची साठवण क्षमता असलेल्या प्लॅस्टिकच्या टाक्या अथवा प्लॅस्टिकचे ड्रम विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
>
> **-नथुराम कोंढाळकर,** विक्रेता



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढू लागली असताना पाण्याची मागणी देखील वाढली आहे. सण, उत्सव, यात्रा-जत्रा यामुळे पाण्याची मागणी अधिक वाढली आहे. परंतु शहरी भागात आवश्यक प्रमाणात पाणीपुरवठा होताना दिसत नाही. यासह अनेकदा पाणीपुरवठ्याचे नियोजन विस्कळीत होते किंवा अपूरा पाणीपुरवठा होतो. अशावेळी पाण्याचे नियोजन करण्यासाठी व घरातील पाण्याची गरज भागविण्यासाठी नागरिक पाणी साठविण्यावर भर देत आहेत.

उन्हाळ्यामुळे पाण्याच्या वापरात वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना पाणी कमी पडू लागले आहे. यामुळे आपसूकच पाण्याची साठवणूक करण्यासाठी नागरिक प्लॅस्टिकचे ड्रम, टाकी यांची खरेदी करू लागले असून बाजारात प्लॅस्टिकच्या टाक्या, ड्रम यांची मागणी वाढल्याचे दिसत आहे. परंतु प्लास्टिक हे पिण्याच्या पाण्यासाठी घातक असून देखील नाईलाज म्हणून नागरिकांना या टाक्यांचा वापर करावा लागत आहे. वाढत्या उन्हामुळे शहरात पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिक त्रासले आहेत.

अनेक भागात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नोकरदार लोकांना पाणी साठवणूक करावी लागते. त्यामुळे बाजारात अशा टाक्या विक्रीसाठी आल्या आहेत. त्या खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल वाढत आहे.

- १) सध्या बाजारात शंभर लीटर, दोनशे लीटर, तीनशे लीटर, पाचशे लीटरच्या टाक्या, तर पन्नास, शंभर, दोनशे लीटरचे ड्रम उपलब्ध असल्याचे दिसतात.
- २) तीनशे, पाचशे ते एक हजार लीटर पाण्याची साठवण क्षमता असलेल्या प्लॅस्टिक टाक्यांना मागणी अधिक आहे.
- ३) या टाक्या घरात बसविण्याची लगबग सुरू असून दुसरीकडे टाकी बसविणे शक्य नसणारे नागरीक ड्रम खरेदी करून तात्पुरती गरज भागविण्याचा पर्याय स्वीकारत आहेत.

# कुदळवाडी कारवाईची दाहकता 'अधोरेखित'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या मोई येथे एका भंगार दुकानाला आग लागल्याची घटना नुकतीच घडली. यामुळे कुदळवाडी अतिक्रमण विरोधी कारवाईच्या आठवणी ताज्या झाल्या. वाढते आगींच्या घटना, राष्ट्रीय सुरक्षा आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी केलेली कुदळवाडीची कारवाई ही काळाची गरज होती, असे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

बजाज, टेल्को, बजाज टेम्पो, प्रिमिअर, रस्टन, आडवाणी, कायनेटिक इंजिनीअरिंग असा कंपन्या निर्माण झाले. तोपर्यंत आजची कुदळवाडी हरित होती. शेती होती. मात्र, अवघ्या ३० ते ४० वर्षांत कुदळवाडी प्रदूषित झाली ती का? याचे आवलोकन केले पाहिजे.

... असे झाले 'भंगारवाडी'चे स्थलांतर!

पिंपरी-चिंचवड एमआयडीसी क्षेत्रातून निर्माण होणारा औद्योगिक कचरा पूर्वी आकुर्डी येथे टाकला जात होता. त्याठिकाणी "भंगारवाडी" तयार झाली. मात्र, औद्योगिक क्षेत्राचा विस्तर झाला. तसा या भागातील भंगार व्यापाऱ्यांनी कुदळवाडी भागात स्थलांतर होवू लागले. भौगोलिक दृष्टया कुदळवाडी हा भाग औद्योगिक क्षेत्रालगत असल्यामुळे या भागात औद्योगिक कंपन्यांना लागणारे छोटे पार्ट पुरवठा करण्यासाठी लघु उद्योग निर्माण झाले. मोठ्या प्रमाणात भंगार व्यासायिकांनी या भागात भाड्याने किंवा विकत जमीन घेतली आणि कुदळवाडीची ओळख "भंगार हब" अशी होवू लागली.

### कुदळवाडी गावचे गावपण हरपले?

- भंगार व्यावयासामुळे कुदळवाडीचे गावपण हरपले. मुस्लिम लोकवस्ती प्रचंड वाढली. धार्मिक तेढ निर्माण होईल, असे चित्र झाले. त्याप्रमाणे गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळाले. राष्ट्र सुरक्षा आणि इंद्रायणी नदी प्रदूषणाला कारणीभूत कृतींचे 'कनेक्शन' कुदळवाडीसोबत जोडले जावू लागले. महानगरपालिकेत चिखली-कुदळवाडीचा समावेश झाल्यानंतर नागरिकरण प्रचंड वाढले. वारंवार आगीच्या घटना आणि प्रचंड धुराचे लोट, हवा प्रदूषण, पाणी प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणामुळे सभोवतालच्या नागरिकांना, सोसायटीधारकांना त्रास होत होता. अनधिकृत बांधकांचे जाळे या भागात निर्माण झाले. कुदळवाडीचे गावपण अरक्षरश: हरपले, असे निरीक्षण जुने-जाणते नोंदवतात

# लोकशाही दिन उपक्रमात ४ तक्रारवजा सूचना प्राप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने सोडवणूक करणे तसेच नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद वाढवून लोकाभिमुख, गतिमान प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सोमवारी झालेल्या लोकशाही दिन उपक्रमात एकूण ४ तक्रारवजा सूचना प्राप्त झाल्या.

त्यामध्ये एच ए कंपनी यांच्या हद्दीतील निवासी भागातील मोठ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करून देणे,अरूंद रस्ते रुंद करण्यात यावेत, काळेवाडी येथील तापकीर मळा चौक, सर्वे नं.९६/१ आणि ९६/२ मधून दक्षिणोत्तर ९ मीटर रस्त्याचे रखडलेले भूसंपादन, शहरात रस्ता परिसरात सुविधा उपलब्ध कराव्यात आदी सूचनांचा समावेश होता. त्यानुषंगाने पार पडलेल्या लोकशाही दिन उपक्रमात अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्याबाबत विविध सूचनाही केल्या.



**पिंपरी** सोमवारी झालेल्या लोकशाही दिन उपक्रमात एकूण ४ तक्रारवजा सूचना प्राप्त झाल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता किरण अंदुरे, दयमंती पवार,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,नागरी सुविधा केंद्राच्या प्रशासन अधिकारी श्रद्धा बोरडे, कनिष्ठ अभियंता रुपेश बुराणे, संजय लोखंडे, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# महापालिका आयटीआय विद्यार्थ्यांना आता विद्यावेतन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचालित आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था ) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यावेतन लागू करण्याच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ५०० रुपये इतके विद्यावेतन देण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याअनशुंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही केली आहे

दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांनाही ५०० रुपये इतके विद्यावेतन द्यावे, असा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला होता. मात्र, सदर प्रशिक्षण केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या



अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाच योजना लागू करता येईल. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे कळवले होते.

त्यानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत आयुक्तांनी मान्यता दिली. दरवर्षी सुमारे ९०० प्रशिक्षणार्थ्यांचे ५०० रुपये प्रमाणे ४ लाख ५० हजार रुपये प्रतिमहिना खर्च महानगरपालिका स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या पुढील काळात आयटीआयमध्ये ट्रेड वाढल्यास त्या विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन देय राहील, असे धोरण ठरवण्यात आले आहे.

> राज्याच्या कानाकोपऱ्यातून नोकरी व व्यावसायाच्या निमित्ताने शहरात वास्तव्यास आलेल्या कुटुंबातील मुलांना महानगरपालिका आयटीआय संस्थेच्या माध्यमातून कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकतेची संधी उपलब्ध होती. सर्वसामान्य कुटुंबातील या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि शहरातील औद्योगिक कंपन्यांमध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे. या अनुशंगाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे, अशी मागणी केली होती. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे प्रतिवर्षी सुमारे ९०० विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे.
>
> **— महेश लांडगे, आमदार,**

संपादकीय विशेष

# ट्रम्प यांच्या विरुद्ध 'हॅण्डस ऑफ'

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम तीन महिने झाले. या तीन महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने तीन महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्वच्या सर्व म्हणजे पन्नास राज्यातील बाराशे शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत.




आंदोलकांनी या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले असून हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले जात असून या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातले हे आंदोलन शांततेच्या मार्गाने चालू असल्याने कोणालाही अटक करण्यात आली नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे हे मात्र नक्की. आंदोलकांनी केवळ डोनाल्ड ट्रम्प यांच्याच विरोधात नव्हे तर त्यांचे सहाय्यक ॲलन मस्क यांच्या विरोधातही घोषणा दिल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनाच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

# वर्तमान कायद्याची पायमल्ली करणाऱ्यांना चाप

**राज्यघटनेने कायदेमंडळ, न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ या तीन संस्थांना कार्यकक्षा ठरवून दिल्या आहेत. या संस्थांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करणे हा लोकशाही व्यवस्थेला धोका असतो. गुन्हेगारांना चाप लावला पाहिजे; परंतु हे करताना कायद्याच्या मूलभूत चौकटीला धक्का लावणे योग्य नाही. मूलभूत हक्कांना कार्यकारी मंडळ धक्का लावत असताना अलिकडेच न्यायमंडळाने त्यावर चाप ओढला, हे बरे झाले.**

न्याय यंत्रणा

शिवाजी कराळे
विधिज्ञ

गुन्हेगारांना चाप बसवण्यासाठी गेल्या काही वर्षांमध्ये त्यांच्या मालमत्ता उद्‌ध्वस्त करण्याचा सपाटा कार्यकारी मंडळांनी लावला आहे. गुन्हेगारांना शिक्षा झाली पाहिजे; परंतु शिक्षा देण्याचे काम निभावणाऱ्या यंत्रणेला डावलून शिक्षा दिली जात असेल, तर हा कायदा हातात घेण्याचा प्रयत्न असतो. गेल्या सहा महिन्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने याबाबत दिलेले निकाल पाहता कार्यकारी मंडळांना वारंवार त्यांच्या अधिकारक्षेत्राची जाणीव करून दिलेली दिसते; परंतु तरीही कार्यकारी मंडळांची इतरांच्या न्यायमंडळाच्या अधिकारात हस्तक्षेप करण्याची हौस काही जात नाही. राज्यघटनेने कायदेमंडळाला कायदे करण्याचे, कार्यकारी मंडळाला त्यांची अंमलबजावणी करण्याचे आणि न्याय मंडळाला न्याय देण्याचे अधिकार दिले आहेत. अन्न, निवारा या मूलभूत बाबी आहेत. मूलभूत हक्कात अधिक्षेप करण्याचा कुणालाही अधिकार नाही. असे असताना गुन्हेगारांना चाप लावण्याच्या नावाखाली अलिकडे कार्यकारी मंडळ म्हणजे सरकार कायदा हातात घेत आहे. गुन्हे सिद्ध होण्याअगोदर सरकार 'न्याय' करून समांतर न्यायालयाची दुकाने स्वतःच चालवत आहे. त्यासाठी 'बुलडोजर राज' आणले आहे. उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने आणलेले बुलडोझर राज आता मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातही आले आहे. घर बांधायला आयुष्याची पुंजी घालवावी लागते. ते एका क्षणात उद्‌ध्वस्त करून संधितांना रस्त्यावर आणणे कायदासंमत नाही. गुन्हेगाराच्या नावावरची मालमत्ता तोडणे, त्याचा लिलाव करणे आदींचे अधिकार कार्यकारी मंडळांना जरूर आहेत; परंतु त्यासाठीही विहित पद्धती अवलंबावी लागते. तसे न केल्याने अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने सरकारची चांगलीच खरडपट्टी काढली.

नोटीस न देता तोडफोड करणे, न्यायालयाचे दरवाजे ठोठावताच येऊ नयेत अशा वेळी नोटीस देणे अशी व्यवस्था करुन हल्ली बरेचदा सरकारतर्फे संशयितांच्या किंवा आरोपीच्या घरादाराची नासधूस केली जाते. गुन्हेगाराच्या नावावर मालमत्ता नसली, तरी त्याच्या कुटुंबीयांच्या किंवा नातेवाइकांच्या नावावर असलेल्या पक्क्या घरांवर बुलडोझर चालवण्यात आले. नागपूर, मालवण, प्रयागराज, लखनऊसह अनेक ठिकाणी असे प्रकार घडले. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ताज्या निकालात घरे तोडण्याच्या कारवाईला असंवेदनशील आणि अविवेकी म्हटले.

तेवढ्यावरच न थांबता न्यायालयाने प्रत्येक बाधिताला दहा लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश संबंधित संस्थांना दिले. कुणाचेही घर उद्‌ध्वस्त करताना यापुढे अधिकाऱ्यांना विचार करावा लागेल, असे न्यायालयाचे कडक आदेश आहेत. असे असले, तरी उत्तर प्रदेशमध्ये सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशानंतरही 'बुलडोझर राज' संपले नाही. येथिल मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ स्वतःला 'बुलडोझर बाबा' म्हणवण्यात धन्यता मानतात. कायदा हातात घेतला असता, तर प्रार्थनास्थळे केव्हाच ताब्यात घेतली असती, असे समर्थन ते करतात.

सर्वोच्च न्यायालयाने आता कायद्याच्या वर कोणीही नसल्याचे म्हटले आहे. गुन्हेगारांवर कारवाई करण्याच्या नावाखाली कायदेशीर प्रक्रियेकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे न्यायालयाने बजावले आहे. अलीकडच्या काळात गुन्ह्यांविरुद्ध कणखरपणा दाखवण्यासाठी बुलडोझरचा वापर केला जात होता; मात्र या प्रवृत्तीवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विविध राज्यांमध्ये आरोपी आणि गुन्हेगारांवर होत असलेल्या बुलडोजर कारवाईबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेवरून हेच दिसून येते की प्रशासकीय यंत्रणा कोणत्याही स्वरूपात आणि कोणत्याही स्तरावर कायदेशीर प्रक्रिया पार पाडण्याच्या जबाबदारीपासून मुक्त होऊ शकत नाही. काही वर्षांपासून गुन्ह्याचे प्रतीक म्हणून बुलडोझरचा वापर करून गुन्हेगारांविरुद्ध 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवण्याचा ट्रेंड वाढत होता. त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत होते. 'त्वरित न्याया'चा हा ट्रेंड उत्तर प्रदेशमधून सुरू झाला असला तरी इतर राज्यांमध्येही त्याचा वापर सुरू झाला आहे. 'त्वरित न्याय' असा संदेश देण्यासाठी अशा कृतीचा वापर करून भाजपेतर सरकारेही




प्रतिकार करू शकली नाहीत. सरकारी बुलडोझर केवळ बेकायदा बांधकामांनाच टार्गेट करत असल्याचा युक्तिवाद अशा कारवाईच्या बाजूने सर्वत्र केला जात होता; मात्र एका गुन्ह्यात नाव आल्यानंतर ज्या पद्धतीने ही कारवाई करण्यात आली, त्यावरून हे प्रकरण केवळ बेकायदा बांधकामांचे नसल्याचे स्पष्ट झाले. अशा परिस्थितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या भूमिकेतील बारकावे लक्षात घेण्यासारखे आहेत.

एखाद्या गुन्ह्यात आरोपी आहे, म्हणून एखाद्या व्यक्तीचे घर पाडले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कोणी दोषी असल्याचे सिद्ध झाले, तरी त्याचे घर पाडता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपण कोणत्याही स्वरूपात बेकायदा बांधकामांचा बचाव करत नसल्याचे स्पष्ट करताना कारवाई करताना कायदेशीर बाबींचा अवलंब करावा, असे सुचवले. कायदेशीर प्रक्रियांचे पालन करणे आणि प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करणे हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळेच वैयक्तिक प्रकरणांच्या गुणवत्तेत जाण्याऐवजी मनमानी पद्धतीने बुलडोझरची कारवाई करता येणार नाही, याची काळजी घेणे सर्वोच्च न्यायालयाने अधिक महत्त्वाचे मानले. याबाबत संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांमध्ये काही प्रमाणात भीती निर्माण होण्याची गरज नाकारता येत नसली, तरी पोलिस-प्रशासनाबद्दल नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते, हे मान्य करता येणार नाही. भीती असली तरी ती कायद्याची असावी, सरकारी यंत्रणेची नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या संतुलित दृष्टिकोनाने या प्रकरणात सर्व पक्षांसाठी कायदेशीर मर्यादांची रूपरेषा तयार करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

प्रयागराजमध्ये 2021 मध्ये एक वकील, एक प्राध्यापक आणि तीन महिला याचिकाकर्त्यांची घरे बुलडोझरने पाडल्याची प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवली आहे. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार घर पाडण्याची प्राधिकरणाची ही मनमानी प्रक्रिया नागरिकांच्या आश्रयाच्या अधिकाराचेही असंवेदनशील उल्लंघन आहे. न्यायालयाने म्हटले आहे की यामुळे आपल्या सदसदविवेकबुद्धीला धक्का बसतो. प्रत्येकाला निवाऱ्याचा हक्क असतो. या संदर्भात नोटीस आणि इतर योग्य प्रक्रिया पार पाडण्याचीही गरज आहे. घरे पाडल्याप्रकरणी प्रयागराज विकास प्राधिकरणाला पाच पीडितांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याच खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती उज्वल भुईया यांनी उत्तर प्रदेशमधील आंबेडकरनगरमध्ये 24 मार्च रोजी घडलेल्या घटनेचा संदर्भ देताना सांगितले, की अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान एका बाजूला झोपड्यांवर बुलडोझर चालवला जात होता आणि दुसरीकडे आठ वर्षांची मुलगी तिची पुस्तके घेऊन पळत होती. या चित्राने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना एक मार्च 2021 रोजी नोटीस बजावण्यात आली होती; परंतु त्यांना सहा मार्च रोजी नोटीस मिळाली. त्यानंतर लगेचच घरांवर बुलडोझरची कारवाई करण्यात आली.

न्यायालयाने या वेळी अधिवक्ता झुल्फिकार हैदर, प्राध्यापक अली अहमद आणि इतरांच्या याचिकेवर सुनावणी केली. याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की प्रशासन आणि सरकारला वाटते की ही मालमत्ता गुंड आणि राजकीय पक्षाचे नेते अतिक अहमद यांची आहे. या सर्वांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात तक्रार केली होती; पण उच्च न्यायालयाने घर पाडण्याला आव्हान देणारी त्यांची याचिका फेटाळून लावली. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सुनावणीदरम्यान, ॲटर्नी जनरल आर. वेंकटरामानी यांनी राज्य सरकारच्या कारवाईचा बचाव केला. नोटीस देताना योग्य प्रक्रिया पाळली गेली, असा युक्तिवाद त्यांनी केला; परंतु न्या अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्वल भुईया यांच्या खंडपीठाने सरकारी युक्तिवाद अमान्य करत राज्य सरकारला चांगलेच फटकारले आणि कायदा हातात घेण्याची प्रवृत्ती चुकीची असल्याचे सांगितले. आता तसेच काही घडले आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्याने सरकारांच्या राजेशाही मानसिकतेमध्ये काही फरक पडतो का, ते पहायचे.




## राशीभविष्य

- **मेष** : नातेवाईकांच्या सहवासात मन रमेल. खर्च मर्यादित राहील. आर्थिक गणित जमेल.
- **वृषभ** : पाळला जाणार असेल तरच शब्द द्या. कोणालाही जामीन राहू नका. जुगारापासून दूर रहा.
- **मिथुन** : घरगुती मतभेद मिटवाल. भावंडं सहकार्य करतील. अचानक धनलाभ होईल.
- **कर्क** : संततीचे हट्ट वाढतील. काही गोष्टी मनाविरुद्ध घडतील. प्रवास सुखदायक होतील.
- **सिंह** : व्यापारात अचानक वाढती धनप्राप्ती होईल. नवीन कामे मिळतील. तब्येतीत सुधारणा होईल.
- **कन्या** : कोणावरही अवलंबून राहू नका. व्यसनापासून दूर रहा. प्रवास कार्यसाधक होतील.
- **तूळ** : सहकारी मदत करतील. पैसा, प्रसिद्धीचे योग आहेत. फार दगदग करू नका.
- **वृश्चिक** : व्यवसायात भरभराट होईल. जुनी कटकटीची उधारी वसूल होईल. प्रवासात जपून असावे.
- **धनु** : कौटुंबिक सुख मिळेल. चारचौघात संततीचे कौतुक होईल. तब्येतीस जपावे.
- **मकर** : भावंडाशी योग्य संवाद साधणे गरजेचे. सहकारी अडचणी निर्माण करतील. सत्संगाचा लाभ होईल.
- **कुंभ** : पैशाची उपलब्धता वाढेल. नोकरीत बढती मिळण्याचा योग. अडचणीच्या कामातून मुक्त व्हाल.
- **मीन** : इतरांचे सल्ले काही मर्यादेपर्यंतच स्वीकारा. मानसिक समतोल राखावा. खर्चात वाढ होईल.

## ९ एप्रिल
दिनविशेष

- **२०१४** : दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरच्या भूसंपादनाच्या मुद्यावरुन जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांचा आक्रमक पवित्रा.
- **२०१६** : ब्रिटनची युवराज्ञी केट मिडलटन आणि राजपुत्र विल्यम यांचा भारतदौरा.
- **२०१७** : भारतीय वंशाच्या आशा खेमका यांना 'बिझनेस ऑफ द ईयर' पुरस्कार जाहीर.
- **२०१८** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत बॅडमिंटनमधील सांघिक यशाने भारतीय क्रीडा प्रगतीचे आश्वासक चित्र दिसू लागले.

आरोग्यमंत्र

## काही महत्त्वाचे क्रमांक

सध्याच्या जगात आपल्याला अनेक क्रमांक लक्षात ठेवावे लागतात अथवा ते मोबाईलमध्ये सेव्ह करुन ठेवावे लागतात. वयस्क माणसं महत्त्वाच्या क्रमांकांची वहीमध्ये नोंद करुन ठेवतात. पण सगळ्यात महत्त्वाचे असे काही क्रमांक आहेत ज्याची माहिती आपण घ्यायलाच हवी. तेव्हा जाणून घेऊ या, प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा वैद्यकीय क्रमांकांविषयी...

✽ **रक्तदाब**: १२०/८० ✽ **नाडी**: ७० - १०० ✽ **तापमान**: ३६.८ - ३७ ✽ **श्वसन**: १२-१६ ✽ **हिमोग्लोबिन**: पुरुष (१३.५०-१८) महिला ( ११.५० - १६ ) ✽ **कोलेस्टेरॉल**: १३० - २०० ✽ **पोटॅशियम**: ३.५० - ५ ✽ **सोडियम**: १३५ - १४५ ✽ **ट्रायग्लिसराइड्स**: २२० ✽ **शरीरातील रक्ताचे प्रमाण**: ५-६ लिटर ✽ **साखर**: मुलांसाठी (७०-१३०) प्रौढ: ७० - ११५ ✽ **लोह**: ८-१५ मिग्रॅ ✽ **पांढऱ्या रक्त पेशी**: ४००० - ११००० ✽ **प्लेटलेट्स**: १,५०,००० - ४,००,००० ✽ **लाल रक्तपेशी**: ४.५० - ६ दशलक्ष. ✽ **कॅल्शियम**: ८.६ - १०.३ mg/dL ✽ **व्हिटॅमिन डी ३**: २० - ५० एनजी/मिली (नॅनोग्राम प्रति मिलीलीटर) ✽ **व्हिटॅमिन बी १२**: २०० - ९०० pg/ml

हे सगळे आकडे तुमचं आरोग्य उत्तम असल्याचं दाखवतात. त्यामुळेच ते ठाऊक असणं आणि त्यात काहीही वरखाली जाणवण्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणं गरजेचं आहे. या महत्त्वपूर्ण आकड्यांकडे दुर्लक्ष करु नये.

महत्त्वाचे काही

## स्वोर्डफिश, उत्तम शिकारी

समुद्रात अनेक रहस्ये दडलेली असून मानवाला समुद्र अजूनही पूर्ण समजलेला नाही. पण त्याला जेवढा समुद्र उलगडला आहे तोही अद्भूत आहे. जमिनीवर 'जीवो जीवस्य जीवनम्'च्या तत्वानुसार खाद्यसाखळी असते त्याचप्रमाणे समुद्रातही ती असते. त्यातलाच एक शिकारी मासा म्हणजे स्वोर्डफिश. स्वोर्डफिश ही माशाची एक प्रजाती असून हे मासे अत्यंत वेगाने पोहतात. तोंडासमोर असणाऱ्या धारदार तलवारीसारख्या अवयवामुळे या माशांना स्वोर्डफिश म्हणून ओळखलं जातं. हे थंड रक्ताचे जलचर आहेत. म्हणूनच थंडीत ते खोल समुद्रात आढळतात तर उन्हाळ्यात थंड पाण्याच्या शोधात प्रवास करतात. वैशिष्ट्य म्हणजे या प्रजातीतील काही मासे गरजेप्रमाणे आपल्या शरीराचा हवा तो अवयव गरम ठेवू शकतात. मात्र २५,००० माशांमधील अवघ्या २२ माशांमध्येच हे वैशिष्ट्य आढळून येतं. उत्तम शिकारी अशी ख्याती असणारे हे जीव जवळपास नऊ वर्षं जगतात. ते कधीच झुंडीने अथवा गटागटाने पोहत नाहीत तर एकटं पोहणं पसंत करतात.

मोलाचा सल्ला

## ब्लो ड्रायर वापरताना...

केस घनदाट भासवण्यासाठी ब्लो ड्रायरचा वापर केला जातो. मात्र यावेळी काळजी घ्यायला हवी. कधीही ओल्या केसांवर ब्लो ड्रायर वापरु नये. ब्लो ड्राय करताना केस ८० टक्के सुकलेले असावेत. ब्लो ड्राय करण्याआधी हिट प्रोटेक्शन क्रीमचा वापर करणं गरजेचं ठरतं. ही काळजी घेतली नाही तर उष्णतेमुळे केसांचंच नव्हे तर स्काल्पचंही नुकसान होऊ शकतं. यामुळे केस गळण्याची समस्या उद्भवू शकते. चुकीच्या दिशेने केस ब्लो ड्राय केले तर अधिक फ्रिझी आणि प्रमाणाबाहेर कोरडे होतात. केस मऊसर राहण्यासाठी ब्लो ड्रायर नेहमी खालच्या दिशेने ठेवायला हवा. ब्लो ड्रायरमध्ये तीन वेगवेगळ्या तापमानाचं सेटिंग दिलेलं असतं. कूल, लो आणि हार्ड अशी ती तीन सेटिंग असतात. केस पातळ असतील तर सेटिंग लो मोडवर असावं. केस दाट अथवा राठ असतील तरी हार्ड सेटिंग वापरु नये. केसांचे छोटे-छोटे भाग करुन ब्लो ड्रायर केल्यास अधिक चांगले परिणाम बघायला मिळतात. ब्लो डायरच्या उष्ण हवेमुळे केसांचं कायमचं नुकसान होऊ नये म्हणून एवढी काळजी नक्की घ्या.

पंचांग

**बुधवार, ९ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. १२, नक्षत्र : मघा,
चंद्रराशी : सिंह, योग : गंड
सूर्योदय : ६.२८, सूर्यास्त: ६.५२

फॉरवर्डस

**अन्य कशापेक्षाही नाती आणि मनं जपण्याकडे लक्ष द्यायला हवं...**

रिश्तों को वक़्त दीजिए बड़े बड़े तोहफ़े नहीं
ताजमहल दुनिया ने देखा है, मुमताज़ ने नहीं...!

वाचा तर खरं

✽ केसांच्या नव्या पेशी तयार करण्यासाठी प्रथिनांची आवश्यकता असते. प्रथिनांच्या अभावामुळे केस गळू लागतात. ✽ विशिष्ट प्रकारच्या औषधांमुळे केस गळू शकतात. ✽ तरूण मंडळी केसांची स्टाईल करतात. यासाठी विविध प्रकारची उत्पादनं वापरली जातात. यातल्या रसायनांमुळे केसाचं नुकसान होतं आणि ते गळू लागतात. ✽ हार्मोन्समधले बदल हे सुद्धा केस गळ्याचं कारण मानलं जातं. ✽ अनुवांशिक कारणांमुळेही केस गळू लागतात. तुमचे केस गळत असतील तर त्यावर वेळेत उपचार घ्यायला हवे.

करिअरवाटा

## फुड प्रोसेसिंगच्या क्षेत्रात...

शेतमालाची कापणी केल्यानंतर तो अधिक दिवस टिकावा, पोषणमूल्यांचा ऱ्हास होऊ नये यासाठी कार्यरत असणाऱ्या फुड प्रोसेसिंग क्षेत्रात पदव्युत्तर किंवा पदवीचे छोटे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यामुळेच या विषयात रस असेल तर त्याविषयी सविस्तर जाणून घ्यावं. फुड प्रोसेसिंग आणि फुड टेक्नालॉजी यात फरक आहे. फुड प्रोसेसिंगमध्ये फळं, भाज्या आर्दीवर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्याचं शिक्षण दिलं जातं तर परंतु फुड टेक्नालॉजीमध्ये अधिक व्यापक आणि प्रगत ज्ञान दिलं जाते. कर्नाटकातील धारवाडच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रीकल्चरल सायन्सेस (युएएस) या विद्यापीठात फुड टेक्नालॉजीमधील बी.टेक. पदवी देणारा अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना बी.टेक. (फुड टेक्नालॉजी) अशी पदवी दिली जाते. याच संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमही आहे. बंगलोर, मैसूर आणि धारवाड या तीन शैक्षणिक केंद्रांमध्ये अन्न प्रक्रिया आणि अन्न तंत्रज्ञान या विषयाचे तीन अभ्यासक्रम आहेत. यासंबंधीचा कोणताही अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. स्वत:चा व्यवसाय सुद्धा सुरू करता येतो.



खेचाखेची

## समजलो असतो

अरे मित्रा... यंदाच्या एक एप्रिल रोजी किती मोठा मेसेज पाठवला तू आम्हाला एप्रिल फूल बनवण्यासाठी...

.
.
.

त्याऐवजी फक्त 'बायको माझं ऐकते' एवढंच लिहीलं असतं तरी आम्ही समजलो असतो एप्रिल फूल करतो आहेस म्हणून...

वेगळं काही

जर्मनीमध्ये हवेचं प्रदूषण कमी करण्यासाठी नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा मोफत वापर करू देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. यामुळे रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची संख्या कमी होऊ शकेल. जर्मनीतल्या २० शहरांमध्ये घातक नायट्रोजन ऑक्साइडने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे अधिक प्रदूषण करणाऱ्या डिझेल गाड्यांवर बंदी घालण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. नायट्रोजन ऑक्साइड मानवी आरोग्याच्या दृष्टीने घातक वायू आहे. यामुळे फुफ्फुसाचे विकार होऊशकतात. अशावेळी नागरिकांना सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर मोफत करायला देणं हा प्रदूषण कमी करण्याचा प्रभावी उपाय ठरू शकतो.

फॅशन पॅशन

## बाथरोबची खरेदी?

बाथरोब युवती आणि महिलांच्या नित्याच्या वापरात असतो. पण तो खरेदी करताना काही बाबींचा विचार करायला हवा. याविषयी...



✽ बाथरोब निवडताना महत्त्वाची गोष्ट असते ती कंफर्टची. बाथरोब आरामदायी असणं गरजेचं असतं. ✽ बाथरोब खरेदी करताना लांबी किती असावी हे ठरवून घ्यावं. गुडघ्यापर्यंत किंवा घोट्यापर्यंत लांबी असणारे बाथरोब उपलब्ध असतात. बाथरोबच्या स्लीव्हज वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. आपल्या गरजेनुसार योग्य बाथरोब निवडावा.✽ बाथरोबची निवड करताना ऋतूमानाचाही विचार करावा. थंडीसाठी गरम मायक्रो फायबर्स असणारा बाथरोब निवडावा तर उन्हाळ्यात कॉटन किंवा सॅटिनच्या बाथरोबची निवड योग्य ठरते. ✽ फिरायला जाण्यापूर्वी बाथरोबची खरेदी करणार असाल तर पॉकेट असणारा बाथरोब निवडावा. यात काही वस्तू ठेवता येतात. ✽ बाथरोबमध्ये मुख्यत: दोन स्टाईल असतात. एक किमोनो आणि दुसरी शॉल कॉलर स्टाईल. किमोनो स्पासाठी वापरला जातो. ✽ पुरुषांसाठी हूड स्टाईल बाथरोब ट्रेंडमध्ये आहेत. ✽ बाथरोबचे वैविध्यपूर्ण पॅटर्न्स वापरुन बघण्यास वाव असतो.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### मुंबईचा चेहरा-मोहरा बदलणार

**मुंबई :** मुंबई आणि आजूबाजूच्या परिसराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी राज्य सरकारने एक सामंजस्य करार केला आहे. इंडिया ग्लोबल फोरममध्ये काही महत्त्वाचे सामंजस्य करार करण्यात आले. एमएमआरडीएच्या माध्यमातून जे विविध प्रकल्प हाती घेतली आहेत त्याच्या फंडिंग टायअपचे सामंजस्य करार करण्यात आले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत म्हटलं की, एमएमआरडीए संबंधित सामंजस्य करारातून ४ लाख ७ हजार कोटी रुपयांचा निधी विविध प्रकल्पांकडून उपलब्ध झाले आहेत. राज्य सरकारने एमएमआरडीएच्या माध्यमातून जी विकासकामे हाती घेतली आहेत, याला कुठेही निधीची कमतरता राहणार नाही.

### सरकारने कसली वसुली सुरू केली?

**मुंबई :** केंद्र सरकारने गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांनी वाढ करण्यात आल्याची घोषणा केली. सरकारच्या या निर्णयामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. त्यामुळे याच मुद्यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. सरकारने ही कसली वसुली सुरू केली आहे? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. परंतु, असे असले तरी केंद्र सरकारकडून पेट्रोल-डिझेलच्या अबकारी करामध्ये दोन रुपयांनी वाढ केली. पण याचा फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार की नाही, हे अद्यापही स्पष्ट होऊ शकलेले नाही.

# राज ठाकरेंविरोधात याचिका

## मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीनंतर जोरदार राजकारण रंगले आहे. निवडणुकीमध्ये एकही जागा न मिळालेल्या मनसे पक्षावर अनेकांनी जोरदार टीका केली. मात्र गुढीपाडव्याला गाजलेल्या भाषणानंतर राज ठाकरे हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. राज ठाकरे यांनी पाडव्याच्या दिवशी तुफान भाषण करून सत्ताधारी व विरोधी नेत्यांवर आगपाखड केली. यावेळी त्यांनी राज्यातील मराठी भाषेच्या आग्रहावर जोर दिला. त्यांनी बँका, कार्यालये आणि आस्थापना येथे मराठी बोलली जात आहे की नाही यांची खात्री करण्याचे आदेश कार्यकर्त्यांना दिले. यामुळे संपूर्ण राज्यभरामध्ये मनसैनिक हे आक्रमक भूमिका घेऊ लागले. यानंतर आता राज ठाकरे यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली असल्याचे दिसत आहे.

मनसे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राज्यभरामध्ये आंदोलन आणि आक्रमक भूमिका घेतली. तसेच अनेक बँकांमध्ये जाऊन मराठी बोलण्याचा आग्रह धरला. तसेच मराठी बोलणार नाही म्हणणा-या हिंदी भाषिकांना मनसे स्टाईल दणका देखील दिला. यामुळे राज ठाकरे यांना अखेर कार्यकर्त्यांना हे प्रकार थांबवण्याचे आदेश द्यावे लागले. मात्र हिंदी भाषिकांना त्रास दिल्यामुळे मनसे पक्षाची मान्यता रद्द करावी अशी मागणी केली जात आहे. याबाबत सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे.

मुंबईत राहणारे आणि महाराष्ट्रात नोंदणीकृत राजकीय पक्ष उत्तर भारतीय विकास सेनाचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी राज ठाकरेंविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांच्याविरोधात याचिका देखील दाखल केली आहे. राज ठाकरे यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. हिंदी भाषिकांवर मनसे कार्यकर्ते हल्ले करत असल्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा न बोलणा-या उत्तर भारतीयांविरुद्ध कथित द्वेषपूर्ण भाषण, लक्ष्यित हिंसाचार आणि धमक्यांसंबंधी अनेक प्रकरणांमध्ये कारवाईची मागणी करणारी याचिका मनसेविरोधात दाखल करण्यात आली आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळामध्ये चर्चांना उधाण आले आहे.

ॲड. श्रीराम परक्कट यांच्यामार्फत याचिका दाखल करण्यात आली आहे. यामध्ये सुनील शुक्ला आणि इतर हिंदी भाषिक लोकांविरुद्ध द्वेषपूर्ण भाषणाचे अनेक खटले दाखल असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राज ठाकरे यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यासोबतच, मनसेची मान्यता रद्द करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने द्यावेत अशी धक्कादायक मागणी करण्यात आली आहे. यामुळे आता मनसे पक्ष आणि राज ठाकरे याबाबत काय भूमिका घेणार याची सर्वांना उत्सुकता लागली आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनुसार, सुनील शुक्ला यांना गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रात त्यांच्या राजकीय ओळखीमुळे आणि उत्तर भारतीय हक्कांच्या वकिलीमुळे अनेक गंभीर धमक्या आणि छळ तसेच शारीरिक धमक्यांचा सामना करावा लागला आहे. या धमक्या आता सार्वजनिक हिंसाचार आणि शारीरिक हल्ल्यांपर्यंत वाढल्या आहेत, असा आरोप याचिकेमार्फत केला जात आहे.

याचिका दाखल केल्यानंतर सुनील शुक्ला यांनी प्रतिक्रिया देखील दिली आहे. यावेळी त्यांनी राज ठाकरेंवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, "राजसाहेब ठाकरे तुम्ही हिंदूंना मारायचा आदेश दिला आहे, असे वाटते. तुम्ही केवळ उत्तर भारतीयांच्या नव्हे तर मराठी लोकांच्याही विरोधात आहात. म्हणून मी तुमच्याविरुद्ध सुप्रीम कोर्टात जाऊन याचिका दाखल केली आहे. तुम्ही संविधानाचे उल्लंघन करू शकत नाही. हिंदूंना तुम्ही मारू शकत नाही. आम्ही तुमचा विरोध करतो, निंदा करतो आणि सुप्रीम कोर्टातून तुमच्या विरुद्ध आदेश आणणारच," असा आक्रमक पवित्रा सुनील शुक्ला यांनी घेतला आहे. यानंतर आता राज ठाकरे काय प्रत्युत्तर देणार याची राजकीय वर्तुळात उत्सुकता लागली आहे.



### मनसे पुन्हा आक्रमक; थेट इशारा

● मनसे अध्यक्ष राज ठाकरेंविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे, मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी करणारी याचिका उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी केली आहे. उत्तर भारतीयांविरोधात राज ठाकरे द्वेष पसरवत असल्याचा आरोप केला आहे. त्यावर मनसेचे मुंबई शहरध्यक्ष संदीप देशपांडे यांनी भैय्यांना मुंबईत, महाराष्ट्रात राहू द्यायचं का यावर विचार करावा लागेल, असा थेट इशाराच दिला आहे. उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमुळे वाद निर्माण होण्याची चिन्हं आहेत. यासंदर्भात मनसेचे मुंबई शहरध्यक्ष संदीप देशपांडे यांनी एक्सवर पोस्ट केलीय. मराठी माणसाचा पक्ष बंद व्हावा म्हणून भैय्ये प्रयत्न करणार असतील तर भैय्यांना मुंबईत, महाराष्ट्रात राहू द्यायचं का यावर विचार करावा लागेल असा इशाराच संदीप देशपांडे यांनी दिलाय. कुठला तरी भैय्या म्हणे कोर्टात गेला आहे की मनसेची मान्यता रद्द करावी. मराठी माणसाचा पक्ष बंद व्हावा म्हणून भैय्ये प्रयत्न करणार असतील तर भैय्यांना मुंबईत, महाराष्ट्रात राहू द्यायचं का यावर विचार करावा लागेल.

# आता वीजही महागली; महावितरणची दरवाढ

### घरगुती ग्राहकांवर परिणाम

- ५०० युनिट्सवर ६० पैसे
- ३०१ ते ५०० युनिट्स ५५ पैसे
- १०१ ते ३०० युनिट्स ४० पैसे
- ० ते १०० युनिट्स २५ पैसे
- बीपीएल १० पैसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्यात १ एप्रिलपासून वीज स्वस्त होणार होती. मात्र, महावितरणने स्वस्त विजेला आक्षेप घेतल्याने महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने याबाबतचा निर्णय स्थगित ठेवला. त्याच दरम्यान महावितरणने परिपत्रक काढून घरगुती ग्राहकांची वीज प्रति युनिट ६० पैशांनी महाग केली आहे. यासाठी इंधन समायोजन शुल्क (एफएसी) चा आधार घेण्यात आला आहे.

कंपनीतील सूत्रानुसार, मागच्यावर्षी उन्हाळा आणि त्यानंतर मान्सूनमध्ये वीजपुरवठा कमी झाल्याने बाहेरून महाग वीज खरेदी करण्यात आली होती. आता त्याच्या भरपाईसाठी ग्राहकांकडून इंधन समायोजन शुल्क आकारावे लागेल. १ एप्रिलपासून राज्यात स्वस्त वीज उपलब्ध होणार होती, त्याच दिवशी महावितरणने परिपत्रक काढून मार्चमध्ये वापराच्या प्रत्येक युनिटवर एफएसी जमा करण्याचे आदेश दिले. यासाठी, कंपनीने ३० मार्च २०२० च्या आयोगाच्याच आदेशाचा हवाला दिला.

मागणी ३० हजार मेगावॅटच्या जवळ, तीन युनिट बंद

महाराष्ट्रातील विजेची मागणी ३० हजार मेगावॅटच्या जवळ पोहोचली आहे. राज्यात ७ एप्रिलला सर्वाधिक मागणी २९,४११ मेगावॅट होती. यामध्ये मुंबईच्या ३७५३ मेगावॅटचाही समावेश आहे. दुसरीकडे, राज्यात खासगी कारखान्यांसह उत्पादन १८,५०३३ मेगावॅट होते. उर्वरित मागणी केंद्रीय कोटा आणि पॉवर एक्स्चेंजद्वारे पूर्ण करण्यात आली. दुसरीकडे चंद्रपूर, खापरखेडा आणि भुसावळमधील प्रत्येकी एक युनिट बंद आहे. अशा स्थितीत महावितरणला महागडी वीज खरेदी करावी लागणार आहे. परिणामी नागरिकांना एफएसीद्वारे यापुढेही आर्थिक भार सोसावा लागणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**दरवाढ**

कंपनीचे स्पष्ट म्हणणे आहे की हा एफएसी मार्चच्या वापरावरच लागू केला जाईल. मात्र, महावितरणचे वीज खरेदीचे महागडे दर पाहता ही वसुली येत्या काही महिन्यांतही सुरूच राहणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्याचा परिणाम घरगुती ग्राहकांसह प्रत्येक वर्गावर होणार आहे. वर्गवारीनुसार, व्यावसायिक ग्राहकांना ४० ते ६० पैसे, कृषी १५ ते ३० पैसे, पथदिवे ३० ते ३५ पैसे, पाणीपुरवठा योजना ३० ते ३५ पैसे, ईव्ही चार्जिंग स्टेशनला ४० पैसे आणि उद्योगांना ३५ ते ४० पैसे अधिक द्यावे लागतील.

# सिम्बॉयसिस प्रवेशासाठी १५ लाख द्या

## फसवणुकीचं रॅकेट, पोलिसांनी तिघांना 'असं' पकडलं!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात नामांकित कॉलेजच्या नावाने विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक करण्याचे रॅकेट सुरू असल्याचे समोर आले आहे. पैशाचे आमिष दाखवून ॲडमिशन देण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्याचा प्रयत्न होता. १५ लाख रुपये द्या आणि ऍडमिशन घ्या अशी खोटी जाहिरात सोशल मीडियावरून देऊन तरुणांना जाळ्यात ओढायचा प्रयत्न सुरू होता.

डोनेशन आणि फी च्या नावाखाली लाखो रुपयांची मागणी संबंधितांनी केली. पुण्यातील प्रसिद्ध सिंबॉयसिस कॉलेजमध्ये एमबीए प्रवेशासाठी खोटी जाहिरात देण्यात आली होती. यासाठी पुण्यात आरोपींनी भव्य ऑफिसही थाटलं होतं. सोशल मीडियावर कॉलेजची खोटी जाहिरात तयार करून तरुणांना जाळ्यात ओढायचा प्रयत्न होत होता.

विद्यार्थ्यांना प्रवेशाचे अमिष दाखवणाऱ्यांच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या संदर्भात महाविद्यालयाच्या व्यवस्थापनकडून पोलिसात तक्रार देण्यात आली होती. आकाश यादव, कुणाल कुमार आणि दिव्या नामक तरुणी या तिघांवर डेक्कन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनातील एक जण हे युट्युब बघत असताना त्यांना एका चॅनलवर सिंबायोसिस संस्थेचा लोगो असलेल्या संस्थेच्या इमारतीचा फोटो दिसला. त्यावर सिंबॉयसिसमध्ये एमबीए ॲडमिशनसाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश हवा असल्यास ज्यांचे बजेट आहे, त्यांनी दिलेल्या क्रमांकावर साधावा, अशी खोटी जाहिरात दिसून आली. त्यांनी तात्काळ ही बाब महाविद्यालयाच्या वरिष्ठांना सांगितली आणि तात्काळ डेक्कन पोलिसात तक्रार दिली.

संस्थेने प्रकरण जाणून घेण्यासाठी त्या जाहिरातीत दिलेल्या नंबरवर संपर्क साधला असता यातील एका आरोपीने त्यांना नोयडा मध्ये असल्याचं सांगितलं, तसेच ऍडमिशन साठी तुम्ही पुण्यातील बाणेर भागात असलेल्या ऑफिसवर जायला सांगितलं. त्या ऑफिसवर गेल्यावर यातील दुसऱ्या आरोपीने सुरुवातीला ५ लाख रुपये व मुळ कागदपत्रे द्यावी लागतील. आम्ही तुमचे नाव मेरिट लिस्टमध्ये टाकून तुम्ही उशीर केल्यास डोनेशनचे पैसे वाढत जातील असे सांगितले.

आरोपींच्या विरोधात डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, संबंधित प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

# अमेरिका सोडली नाही तर कठोर दंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट'च्या धोरणाचा अवलंब करत बेकायदा स्थलांतरितांना देशाबाहेर काढण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. ट्रम्प प्रशासनाने केवळ लष्करी विमानांद्वारे हजारो स्थलांतरितांना हद्दपार केले नाही, तर देशात त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. दरम्यान, ट्रम्प लवकरच स्थलांतरितांबाबत आणखी एक मोठी घोषणा करू शकतात, असे वृत्त आहे. हद्दपारीचे आदेश असूनही अमेरिका न सोडणाऱ्यांवर कठोर दंड आकारण्याची तयारी अमेरिकन सरकार करत आहे.

# ठाण्यातील शहापूर सर्वाधिक उष्ण

## राज्यात तापमानाचा पारा वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या दोन ते तीन दिवसांपासून राज्यातील तापमानाच्या पा-यामध्ये वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर शहरात सोमवारी (ता. ७ एप्रिल) सर्वाधिक ४६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर कोकणातही उष्ण आणि दमट वातावरण पुढील काही दिवस राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, राज्यातील तापमानाचा पारा हा ४० अंशाच्या पार गेला असून विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. परंतु, तापमानाचा पारा सातत्याने नवा उच्चांक गाठत असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडताना विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

यावर्षी संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक तापमान राहील व मध्य भारतात याचा अधिक प्रभाव राहणार आहे, असे भारतीय हवामान विभागाकडून जाहीर करण्यात आलेल्या अहवालातून सांगण्यात आले होते. पण त्याहीपेक्षा जास्त तापमानाची नोंद आता राज्यातील विविध जिल्ह्यांत करण्यात येत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

त्यामुळे वाढत्या तापमानात नागरिकांनी दुपारच्या वेळी घराच्या बाहेर पडणे टाळावे आणि प्रकृतीची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यातही विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद करण्यात येत असल्याने नागपूर मनपाने उष्णतेपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. परंतु, पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यातील अनेक भागात कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे. मुंबईतही पुढील काही दिवसांमध्ये उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.

पान १ वरून

### धावपट्टी विस्तारीकरणाचे काम 'फास्टट्रॅक'वर

अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत धावपट्टी विस्तारीकरण 'फास्टट्रॅक'वर करण्याचे निर्देश देऊन इतर बाबींचाही केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी आढावा घेतला.

याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, 'पुणे विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण करण्यात येणार असून यासाठी सैन्य दलाची आणि खासगी जागा प्रत्यक्षात किती लागणार आहे? याबाबत सविस्तर चर्चा केली. शिवाय हवाई दलाची विमानतळासाठी आवश्यक असणारी जागा ही विमानतळ प्राधिकरणाला मिळावी, या संदर्भातही चर्चा होत सदरील मागणीचा प्रस्ताव सैन्य दलाच्या मुख्यालयाकडे पाठवण्यासंदर्भात निर्णय झाला आहे. हवाई दलाच्या या जागेत विमानतळाच्या व्यवस्थापनासंदर्भात यंत्रणा उभी करणे शक्य होणार आहे. तसेच या बदल्यात विमानतळ प्राधिकरणाकडून हवाई दलाला पर्यायी जागा देण्यात येणार असून याबाबतच्या आस्थापनेचा खर्च विमानतळ प्राधिकरणाकडून केला जाणार आहे.

'महत्वाची बाब म्हणजे धावपट्टी विस्तारणीकरणामुळे विश्रांतवाडी ते लोहगाव हा विमानतळालगत असणारा रस्ता बाधित होणार असल्याने त्याला तातडीने पर्यायी मार्ग तयार करावा लागणार आहे. हा नियोजित पर्यायी रस्ता हवाई दलाच्या जागेतून जाणार आहे. या रस्त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली आणि या पर्यायी रस्त्याचा खर्च पुणे महापालिका करणार आहे. महापालिका आणि हवाई दल याबाबत समन्वय ठेवणार असून वेगाने ही प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे', असेही केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले.

### हर्षवर्धन पाटील ...

त्यांनी इंदापूर दौऱ्यावर असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदरातिथ्य केले तर मंगळवारी त्यांनी महसूल मंत्री तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठीनंतर त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी जोर धरला आहे. काँग्रेसमधून भाजपमध्ये गेल्यावर मला आता शांत झोप लागत आहे. कोणतीही चौकशी नाही, काही नाही. त्यामुळे आनंदात आहे, असे विधान काही वर्षांपूर्वी हर्षवर्धन पाटील यांनी केले होते. आता पुन्हा एकदा हर्षवर्धन पाटील यांच्या शांत झोपेची नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

### पुण्यात भोंगळ कारभार!

शाळांना देण्यात आला आहे.इयत्ता नववीची मराठी प्रथम भाषा ही परीक्षा उद्या होणार होती. प्रश्नपत्रिकेसोबत यात प्रश्न सोडवण्यासाठी उत्तरं असलेला एक व्हिडिओ एका युट्युब चॅनेलवर प्रसिद्ध झाल्याने खळबळ उडाल्याचं पहायला मिळालं. पुणे पोलिसात लवकरच गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. प्रश्नपत्रिकेसह उत्तरं सोडवायची कशी? याबाबतचा व्हिडिओ एक युट्युब चॅनेलवर दाखविण्यात आला होता. परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली असला तरीही सर्व शाळांमध्ये नियोजित वेळापत्रकाप्रमाणेच ही परीक्षा होणार असल्याचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे आता खळबळ उडाल्याचं पहायला मिळतंय. पोलीस आता कोणती कारवाई करणार यावर सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### पंढरीच्या वारीवर 'एआय'चे गारूड

एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते. आता प्रत्येक वर्षी होणा-या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेह-याची ओळखी द्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती, ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल. गर्दीची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील असल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली.

### घरकुलांसाठी ५ ब्रास वाळू मोफत

सरकारी बांधकामात एम सँड वाळूच वापरली जाईल. नदीच्या वाळूची गरज पडणार नाही. एम सँड धोरण पुढच्या कॅबिनेटमध्ये आणले जाईल. दगड आणि गिट्टीपासून ही वाळू तयार केली जाणार आहे, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली.

सिंधी समाजाला घरे आस्थापना अधिकृत करता येतील.१९४७ साली फाळणीत जे विस्थापित झाले, अशा सिंधी समाजाच्या राज्यात ३० वसाहती आहेत. नागपूर, जळगाव, मुंबई येथे या वसाहती आहेत. त्या कायदेशीर नाहीत. या सिंधी विस्थापितांसाठी विशेष धोरण आणले आहे. ज्यावेळी जमीन घेतली, त्यावेळचे रेडी रेकनर दर व १० टक्के इतर कर लावले जातील. या सर्व वसाहती क्लास वनमध्ये बदलण्यात येतील. आम्ही निवडणूक संकल्पनाम्यात हे वचन दिले होते, ते आज पाळले आहे. आजपासून सिंधी समाजाला ही घरे व आस्थापना अधिकृत करता येतील. त्यासाठी सिंधी समाज ज्या दिवशी विस्थापित झाला त्यावेळचा रेडी रेकनर दर, अडीच टक्के कर लावला जाईल, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली.

# 'शक्तिपीठ'साठी इंचही जमीन देणार नाही

## शेतकऱ्यांनी व्यक्त केला निर्धार; अधिकाऱ्यांना परत पाठवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** अंबाजोगाई येथे शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी आलेल्या अधिका-यांना शेतक-यांनी आणि महिलांनी जमिनीची मोजदाद न करता वापस पाठवले. यावेळी महिलांनी तीव्र भावना व्यक्त करताना, जमिनी घेऊ नका, वाटल्यास लाडकी म्हणून देत असलेले, दीड हजार रुपये देऊ नका, असा टोला महायुती सरकारला लगावला.

शक्तिपीठ महामार्ग हा राज्यातील सर्वांत मोठा ७६० किलोमीटरचा महामार्ग असणार आहे. बीड जिल्ह्यातून अंबाजोगाई आणि परळी येथून हा महामार्ग जात आहे. या महामार्गासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या मोजणीसाठी अधिकारी आले होते. त्यावेळी शेतकरी आणि महिलांनी तीव्र विरोध केला.

अंबाजोगाई तालुक्यातील पिंपळा, धायगुडा, भारज, गित्ता, वरवटी गावातील शेतक-यांनी एकत्र येत, अधिका-यांकडून जमिनीची सुरू असलेल्या मोजणीला विरोध केला. शेतकरी आणि महिलांनी एकत्र येत, 'शक्तिपीठ'साठी एक इंच देखील जमीन देणार नाही, असा इशारा अधिका-यांना दिला. जमिनीची मोजदाद देखील करून दिली नाही. अधिका-यांना शेतकरी आणि महिलांनी तेथून घालवून दिले.

शेतक-यांबरोबर महिलांनी शक्तिपीठ महामार्गाविरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. महिलांनी महायुती सरकारला विनंती करताना, सरकारने लाडक्या बहिणीच्या जमिनी घेऊ नयेत, वाटल्यास लाडकी म्हणून देत असलेले दीड हजार रुपये वापस घ्यावेत. पण आमच्या जमिनी घेऊ नयेत. जमिनी घेतल्या तर आम्ही काय खायचे? असा सवाल केला.

अंबाजोगाई येथे शेतकरी आणि महिलांनी घेतलेल्या भूमिकेला शेतकरी कामगार पक्षाने पाठिंबा दिला. शेतक-यांच्या बाजूने आक्रमक भूमिका घेऊ, आम्ही शेतक-यांच्या सोबत आहोत. वेळ पडली तर आम्ही आंदोलन करू, असा इशारा दिला. नागपूर ते गोवा जाणा-या या शक्तिपीठ महामार्गाला आता राज्यभरातील अनेक ठिकाणांहून विरोध होत आहे. कोल्हापूरमध्ये पहिल्यापासून या महामार्गाविरोधात शेतकरी आणि काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत विरोध सुरू ठेवला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, कै. शारदा केशव पाटील यांचे दि. २१/१२/२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांचे नावे आर.टी.ओ.पुणे येथे नोंद असलेली ॲटो रिक्षा क्रमांक एमएच १२ क्यूए १३८९ व त्यावरील परवाना क्रमांक - एमएच १२/१६/१३६७ असा आहे. तरी त्यांच्या पश्चात त्यांची कायदेशीर वारसदार म्हणून मी त्यांची नात गौरी सुनिल भुरुक आहे. रा. सव्हे नं. १६, शुभश्री आंगन तालिम, अंबेगाव पठार, धनकवडी, पुणे

तरी सदरील ॲटोरिक्षा व परमीट माझ्या नावावर करण्याकरिता आर.टी.ओ. पुणे येथे अर्ज करीत आहे. याबाबत कोणाची काही हरकत सबब तक्रार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसंत लेखी पुराव्यासह करावी. अन्यथा मागावून कोणाची कसलीही तक्रार सबब हरकत चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

अर्जदार : सौ. गौरी सुनील भुरुक
९२/७६४, लक्ष्मीनगर, पर्वती, पुणे - ०९.



### ई-निविदा अंतर्गत खुली निविदा सूचना क्रमांक ०२ सन २०२५-२०२६

ग्रामपंचायत कोरेगांव भिमा ता. शिरूर जि. पुणे यांचे तर्फे पुणे जिल्हा परिषद बांधकाम विभाग विभागातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून दि. ०९/०४/२०२५ सकाळी ११.०० वाजले पासून ते दि. १५/०४/२०२५ दु.०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन २ लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत व तांत्रिक निविदा दि. १६/०४/२०२५ दु. ०४.०० नंतर उघडणेत येईल.

| अ. क्रं. | कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी | नोंदणीकृत कंत्राटदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोनावणे दवाखाना ते पुणे नगर रोड भिमा नदीपर्यंत बंदिस्त गटर करणे. ता. शिरूर | १४८११२९/- | ५९०/- | १४८११/- | ६ महिने | |

टीप : १. सदर निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती तसेच मार्गदर्शक सूचना https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही /-
सरपंच, ग्रा.पं. कोरेगांव भिमा, ता.शिरूर जि.पुणे



### फॉर्म नं. आयएनसी - 26

कंपन्या (निगमन) नियम, 2014 च्या नियम 30 नुसार
केंद्र सरकारसमोर (प्रादेशिक संचालक पश्चिम प्रदेश)

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 13 च्या उप-कलम (4) आणि कंपनी (निगमन) नियम, 2014 च्या नियम 30 च्या उप-नियम (5) च्या खंड (अ) च्या बाबतीत

आणि

**प्रायोराईज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत, ज्याचे CIN: U72900PN2021PTC199579 आहे आणि ज्याचे नोंदणीकृत कार्यालय एस. क्रमांक 77/1/9, साई सिद्धी चैतबन सो., न्यू संघवी, पुणे - 411027, महाराष्ट्र, भारत** येथे आहे.

: याचिकाकर्ता

सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, कंपनी 20 मार्च 2025 रोजी गुरुवारी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सदस्यांनी मंजूर केलेल्या विशेष ठरावाची पुष्टी करण्यासाठी कंपनी केंद्र सरकार (प्रादेशिक संचालक पश्चिम प्रदेश) यांच्याकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. हा ठराव कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाचे - **सर्वे क्रमांक 77/1/9, साई सिद्धी चैतबन सो., न्यू संघवी, पुणे - 411027, महाराष्ट्र, भारत येथून पुंडलिक बाबा नगर, टॉवर लाईन, नवसरी, अमरावती - 444604, महाराष्ट्र, भारत** येथे स्थलांतर करण्याच्या प्रस्तावाशी संबंधित आहे. या बदलामुळे नोंदणीकृत कार्यालय पुणे येथील **रजिस्ट्रार ऑफ कंपनीज (आरओसी)** च्या अधिकार क्षेत्रातून मुंबई येथील **रजिस्ट्रार ऑफ कंपनीज (आरओसी)** च्या अधिकार क्षेत्रात हस्तांतरित होईल, तर महाराष्ट्र राज्यातच राहील.

कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील प्रस्तावित बदलामुळे ज्या व्यक्तीचे हित प्रभावित होण्याची शक्यता आहे, त्यांनी गुंतवणूकदार तक्रार फॉर्म दाखल करून MCA-21 पोर्टल (www.mca.gov.in) वर त्यांचे आक्षेप वितरित करावेत किंवा नोंदणीकृत पोस्टाने पाठवावेत ज्यामध्ये त्यांच्या हिताचे स्वरूप आणि विरोधाचे कारण नमूद करणारे प्रतिज्ञापत्र असेल. या सूचनेचे प्रकाशन झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत, पश्चिम क्षेत्राचे प्रादेशिक संचालक, एव्हरेस्ट 5 वा मजला, 100 मरीन ड्राइव्ह, मुंबई- 400002 या पत्त्यावर, अर्जदार कंपनीला त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात, हिताचे स्वरूप आणि विरोधाचे कारण यासह एक प्रत पाठवावी.

**नोंदणीकृत कार्यालय:** सर्वे क्रमांक 77/1/9, साई सिद्धी चैतबान सो., न्यू संघवी, पुणे - 411027, महाराष्ट्र भारत

**प्रायोराईज सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी आणि त्यांच्या वतीने**
**सही/-**
**मोईन खान हुसेन खान**
**संचालक**
**DIN: 09186219**
**पत्ता : सी/ओ हुसेन खान, वालगाव रोड**
**सोफियान नगर, अमरावती- 444601, महाराष्ट्र भारत**

दिनांक : 08/04/2025
स्थळ : पुणे

## सालियान यांच्या वकिलां विरोधात अवमान कारवाई



**मुंबई :** दिशा सालियान मृत्यू प्रकरणी पत्रकार परिषदेत हायकोर्टाच्या विद्यमान न्यायाधीशांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी वकील नीलेश ओझा यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने स्वत:हून अवमान कारवाई सुरू केली आहे. ओझा यांनी सतीश सालियान यांची बाजू मांडली असून त्यांनी आपली मुलगी दिशा सालियानच्या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी हायकोर्टात केली आहे.

## डोडाच्या उंच भागात लष्कराने वाढवली पाळत



**भदरवाह (जम्मू-काश्मीर) :** बर्फ वितळल्याने आणि पर्वतरांगा उघडल्यामुळे शांतता राखण्यासाठी आणि चिनाब खोऱ्यात घुसण्याचा दहशतवाद्यांचा कोणताही प्रयत्न हाणून पाडण्यासाठी लष्कराने जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातील घनदाट जंगलात पाळत वाढवली आहे. गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडून कठुआ जिल्ह्यात घुसखोरी करण्यात यशस्वी ठरलेल्या दहशतवाद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर भद्रवाह खोऱ्यातील उंचावरील भागात पाळत वाढवण्यात आली आहे. कठुआ गेल्या वर्षभरात उधमपूर, डोडा आणि किश्तवाड जिल्ह्यांच्या उंच भागात आणि पुढे काश्मीरमध्ये जाण्यासाठी पाकिस्तानस्थित दहशतवाद्यांसाठी घुसखोरीचा प्रमुख मार्ग म्हणून उदयास आला आहे.

## बारामुल्लात ब्राऊन शुगरसह एकाला अटक



**श्रीनगर :** बारामुल्ला जिल्ह्यात एका अमली पदार्थ विक्रेत्याला एक किलोपेक्षा जास्त ब्राऊन शुगरसह अटक करण्यात आली आहे. उत्तर काश्मीर जिल्ह्यातील बोनियार भागात ही अटक करण्यात आल्याची माहिती पोलिस प्रवक्त्याने दिली. बोनियारमधील बेरनेट येथील रहिवासी मंजूर अहमद मीर याला सोमवारी रात्री १.२० किलो अंमली पदार्थ आणि डिजिटल वजन यंत्रासह अटक करण्यात आली.

## मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी माकप खासदाराची ईडीकडून चौकशी



**कोची :** करुवन्नूर सर्व्हिस को-ऑपरेटिव्ह बँकेतील कथित गैरव्यवहारप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने केरळचे माकपचे खासदार के. राधाकृष्णन यांची मंगळवारी चौकशी केली. मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) दाखल करण्यात आलेल्या खटल्यात जबाब नोंदवण्यासाठी अलाथुर लोकसभा मतदारसंघातील ६० वर्षीय आमदार यांनी फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीच्या कार्यालयात साक्ष दिली. गेल्या महिन्यात खासदारांना समन्स बजावण्यात आले होते, परंतु गेल्या आठवड्यात संपलेल्या दिल्लीतील संसदेच्या अधिवेशनादरम्यान व्यस्ततेचे कारण देत त्यांनी साक्ष देण्यासाठी आणखी वेळ मागितला.

## राजस्थानमध्ये हलक्या पावसाचा हवामान विभागाचा अंदाज



**जयपूर :** राजस्थानमध्ये उष्णतेचा कडाका दोन ते तीन दिवस कायम राहणार असून, त्यानंतर हलक्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता हवामान खात्याच्या प्रवक्त्याने व्यक्त केली आहे. गेल्या काही दिवसांत जैसलमेर, बाडमेर, बिकानेर, चित्तौडगड आणि कोटा जिल्ह्यात कमाल तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदवले गेले. राज्याच्या उर्वरित बहुतांश भागात कमाल तापमान ४२ ते ४४ अंशांच्या आसपास होते, जे सरासरीपेक्षा ३ ते ८ अंशांनी अधिक होते.

# तामिळनाडू सरकारच्या विजयाचा दिवस!

## राज्यपालांच्या अधिकारांवर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आजचा दिवस तामिळनाडू सरकारसाठी मोठ्या विजयाचा दिवस आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल आर.एन. रवी यांच्या १० महत्त्वाच्या विधेयकांना मंजुरी न देता रोखून ठेवण्याच्या कृतीला 'बेकायदेशीर' आणि 'मनमानी' असे संबोधले आहे. "राज्यपालांनी हे पाऊल संविधानाविरुद्ध उचलले आहे त्यामुळे आम्ही त्यांचे सर्व निर्णय रद्द करत आहोत" असेही न्यायालयाने म्हटले. या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयालाकडून राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यपाल आर. एन. रवी यांनी अलिकडच्या काळात तामिळनाडू विधानसभेत १० विधेयकांना मान्यता देण्यास नकार दिला होता. त्यामुळे ती सर्व विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली होती. राज्य सरकारने राज्यपालांच्या या कृतीला संविधानाचे उल्लंघन असल्याचे म्हणत न्यायालयात आव्हान दिले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने निर्णायक निकाल दिला आहे आणि राज्यपालांचा निर्णय बेकायदेशीर आणि मनमानी असल्याचे घोषित केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आज सुनावणी करताना, 'राज्यपालांची ही कृती बेकायदेशीर होती आणि ती रद्द करण्यात आली आहे.' ही विधेयके राज्यपालांकडे पुन्हा पाठवल्याच्या तारखेपासून मंजूर होतील. राज्यपालांनी संविधानानुसार दिलेल्या अधिकारांचा योग्य वापर करावा आणि हे पाऊल संविधानानुसार उचलले जावे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

संविधानाच्या कलम २०० अंतर्गत, राज्यपालांना विधेयकांना मान्यता देण्याचा, रोखण्याचा किंवा राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा अधिकार आहे. जर राज्य विधानसभेने तेच विधेयक पुन्हा मंजूर केले तर राज्यपाल त्याला संमती देतात. परंतु, जर त्यांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय निर्णय घेतला तर तो वेळेच्या मर्यादेत आहे, अन्यथा ऐतिहासिक पुनरावलोकनाखाली त्याची तपासणी केली जाऊ शकते.



सर्वोच्च न्यायालयाचे नवे निर्देश राज्यपालांच्या निर्णयाच्या पुनरावलोकनात मते मांडता येतील असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने राज्यपालांसाठी एक अंतिम मुदत दिली आहे आणि म्हटले आहे की जर राज्यपालांनी एका महिन्यापर्यंत न्यायालयात निर्णय घेतला नाही तर त्यांच्या नोकऱ्यांची छाननी केली जाईल.

### राज्यपाल आणि सरकारमधील तणाव

राज्यपाल आणि तामिळनाडू सरकारमध्ये अनेक वेळा वाद झाले आहेत. राज्यपालांनी विधानसभेत अनेक वेळा स्वतःच्या सरकारवरही वाद घातला. २०२३ मध्ये, राज्यपालांनी विधानसभेच्या उद्घाटनादरम्यान राष्ट्रगीत गायले जाऊ नये म्हणून निषेध केला होता. यापूर्वी त्यांनी विधानसभेत काही महत्त्वाची भाषणे वाचून दाखवण्यास नकार दिला होता.

> 'हा केवळ तमिळ लोकांसाठीच नाही तर संपूर्ण देशासाठी एक मोठा विजय आहे.' या निर्णयावरून हे सिद्ध होते की राज्याला त्याचे स्वातंत्र्य आणि अधिकार मिळाले पाहिजेत. द्रमुक नेहमीच राज्याच्या स्वातंत्र्यासाठी आणि संघराज्य व्यवस्था राखण्यासाठी लढेल."
>
> **-एमके स्टॅलिन**
> मुख्यमंत्री. तामिळनाडू

# निर्णयांची छाननी हे न्यायालयाचे काम नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा ममता बॅनर्जींना दिलासा





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कॅबिनेटने घेतलेल्या निर्णयांची छाननी करणे हे न्यायालयाचे काम नाही. कलकत्ता उच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने हे महत्त्वाचे भाष्य केले आहे. न्यायालयाने ममता सरकारला दिलासा देत २५ हजार शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याच्या निर्णयाची सीबीआय चौकशीची गरज नसल्याचे म्हटले आहे. अतिरिक्त भरतीसाठी पदे निर्माण करणे चुकीचे असल्याचा निकाल देत उच्च न्यायालयाने मंत्रिमंडळाच्या निर्णयाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात सीबीआय चौकशीची गरज नसल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर न्यायालयाने मंत्रिमंडळाच्या निर्णयांची छाननी करू नये, असेही खंडपीठाने म्हटले आहे. हे त्यांचे काम नाही.

पश्चिम बंगालमध्ये २५ हजार शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया कलंकित असून भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, असे सांगत कोलकाता उच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात ही भरती रद्द केली होती. मात्र, आता खंडपीठाने ममता बॅनर्जी सरकारलाही काहीसा दिलासा दिला आहे. शिक्षक भरती रद्द करण्यात आल्याने, ममता सरकारवर टीकेची झोड उठली होती.

सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, न्यायालयालाही काही मर्यादा आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत ज्या प्रकरणांमध्ये निर्णय घेण्यात आला, अशा प्रकरणांच्या चौकशीचे आदेश देता येणार नाहीत. न्यायालयाच्या निर्णयाबाबत ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या की, मी न्यायालयाचा आदर करते, पण हा निर्णय मान्य नाही. इतकंच नाही तर भाजपशासित मध्य प्रदेशात व्यापमंसारखा घोटाळा झाला, पण कुणालाही शिक्षा झाली नाही, असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. आम्ही माजी शिक्षणमंत्र्यांना हटवले आणि त्यांना तुरुंगात जावे लागले. व्यापमं प्रकरणात तुरुंगात कोण गेले? इतकंच नाही तर नीट परीक्षेतही घोटाळा झाल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला. याशिवाय भाजप आणि माकपने मिळून बंगालची शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचे षडयंत्र रचले आहे, असा आरोपही त्यांनी केला. खरं तर पश्चिम बंगालमध्ये 23 लाख उमेदवारांनी शिक्षक भरतीसाठी परीक्षा दिली होती. २०१६ मध्ये ही भरती झाली असून २४ हजार ६४० पदांसाठी अधिसूचना काढण्यात आली होती.



# फुटीरतावादी हुर्रियतपासून झाले दूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीर इस्लामिक पॉलिटिकल पार्टी, जम्मू-काश्मीर मुस्लिम डेमोक्रॅटिक लीग आणि काश्मीर फ्रीडम फ्रंट यांनी फुटीरतावादी संघटना हुर्रियत कॉन्फरन्सपासून स्वत:ला दूर ठेवले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी सांगितले. हे पाऊल लोकांचा राज्यघटनेवरील विश्वास दर्शवते, असे शहा म्हणाले. शहा तीन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर असताना ही घोषणा करण्यात आली आहे.

'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अखंड आणि शक्तिशाली भारताचे स्वप्न आज अधिक बळकट झाले असून, आतापर्यंत ११ संघटनांनी फुटीरतावाद सोडून या व्हिजनला अढळ पाठिंबा दर्शविला आहे,' असे अमित शहा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर लिहिले आहे. अमित शहा यांनी सोमवारी जम्मू-काश्मीरमधील भारत-पाक आंतरराष्ट्रीय सीमेवरील फॉरवर्ड पोस्टला भेट दिली. मंगळवारी ते केंद्रशासित प्रदेशातील सुरक्षा स्थितीचा आढावा घेणार आहेत.

कोणत्याही फुटीरतावादी संघटनेशी संबंधित असणाऱ्यांवर जम्मू-काश्मीरमधील पोलिस कंबर कसत आहेत. पोलिसांनी अनेक फुटीरतावाद्यांच्या घरांवर छापे टाकून त्यांच्याविरोधात पुरावे गोळा केले आहेत. जम्मू-काश्मीर पीपल्स मूव्हमेंट (जेकेपीएम) आणि जम्मू-काश्मीर डेमोक्रॅटिक पॉलिटिकल मूव्हमेंट (जेकेडीपीएम) या दोन फुटीरतावादी संघटनांनी २५ मार्च रोजी हुर्रियतशी संबंध तोडत असल्याचे जाहीर केले होते. यानंतर २७ मार्च रोजी अमित शहा यांनी दोन्ही संघटनांच्या या निर्णयाचे स्वागत केले. याशिवाय जम्मू-काश्मीर तेहरीक-ए-इस्तिकलाल आणि जम्मू-काश्मीर तेहरीक-ए-इस्तिकमत या पक्षांनीही हुर्रियतपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे.

# सिंगापूर येथे पवन कल्याणचा मुलगा जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सिंगापूरमधील रिव्हर व्हॅली रोडवरील एका तीन मजली दुकानाला मंगळवारी सकाळी पावणेनऊच्या सुमारास भीषण आग लागली. सिंगापूर सिव्हिल डिफेन्स फोर्सने सांगितले की, ही आग इमारतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर पसरली आणि तीन वॉटर जेटच्या मदतीने सुमारे ३० मिनिटांत विझवण्यात आली. या दुर्घटनेत आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्या धाकट्या मुलासह १५ मुलांसह १९ जण जखमी झाले आहेत. सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पवन कल्याण यांच्या मुलाच्या हाताला आणि पायाला जखम झाली आहे.

सिंगापूरमधील रिव्हर व्हॅली रोडवर लागलेल्या आगीत पवन कल्याण यांचा मुलगा जखमी झाला असून, त्याच्या हाताला आणि पायाला दुखापत झाली आहे. त्याच्यावर सिंगापूरच्या स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे पक्षाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. आगीचे कारण उशीरापर्यंत कळले नव्हते. पवन कल्याण सध्या आंध्र प्रदेशातील अल्लूरी सीताराम राजू जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांना आपला दौरा रद्द करून तातडीने सिंगापूरला रवाना होण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र, ते नियोजित कार्यक्रम पूर्ण करणार आहेत. यानंतर ते सिंगापूरला रवाना होतील.



**प्योंगयांग** उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांनी उत्तर कोरियातील एका लष्करी प्रशिक्षण तळाला भेट दिली.

# भारत-श्रीलंका मैत्रीच्या नव्या पर्वाला सुरुवात



आंतरराष्ट्रीय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी पोर्ट ऑपरेटर कंपनी अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकोनॉमिक झोन लिमिटेडनं कोलंबो बंदरावरील कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनलचं ऑपरेशन सुरु करण्याची घोषणा केली आहे.

हे टर्मिनल सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागिदारीमध्ये विकसित करण्यात आले आहे. अदाणी पोर्ट्स, श्रीलंकेतील प्रमुख कंपनी जॉन किल्स होल्डिंग्स पीएलसी आणि श्रीलंका पोर्ट्स अथॉरिटी मिळून याचं संचालन करत आहेत. हा प्रकल्प ३५ वर्षांचा असून बांधा, वापर आणि हस्तांतर करा अंतर्गत संचालित होणार आहे.

या योजनेमध्ये ८०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली आहे. यामध्ये आणि १,४०० मीटर लांब आणि २० मीटर खोलीच्या घाटासह, टर्मिनल वार्षिक ३.२ दशलक्ष टीईयू (वीस-फूट समतुल्य युनिट्स) हाताळण्याची याची क्षमता आहे. हे कोलंबोमधील पहिले डीप वॉटर टर्मिनल आहे. जे पूर्णपणे स्वयंचलित आहे. या टर्मिनलची रचना कार्गो हाताळणी क्षमता वाढविण्यासाठी, जहाजांच्या वळणाच्या वेळेत सुधारणा करण्यासाठी आणि दक्षिण आशियातील प्रमुख ट्रान्सशिपमेंट हब म्हणून बंदराची स्थिती सुधारण्यासाठी करण्यात आली.

या प्रकल्पाच्या निर्मितीचे काम २०२२ साली सुरु करण्यात आले. त्यामध्ये वेगानं प्रगती झाली आहे. अत्याधुनिक पायाभूत सुविधा स्थापन करण्याची क्षमता पूर्ण होत आहे. प्रादेशिक सागरी लॉजिस्टिकमध्ये ऑपरेशनल कार्यक्षमता आणि विश्वासार्हतेमध्ये नवीन मानके स्थापित करण्यासाठी ते सज्ज आहे.

अदाणी समूहाचे संचालक गौतम अदाणी यांनी सांगितलं की, येथील कामकाजाची सुरुवात हा भारत आणि श्रीलंका यांच्यातील सहकार्यातील एक मैलाचा दगड आहे. हे टर्मिनल केवळ हिंदी महासागरातील व्यापाराच्या भविष्याचेच प्रतिनिधित्व करत नाही, तर त्याचे उद्घाटन श्रीलंकेसाठी एक अभिमानास्पद क्षण आहे.

या प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर हजारो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण होतील. तसंच सागरी राष्ट्रासाठी मोठ्या आर्थिक संधी निर्माण होतील. हे दोन शेजारी देशांमधील सखोल मैत्री आणि वाढत्या धोरणात्मक संबंधांचे उदाहरण आहे.

जगात कुठंही मोठ्या प्रमाणात महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्याची अदाणी समुहाची क्षमता हा जागतिक स्तरावरील प्रकल्प विकसित केल्यानं दिसून आली आहे.

# उजनीत केवळ ११ टीएमसी पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** उजनी धरणातून सोलापूर जिल्ह्यासाठी सिंचनाबरोबर पिण्यासाठी पाण्याचे आवर्तन सुरू असल्याने उजनी धरणातून झपाट्याने पाणीसाठा कमी होत आहे. सध्या उजनी धरणातील पाणीसाठा २० टक्क्यांवर आला असून धरणात ११ टीएमसी उपयुक्त पाणी साठा शिल्लक आहे. वाढत्या उन्हामुळे पिकाला सतत पाणी देण्याचे वेळ येत आहे. त्यामुळे पिकाची तहान भागवण्यासाठी शेतकरी धडपड करत आहे.

सध्या उजनी धरणातून २९५० क्युसेकने कालव्यामध्ये पाण्याचा विसर्ग सुरु आहे. यासोबत इतर पाणी योजना, बाष्पीभवन यामुळे उजनीतून झपाट्याने पाणीसाठा कमी होत आहे. धरणातून पाणीसाठा कमी झाल्याने पिकाला पाणी देण्यासाठी शेतकरी पाईप व केबल वाढवून पिकाला पाणी देण्यासाठी धडपड करत आहे. सध्या उजनी काठावर अनेक शेतकऱ्यांनी नदी पात्रात चाऱ्या काढून विद्युत पंपापर्यंत पाणी आणण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या पाणीसाठा अधिकच खालावल्याने आता पाणी देताना चारीचा आधार घेण्याची वेळ बळीराजावर आली आहे.

दरवर्षी धरणग्रस्त शेतकऱ्याच्या नशिबातच पाण्यासाठी संघर्ष लिहिला असल्याचं मत अरविंद जगताप यांनी व्यक्त केल. उजनी काठावरील धरणग्रस्त शेतकरी संघटित नसल्यामुळे राजकीय नेते मंडळी याचा फायदा घेऊन केवळ मतांचं राजकारण करून या भागातील शेतकऱ्यांचा मतापुरता वापर करून घेतात;

मात्र धरणग्रस्तांच्या हक्काच्या पाण्यासाठी ठोस काम करत नाहीत. हीच परिस्थिती गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. दरवर्षी पाईप, केबल व चाऱ्या काढण्यासाठी शेतकऱ्याला लाखो रुपये खर्च करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती अधिकच खालावत आहे.

मूळ सिंचन आराखड्यात राखीव पाण्याची तरतूद आली तरी या भागातील शेतकरी पाण्याची मागणी करत नाहीत. पाणीपट्टी भरण्यास कमी पडत असल्याने उजनी धरणग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचं पाणी आजपर्यंत राखीव ठेवता आल नाही.



> २० जुलै २०१९ च्या शासन निर्णयांनुसार राज्यातील सर्व धरणांतील पाण्याच्या वापराबाबत प्राधान्यक्रम ठरवण्यात आला आहे. त्यानुसार पशुधन, पिण्यासाठी, आरोग्य व घरगुती वापरासाठी प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानंतर कृषी (सिंचनाकरिता वापर), नंतर औद्योगिक वापर, पर्यावरण, करमणूक व शेवटी इतर वापर असा प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे सध्या सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांना पाइपलाइन पूर्ण होईपर्यंत नदीपात्रातून पिण्यासाठी पाणी द्यावे लागत आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. हेच पाणी धरणग्रस्तांसाठी राखीव ठेवता येणे शक्य होईल.
>
> **-रावसाहेब मोरे**
> कार्यकारी अभियंता उजनी धरण

> उजनीतील हक्कच पाणी मिळवण्यासाठी उजनी काठावरील शेतकऱ्यांनी एकत्र आले पाहिजे. याबाबत न्यायालयीन लढाई लढल्याशिवाय पर्याय नाही.
>
> **अरविंद जगताप**
> उजनी धरणग्रस्त संघर्ष समिती

## दोंदे येथे रामजन्म उत्सव साजरा



**खेड :** दोंदे, ता. खेड येथे श्री काळभैरवनाथ महाराज व राम जन्मोत्सवाच्या निमित्ताने रविवारी यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी भैरवनाथ महाराजांचा छबिना, राम जन्मोत्सवा निम्मित ह.भ.प. सुखदेव महाराज गोपाळे यांची कीर्तन रूपी सेवा संपन्न झाली. श्री रामजन्म उत्सवातील पाळण्याची दोरी ओढण्याचा मान डॉक्टर दत्ता कोहिनकर, संदिप कोहिणकर आणि माणिक कोहिणकर यांना मिळाला. यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये १६८ बैलगाडा मालकांनी सहभाग घेतला. आमदार बाबाजी काळे, खेड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील , माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, इंजिनीयर दिलीप मेदगे , खरेदी-विक्री संघाचे नवनिर्वाचित संचालक हिरामण सातकर, दत्तात्रय शितोळे, विनायक घुमटकर , दत्ता सातपुते,भास्कर जगदाळे या मान्यवरांनी बैलगाडा घाटाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. सोमवारी सायंकाळी कुस्त्यांचा जंगी आखाडा आणि रात्री मनोरंजनासाठी गौतमी पाटील यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम होणार आहे. यात्रा कमिटी अध्यक्ष स्वप्नील मेहेत्रे,सरपंच प्रतीक्षा दत्तात्रय दरवडे, भरत उढाणे, चंद्रकांत बारणे, हनुमंत कदम, सिद्धार्थ कोहिणकर, निशांत बारणे आदीनी यात्रा उत्सवाचे नियोजन केले.

## माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या अध्यक्षपदी भगत



**खेड :** खेड तालुका माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी दोंदे येथील भैरवनाथ विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक किशोर भगत यांची तर सचिवपदी सुमंत विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक अरविंद गवळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी कुंडलिक गारगोटे तर खजिनदार पदी भरत म्हसे यांची निवड झाली. पतसंस्थेच्या अध्यक्षा वैशाली चौधरी व सचिव ज्ञानेश्वरी तितर यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदावर किशोर भगत यांची अध्यक्ष व अरविंद गवळे यांची सचिव म्हणून बिनविरोध निवड झाली. तसेच उपाध्यक्ष रामदास रेटवडे व खजिनदार लतिफ शेख यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर उपाध्यक्ष म्हणून कुंडलिक गारगोटे तर खजिनदारपदी भरत म्हसे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिका-यांचा खेड तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे व रेटवडीचे सरपंच दिलीप डुबे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी मावळत्या अध्यक्षा वैशाली चौधरी पाटील, सचिव ज्ञानेश्वरी पुजारी, खेड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर,खेड तालुका गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष योगेश माळशिरसकर, उपाध्यक्ष काशिनाथ पोखरकर,पुणे जिल्हा क्रीडा शिक्षक संघटनेचे सचिव रामदास रेटवडे, तालुका मुख्याध्यापक व संचालक विष्णू मेदगे, रविंद्र चौधरी,पांडूरंग वारे, लतिफ शेख उपस्थित होते.

## कामाला नेण्याच्या बहाण्याने युवकाला लुटले



**शिक्रापूर :** कारेगाव, ता. शिरुर येथील कामगार नाका येथे महेश वारके हा युवक दुचाकीहुन काम शोधण्यासाठी गलेला असता, तेथे दोन इसमांनी आमच्याकडे काम आहे, असे म्हणून महेश यास रामलिंग रस्त्याने निर्जन स्थळी घेऊन जात, लघुशंकेच्या बहाण्याने थांबवून दमदाटी करत मारहाण करुन त्याच्या जवळील दुचाकी तसेच खिशातील मोबाईल काढून घेत पोबारा केला. याबाबत महेश ईश्वर वारके (३३) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी दोन अज्ञान इसमांवर गुन्हा दाखल आहे.

# उन्हाळ्यात आळंदीकर पाणीटंचाईने त्रस्त

## नगरपरिषदेसमोर ठिय्या देत केला संताप व्यक्त




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या आळंदी शहरात पाणीटंचाईने नागरिकांचे हाल बेहाल झाले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून चार ते पाच दिवसांआड केवळ एक ते दीड तासच पाणीपुरवठा होत असल्याने पिण्यासह दैनंदिन गरजांसाठीही पाण्याची वानवण नागरिकांना भेडसावत आहे. या अनियमित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या आळंदीकरांनी सोमवारी नगरपरिषदेसमोर ठिय्या आंदोलन करत आपला संताप व्यक्त केला.

या आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनी अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले. नवीन गृहप्रकल्प, हॉटेल्स आणि धर्मशाळांना दहा ते वीस अनधिकृत नळजोडण्या देऊनही केवळ एकाच कनेक्शनची पाणीपट्टी आकारली जाते. शिवाय, पालिका हद्दीबाहेरील अनधिकृत नळजोडण्यांकडून कोणतीही पाणीपट्टी वसूल केली जात नाही. पाणीपुरवठ्याच्या दुरुस्तीदरम्यान नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था नसल्यानेही संताप वाढला आहे. ग्रामस्थांनी मागणी केली की, अनधिकृत कनेक्शन्स अधिकृत करून पाणीपट्टी वसूल करावी आणि पालिका कर्मचाऱ्यांना पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे स्पष्ट आदेश द्यावेत.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी मागील मुख्याधिकारी कैलास केंद्रे आणि आमदार बाबाजी काळे यांच्या बैठकीचा आढावा घेत लवकरच या समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी त्यांना निवेदन सादर करत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.



### ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

- कायमस्वरूपी अधिकारी नियुक्ती: पाणीपुरवठा विभागप्रमुख म्हणून आळंदीची पूर्ण माहिती असलेल्या पुरुष अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. पाइपलाइनचे काम त्वरित सुरू करा: इंद्रायणी नगर ते वाय जंक्शन पाइपलाइनचे काम तातडीने सुरू करावे, जेणेकरून शहराला नियमित पाणी मिळेल.

# नागरिकांना सेवा देणे हीच कामाची पावती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** नागरिकांना सेवा सुविधा उपलब्ध करून देणे, समाजाची सेवा करणे गरजवंताची गरज पूर्ण करणे व त्यांचे आशीर्वाद घेणे हीच खरी आपल्या कामाची पावती असल्याचे प्रतिपादन जुन्नर चे आमदार शरद सोनवणे रांजणगाव गणपती येथे केले. रांजणगाव गणपती येथे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे यांनी शिवसेना १ ऑगस्ट २०२४ ते ५ ऑगस्ट २०२४ दरम्यान रेशनकार्डचे शिबीर घेतले होते. त्यात शिरुर तालुक्यातील अनेक गावातील लोकांची कागदपत्राची पूर्तता केली होती. त्या सर्व रेशनिंग कार्डचे वितरण नुकतेच आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यात शिक्रापुर, सणसवाडी, कोंढापुरी, रांजणगाव गणपती, सोनेसांगवी, ढोकसांगवी, करंजावणे, भांबर्डे, टाकळी हाजी, केंदुर, न्हावरे, पिंपरखेड, मोराची चिंचोली, बाभुळसर, खंडाळे, गणेगाव खालसा, पिंपरी दुमाला, निमगाव म्हाळुंगी तसेच अनेक गावची सर्वसामान्य रेशनकार्ड धारक उपस्थित होते. या प्रसंगी शिवसेना महिला आघाडी शिरुर लोकसभा मतदार संघाच्या संपर्कप्रमुख सारीका पवार, शिरूर तालुका प्रमुख मल्हारी काळे, मराठा महासंघाच्या जिल्हा संपर्कप्रमुख सुरेखा निघोट, माजी पंचायत सदस्य विक्रम पाचुंदकर, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक आण्णा हजारे, रांजणगावच्या लोकनियुक्त सरपंच सुवर्णा वायदंडे, सोनेसांगवीच्या लोकनियुक्त सरपंच रेखा काळे, निलेश लांडे, विष्णु साळुंखे, नेताजी फंड, राहुल पवार, आत्माराम खेडकर, युवासेना जिल्हा संघटक वैभव खेडकर, युवासेना जिल्हा चिटणीस वैभव ढोकले यांसह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश शिंदे व रोहिदास खेडकर यांनी केले.

# जेजुरीत भाजपाच्या वतीने विविध उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** भारतीय जनता पार्टी जेजुरी शहरच्या वतीने रामनवमीच्या निमित्ताने श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन, भारतीय जनता पार्टीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी तसेच दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून भाजपाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

भारतीय जनता पार्टी वर्धापन दिनानिमित्त ऑनलाईन सभेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री बावनकुळे राज्याचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण महामंत्री राजेश पांडे यांनी संबोधित केले.

ऑनलाइन सभा संपल्यानंतर महामंत्री राजेश पांडे तसेच पश्चिम महाराष्ट्र प्रमुख रवींद्र अनासपुरे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून रामनवमीच्या व भारतीय जनता पार्टी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला प्रमुख जेजुरी शहर प्रभारी प्रोटोकॉल अधिकारी सुनील पांडे, पुणे जिल्हा कार्यकारणी सदस्य सचिन पेशवे, ज्येष्ठ नेते प्रसाद अत्रे, पुरंदर तालुका महिला अध्यक्ष मंगल पवार, भाजपाच्या कोल्हापूर प्रभारी अध्यक्ष अलका शिंदे, पदाधिकारी विक्रम माळवदकर, शिवाजी बारसुडे, हरिश्चंद्र भापकर, विजय पवार, स्वानंद अत्रे आदी उपस्थित होते.



# नीरा खोऱ्यात समाधानकारक पाणी; चारही धरणांत १९ टीएमसी साठा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** नीरा खो-यातील नीरा देवधर, भाटघर, वीर, गुंजवणी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गत वर्षी समाधानकारक पाऊस पडला. तसेच परतीच्या पावसानेही दमदार हजेरी लावली होती. परिणामी ऑगस्ट २०२४ मध्ये नीरा खो-यातील चारही धरणे शंभर टक्के भरली होती. तसेच धरणातील जादा पाणी नीरा नदीत सोडल्याने नीरा नदीला महापूर आला होता. दरम्यान, नीरा खोऱ्यातील चारही धरणांत मंगळवारी (दि. ८) १९.०९७ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होता. तर गतवर्षापेक्षा साडेनऊ टक्क्यांनी पाणीसाठा असल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. नीरा खो-यात यंदा पाणीसाठा असल्यामुळे सिंचन क्षेत्रातील शेतक-यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

नीरा खोऱ्यातील नीरा देवधर, भाटघर, वीर, गुंजवणी मंगळवारी (दि. ८) सकाळी सहा वाजता १९.०९७ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होता. तर गतवर्षापेक्षा साडेनऊ टक्क्यांनी पाणीसाठा उपलब्ध होता.

**भाटघर धरणामध्ये ८.८२९ टीएमसी**

पुरंदर, खंडाळा, फलटण, बारामती, इंदापूर, माळशिरस तालुक्यांना वरदान ठरलेले व २३.५० टीएमसी क्षमतेचे असलले ब्रिटीशकाशीन भाटघर धरणामध्ये मंगळवारी (दि. ८) सकाळी सहा वाजता ८.८२९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा म्हणजेच ३७.५७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी ५.०७५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात २१.५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता.

**नीरा - देवघर धरणात ३.४१० टीएमसी**

पुणे, सातारा आणि सोलापुर जिल्ह्याला वरदान ठरलेले तसेच ११.७२९ टीएमसी पाणीसाठा क्षमतेच्या नीरा देवघर धरणांत ३.४१० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा म्हणजेच २९.०७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी ३.६०० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात ३०.६९ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता.

**वीर धरणांत ५.२५१ टीएमसी पाणीसाठा**

पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील ९.४०८ टीएमसी पाणीसाठा क्षमता असलेल्या वीर धरणांत ५.२५१ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा म्हणजेच ५५.८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी वीर धरणांत ४.४१४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात ४६.९२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

वीर धरणात सध्या ५५.८१ टक्के पाणीसाठाअसल्याने धरणाच्या नीरा उजव्या कालव्यातून १,५५० क्युसेक्सने उन्हाळी आवर्तन सुरू आहे. नीरा उजव्या कालव्यातील पाण्याचा खंडाळा, फलटण, नातेपुते, अकलुज, माळशिरस, सांगोला, पंढरपुर तालुक्यातील लाभधारक सिंचनक्षेत्राला लाभ मिळत असतो, तर वीर धरणाच्या नीरा डाव्या कालव्यातून सध्या ८२७ क्युसेक्सने उन्हाळी आवर्तन सुरू आहे. या आवर्तनाचा पुरंदर, बारामती व इंदापूर तालुक्यातील लाभधारक सिंचन क्षेत्राला लाभ मिळत असतो. उन्हाळी आवर्तन नीरा उजव्या व डाव्या कालव्यातून जुन महिन्याअखेर पर्यंत सुरू राहणार असल्याचे वीर धरणाच्या सुत्रांकडून सांगण्यात आले.

गुंजवणी धरणामध्ये १.६०७ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात ४३.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी १.३८७ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात ३७.५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता.

नीरा खोऱ्यातील धरणांमध्ये गतवर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे यंदा पाणी साठ्याची स्थिती आकडेवारीवरून समाधानकारक असल्याचे दिसत आहे.

दरम्यान, नीरा खो-यातील ४८.३२९ टीएमसी क्षमता असलेल्या चारही धरणांत एकूण १८.०९७ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा म्हणजेच ३९.५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी या चारही धरणांत १४.४७६ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा अर्थात २९.९५ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. परिणामी पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागला असला, तरी यावर्षी उन्हाळादेखील कडक आहे. आगामी महिन्यांमध्ये तर उष्णतेच्या लाटा येणार असल्याचे हवामान खात्याकडून अंदाज वर्तविण्यात येत आहे. मात्र, यंदा समाधानकारक पाऊस पडणे गरजेचे आहे.

# बारामतीत सावकाराचा खून

## २ आरोपी खेडला जेरबंद, चाकण पोलिसांची कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** व्याजाच्या पैशांच्या वादातून बारामती तालुक्यात सावकाराचा खून करून पळालेल्या दोघांना चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत बहुळ (ता. खेड) गावाच्या हद्दीत डोंगरात लपून बसलेले असताना चाकण पोलिसांनी अटक केली आहे. रोहित गाडेकर ( वय २७ रा. मासाळवस्ती-सोरटेवाडी ता.बारामती ) असे शनिवारी रात्री बारामती तालुक्यात खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर खून करणारे सागर वसंत माने (२५) व विक्रम काकासो मासाळ (३०, दोघे रा. सोमेश्वर नगर, सोरटेवाडी ता. बारामती) अशी बहुळ ( ता. खेड) येथे अटक केलेल्या दोघांची नावे आहेत.

बारामती तालुक्यातील सोरटेवाडी गावाच्या हद्दीत शनिवारी एका २७ वर्षीय तरुणाचा धारदार शास्त्राने वार करत खून केल्याची घटना घडली होती. रोहित गाडेकर (वय २७, रा. मासाळवस्ती-सोरटेवाडी ता. बारामती ) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. आर्थिक व्यवहारातून सदरचा खून झाल्याची बाब समोर आली होती. सोरटेवाडी (कुलकर्णी चारी) येथे आरोपींनी रोहित गाडेकर यांच्या छातीवर व मानेवर वार करून खून केला होता.



चाकण पोलिसांनी जेरबंद केलेले आरोपी. ( छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

रविवारी (दि. ६) गोपनीय बातमीदार यांच्या मार्फत चाकण पोलिसांना माहिती मिळाली की, वडगाव निंबाळकर येथील रोहित सुरेश गाडेकर याचा खून झाला होता, यातील अज्ञात आरोपी हे बहुळ (ता. खेड) येथे एका ठिकाणी डोंगरावरील गोठ्यावर लपून बसले आहेत. त्यानंतर चाकण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रसन्न जऱ्हाड, पोलीस अंमलदार हनुमंत कांबळे, सुनील भागवत, रेवन खेडकर, शरद खेरणार, महेश कोळी यांचे पथक बहुळ गावात पोहचले. दोन्ही आरोपी पोलिसांना पाहून रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन पळून जाऊ लागले. पोलिसांच्या पथकाने गोठ्यातून पळून जाताना पाठलाग करून दोघांना ताब्यात घेतले. संशयित आरोपी सागर वसंत माने व विक्रम काकासो मासाळ यांनी सदरच्या खुनाच्या गुन्हयाची कबूली दिली आहे. रोहित सुरेश गाडेकर याने आरोपीना दिलेल्या व्याजाच्या पैश्याचा तगादा लावून आरोपींना मारहाण करत होता. त्याच वादाच्या कारणावरून आरोपींनी कोयत्याने मारहाण करून रोहित गाडेकर यास जीवे ठार मारून खून केला असल्याची माहिती चाकण पोलिसांना दिली. पुणे ग्रामीण मधील वडगाव निंबाळकर पोलिसांना या बाबत चाकण पोलिसांनी कळवले आहे.

खुनाच्या घटनेतील संशयित आरोपी चाकण जवळील मेदनकरवाडी भागात सुमारे १० वर्षांपूर्वी वास्तव्यास होते. त्यामुळे त्यांना चाकण परिसराची माहिती होती. त्यामुळे त्यांनी खून केल्यानंतर लपण्यासाठी चाकण जवळील बहुळ मध्ये येऊन आसरा घेतला होता. मात्र या दोन्ही आरोपींना चाकण पोलिसांनी जेरबंद केले आहे. चाकण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रसन्न जऱ्हाड व त्यांच्या पथकाने केलेल्या कारवाईचे कौतुक होत आहे.

---

## आरोग्य दिनानिमित्त राजगुरुनगरमध्ये जनजागृती



**खेड :** जागतिकआरोग्य दिनानिमित्त राजगुरुनगर मेडिकल प्रॅक्टिशनर्स एसोसिएशन वतीने सोमवारी राजगुरुनगर शहरातून आरोग्यविषयक जनजागृतीसाठीसायकल रॅली काढण्यात आली. जागतिक आरोग्य संघटनेने या वर्षी "निरोगी सुरुवात,आशादायी भविष्य" हे ब्रीदवाक्य घेत जगभर आरोग्य विषयक जनजागगृती करण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये प्रामुख्याने माता आणि बालमृत्यू रोखणे या साठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर मेडिकल प्रॅक्टिशनर्स एसोसिएशनच्यावतीने राजगुरुनगर शहरातुन आरोग्य विषयक जनजागृतीसाठी सायकल रॅली काढण्यात आली. खेड पंचायत समितीमधून या रॅलीला मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ प्रमिला बांबळे, डॉ प्रदीप शेवाळे यांनी झेंडा दाखवून सुरुवात झाली. या रॅलीत राजगुरुनगर शहरातील जेष्ठ तज्ञ डॉक्टर सहभागी झाले होते यामध्ये डॉ सुभाष खडके, डॉ. प्रदीप शेवाळे, डॉ शिवाजी गायकवाड, डॉ माणिक बिचकर, डॉ विलास काजळे, डॉ मिलिंद बिचकर, डॉ दिलीप बांबळे,राजगुरुनगर मेडिकल प्रॅक्टिशनर्स एसोसिएशन अध्यक्ष डॉ प्रमिला बांबळे,उपाध्यक्ष डॉ रेणुका ठोंबरे, सचिव डॉ शीतल पवार, सहसहसचिव डॉ नितीन सुपेकर, डॉ स्नेहल तांबे,डॉ शेखर घुमटकर, डॉ महेश टाकळकर, डॉ पोर्णिमा कहाणे, डॉ मीनाक्षी भुजबळ, डॉ रोहन साळुंके, डॉ उदय पवार, डॉ कुणाल तांबे यांच्यासह संघटनेचे सर्व डॉक्टर सहभागी झाले.

## परशुराम आपटे जयंतीनिमित्त राऊत यांचे व्याख्यान



**खेड :** राजगुरुनगर सहकारी बँकेचे संस्थापक व पहिले अध्यक्ष स्व. परशुराम भगीरथ आपटे यांची जयंती रविवारी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांचे 'मित्र वणव्या मध्ये गारव्या सारखा..!' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. राजगुरुनगर नगरपरिषदेजवळील भारत माता व्यासपीठावर झालेल्या या कार्यक्रमाला बँकेचे सभासद आणि शहर परिसरातील नागरिकांनी भरगच्च उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी अनंत राऊत यांच्या हस्ते स्व. परशुराम आपटे आणि हुतात्मा राजगुरू यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी प्रास्ताविकात बँकेच्या प्रगतीचा आढावा सादर केला. या कार्यक्रमात बँकेचे उपाध्यक्ष अविनाश कहाणे, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष किरण आहेर, संचालक राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, सागर पाटोळे, समीर आहेर, अश्विनी पाचारणे, विजय डोळस, सचिन मांजरे, रामदास धनवटे, अ‍ॅड. सुरेश कौदरे, महेश शेवकरी, मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे, हुतात्मा फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे, माजी सरपंच कविता पाचारणे, माजी सदस्या सविता पाचारणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास मुसळे यांनी केले, तर उपाध्यक्ष अविनाश कहाणे यांनी आभार प्रदर्शन केले.

## शेतात पाचट जाळल्याने ऊस खाक



**शिरूर :** शिरूर तालुक्यातील फाकटे येथील शेतात पाचट जाळल्याने शेजाऱ्याच्या एक एकर ऊस पिकास आग लागून सुमारे ५० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात बाळासाहेब धोंडीबा हिंगे आणि त्यांचा मुलगा सचिन बाळासाहेब हिंगे (रा. अवसरी बुद्रुक, ता. आंबेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमन पंढरीनाथ काळे (वय ५६, रा. फाकटे, ता. शिरूर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून, फिर्यादी सुमन काळे या २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आपल्या शेतात (गट नंबर ९२/११) ऊसाला पाणी देत असताना त्यांना शेजारील शेतात धुर दिसल्याने त्या घटनास्थळी गेल्या. तेथे आरोपी बाळासाहेब हिंगे आणि त्यांचा मुलगा सचिन यांनी त्यांच्या शेतातील उसाचे पाचट जाळले होते. यामुळे फिर्यादीच्या शेतात (गट नंबर ९३/१३) लागलेल्या एक एकर लहान ऊस पिकाला आग लागली. यासोबतच पाण्याची पाइपलाइनही आगीत जळाली. घटनास्थळी योगेश शिंदे, महादू शिंदे, आणि संदीप हुंडारे हे साक्षीदार उपस्थित होते. फिर्यादीच्या मते, आरोपींना आग लागल्यास शेजारील ऊसाला आणि मालमत्तेला धोका होऊ शकतो याची पूर्ण जाणीव होती, तरीही त्यांनी जाणीवपूर्वक पाचट पेटवून दिले. परिणामी फिर्यादीचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

---

# माऊलींच्या पालखी सोहळ्याचे १९ जूनला प्रस्थान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढ पायी वारी पालखी सोहळ्याचे आळंदी मंदिरातून गुरुवार १९ जून २०२५ ला गुरुवारी श्रींचे पालखीची मंदिर प्रदक्षिणा झाल्यावर रात्री उशिरा हरिनाम गजरात प्रस्थान होणार आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरातून आषाढी वारी २०२५ साठी श्रींचे पालखी सोहळ्याचे हरिनाम गजरात पंढरपूरकडे १९ जून रोजी प्रस्थान होणार आहे. सोहळ्यातील मुख्य आषाढी एकादशी ६ जुलै रोजी पंढरपूर येथे राज्यातून आलेल्या लाखो वारकरी भाविक भक्तांच्या उपस्थितीत हरिनाम गजरात साजरी होत आहे. आषाढ पायी



वारी पालखी सोहळ्याचे नियोजनपूर्व आढावा बैठक पंढरपूर येथे झाली. या बैठकीत पालखी सोहळा दिंडी समाज मान्यवर दिंडीकरी, फडकरी, पालखी सोहळा प्रमुख, वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते. पालखी सोहळ्याची पत्रिका लवकरच श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या वतीने जाहीर करण्यात येईल, असे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे मुख्य व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी सांगितले.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी राज्यातून लाखो भाविक आळंदी येथे श्रींचे प्रस्थान सोहळ्यासाठी येत असतात. शेकडो दिंड्या आळंदीतून हजारो भाविकांच्या हरिनाम गजरात मार्गस्थ होत असतात. भाविकांना सोहळ्याचे काळात गैरसोय होऊ नये यासाठी या बैठकीत चर्चा, सुसंवाद साधत मार्गदर्शन केले. श्रींचे पालखी सोहळ्यासाठी हरिनाम गजर करीत पंढरीस श्रींचे दर्शनास वारकरी भाविक निघतात. सोहळ्याचे तारखा निश्चित करण्यासाठी पंढरपूर येथील माऊली मंदिरात सोहळ्यातील ठराविक दिंडी प्रमुखांची, पालखी दिंडी समाजची बैठक झाली. या बैठकीत परंपरेने २९ जून २०२५ रोजी आळंदीतून माऊलींचे पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. मुक्काम, गोल रिंगण, उभे रिंगण आदी कार्यक्रम लवकरच जाहीर केले जातील. यावर्षी पंढरपूर येथे आषाढी एकादशी ६ जुलै रोजी साजरी होत असल्याचे आळंदी मंदिराचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले.





## प्रांताधिकारी अनिल दौंडे यांची माहिती

# भीमाशंकर महामार्गाचे राजपत्र प्रसिद्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भिमाशंकर-तळेघर-वाडा ते राजगुरुनगर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.६० या रस्ता सिमेंट कॉंक्रीट दुपदरीकरण प्रकल्प मंजूर झाल्यानंतर त्याचे राजपत्र २८ मार्च रोजी शासनाकडुन प्रसिद्ध झाल्याची खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

खेड तालुक्यातील २५ गावामधून हा मार्ग जाणार आहे. राजगुरुनगर ते भीमाशंकर ६०.२५ किलोमीटर लांबीचा हा रस्ता असून त्या साठी ८७ हेक्टर ३६६८ आर क्षेत्र संपादित होणार आहे. तर आंबेगाव तालुक्यातील एका गावातील २ हेक्टर.४४३६आर क्षेत्र संपादित होणार आहे. खेड तालुक्यातील कारकुडी, खरोशी आव्हाट, वाडा, तिफनवाडी, धुवोली, शिरगाव, टोकावडे, कडधे, कान्हेवाडी बुद्रुक, मोहकल, कमान, चास, आखरवाडी, पांगरी पाडळी, सातकरस्थळ, चांडोली तर्फे खेड, वडगाव न.खेड, दरकवाडी वाळद, डेहणे. बुरसेवाडी, गुंडाळवाडी,वांजळे या गावांमधून हा नवीन रस्ता जाणार असून जमिनी संपादित होणार आहेत. खेड तालुक्यातील भिमाशंकर-तळेघर-वाडा ते राजगुरुनगर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० हा रस्ता पूर्ण झाल्यास खेडच्या पश्चिम भागाचा मोठा विकास होणार आहे. राजगुरुनगर वरून अगदी तासाभरात श्री क्षेत्र भीमाशंकरला जाता येणार आहे. आंबेगाव तालुक्यातून भीमाशंकरला जाणारा हा जवळचा मार्ग ठरणार असून या भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या रस्त्याचे लवकर संपादन प्रक्रिया सुरू होणार असल्याचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी सांगितले.

---

# तहसीलदार प्रशांत बेडसे यांचे कमबॅक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** प्रशासकिय आणि त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेले सिंघम तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी तब्बल दहा महिन्यांनंतर सोमवारी (दि ७) खेडच्या तहसीलदार पदाचा पदभार सायंकाळी उशिरा स्वीकारला. महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

दहा महिन्यापूर्वी बेडसे यांनी एक वर्ष तहसीलदार पदावर काम केले. मात्र विविध प्रकारचे आरोप होऊन राजकीय नेते, वकील संघटना आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी बेडसे यांची कारकीर्द वादग्रस्त ठरवली होती. त्यातच त्यांना ११ जुलै २०२४ रोजी येथील पदभार सोडावा लागला होता. त्यांच्या जागेवर तहसीलदार ज्योती देवरे यांनी पदभार स्वीकारला. त्यानंतर विधानसभेची निवडणूक झाली. श्रीमती देवरे यांनी आठ ते नऊ महिने खेड महसुल विभागाची धुरा सांभाळली. मधल्या महिन्या भराच्या काळात खेड व हवेलीच्या नायब तहसीलदार यांना अधिकार प्राप्त झाले होते. मात्र तालुक्यातील महसुलचे न्यानिवाडे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दाखले वेळेत उपलब्ध होत नसल्याने त्यासाठी हेलपाटे मारून नागरिक हैराण झाले होते. उन्हाळा असल्याने तालुक्यात पाणी टंचाईचे संकट उभे झाले होते. त्यावर गरजेप्रमाणे निर्णय घेतला जात नव्हता. अनेक घडामोडी घडल्या नंतर तहसीलदार प्रशांत बेडसे हे पुन्हा रुजु झाल्याने तालुक्यातील काही राजकीय नेत्यांचे धाबे दणाणले असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, गेल्या दोन महिन्यांत खेड तहसिलदार नियुक्तीचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता. मात्र, या याचिकेवर उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने प्रशांत बेडसे यांना खेड तहसीलदारपदी नियुक्त करण्याचे आदेश दिले होते. विद्यमान तहसीलदार ज्योती देवरे यांची याचिका फेटाळली होती. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/मॅट आणि उच्च न्यायालयाने तहसीलदार ज्योती देवरे यांची नियुक्ती आधीच रद्द केली. देवरे यांच्या जागेवर तहसीलदार प्रशांत बेडसे यांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले होते. त्याविरोधात देवरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. नायब तहसीलदार मदन जोगदंड, राम बीजे, माहिती अधिकार कार्यकर्ते बाळासाहेब चौधरी, पंचायत समितीचे माजी उपसभापती सतीश राक्षे, वैभव नाईकरे व इतरांनी बेडसे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांचे स्वागत करताना महसुल अधिकारी, कर्मचारी

---

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विकासकामांची पाहणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्रात शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर द्यावा, या सुविधांचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होईल यादृष्टीने कामे करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

अजित पवार यांनी शहरातील रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्र, शारदा प्रागंण शाळा, वसंतराव पवार नाट्यगृह, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ विश्रामगृह येथील विकास कामांची पाहणी करुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

यावेळी प्रादेशिक रेशीम सहायक संचालक कविता देशपांडे, महावितरणचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, जिल्हा रेशीम अधिकारी संजय फुले, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, तहसीलदार गणेश शिंदे, गट विकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी पंकज भुसे आदी उपस्थित होते.

वसंतराव नाट्यगृह परिसरातील नागरिकांची वर्दळ लक्षात घेता सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्युत रोहित्र आणि संरक्षक भिंतीचे कामे करावीत. परिसरातील बैठक व्यवस्था, पायऱ्या, वाहनतळ तसेच ज्येष्ठ नागरिक, लहान बालके यांचा विचार करुन फरश्या बसवाव्यात.


शारदा प्रागंण शाळेचे काम करतांना केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) च्या नियमांचे पालन करावे. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करण्यात यावा. एमआयडीसी विश्रामगृहाच्या दर्शनी भागात विभागाचा लोगो लावावा. लाकडी साहित्याला वाळवी प्रतिबंधक कीटकनाशकाचा वापर करण्यात यावा, अशा सूचना पवार यांनी दिल्या.

तालुक्यात विविध विकास कामे सुरु असून ही सार्वजनिक विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना पाहणीप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

# निरामय

## पोझिशनल व्हर्टिगोविषयी...

डोक्याची हालचाल केल्यानंतर किंवा स्थिती बदलल्यानंतर अनेकांना भोवळ येते. त्यांना झोपेत एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळल्यानंतरही भोवळ येते. भोवळेचा कालावधी एका मिनिटापेक्षा कमी असतो. शारीरिक स्थितीशी संबंधित भोवळीमध्ये (पोझिशनल व्हर्टिगो) गरगरल्यासारखं किंवा डोलल्यासारखं वाटतं. डोक्यात काही तरी गरगर फिरत असल्याचीही भावना असते. डोक्याची दुखापत किंवा वय झाल्याने ही समस्या निर्माण होऊ शकते. पण यामागचं निश्चित असं कारण अजूनही कळू शकलेलं नाही.



**लक्षणं**

डोक्याची विशिष्ट प्रकारे हालचाल केल्यानंतर भोवळ येणं, गरगरल्यासारखं वाटणं, सभोवतालचं सगळं फिरत असल्यासारखं वाटणं, तोल जाणं हे या विकाराचं अत्यंत महत्त्वाचं लक्षणं मानलं जातं. कानात दाह होत असल्याने ही समस्या निर्माण झाली तर रूग्णाला उलट्या होऊ शकतात. सततच्या उलट्यांमुळे डिहायड्रेशन होऊ शकतं. त्यामुळे वेळीच डॉक्टरांकडे जाणं योग्य ठरतं. कानांमध्ये दाह असेल तर श्रवणदोष निर्माण होऊशकतो. अंधुक दिसू शकतं.

**उपचार**

यासंदर्भात एप्लेज मानेयुवेर ही उपचारपद्धती डॉ. जॉन एप्लेज यांनी विकसित केली आहे. या पद्धतीद्वारे तुम्ही घरच्या घरी उपचार करू शकता. या उपचारांसाठी कोणत्याही उपकरणाची आवश्यकता नसते. यात डोकं वेगवेगळ्या दिशांना हलवायचं असतं. यामुळे कॅल्शियम कार्बोनेट कानाच्या आतल्या भागांमध्ये पसरतं आणि तुम्हाला आराम मिळू शकतो. डॉक्टर काही औषधंही लिहून देतात. पण या विकारावर

आरोग्यवेध

औषधांचा फारसा उपयोग होत नाही. विशिष्ट प्रकारची शस्त्रक्रिया करून ही समस्या दूर करता येते. पण या शस्त्रक्रियेचे काही धोके आहेत.

**धोके**

सर्वसाधारणपणे हा विकार पन्नाशीनंतर जडतो. पण कमी वयाच्या लोकांनाही हा विकार जडू शकतो. पुरूषांच्या तुलनेत महिलांना हा विकार होण्याची शक्यता जास्त असते. डोक्याला झालेली किंवा कानांची दुखापत या विकाराला कारणीभूत ठरू शकते.

## वारंवार पेनकिलर घेताय? सावधान!



शरीरातील वेदना, ताप, डोकेदुखी यासारख्या आजारांवर लगेच पेनकिलरची औषधे घेतली जातात. पेनकिलर औषधे शरीरातील वेदना, ताप आणि जळजळ तात्पुरत्या स्वरुपात कमी करतात. या औषधांमुळे नक्कीच फरक जाणवतो; मात्र त्यांचे प्रमाण अति झाल्यास आरोग्यावर वाईट परिणाम दिसू लागतात. 'एम्स'ने एक धक्कादायक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालामध्ये भारतातील सात टक्के लोकांची मूत्रपिंडे पेनकिलरमुळे निकामी झाल्याचा दावा करण्यात आला आहे. 'एम्स' ने अहवालात म्हटले आहे की, पेनकिलर अधूनमधून घेतल्यास आरोग्यावर परिणाम होत नाही; मात्र त्याचे प्रमाण वाढले तर किडनीचे गंभीर नुकसान होऊ शकते. वृद्ध, मधुमेह आणि उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसारख्या उच्च-जोखीम असलेल्या

व्याधी विचार

व्यक्तींमध्ये हा धोका अधिक असतो. अधूनमधून पेनकिलर औषधांचा वापर केल्यास किडनी खराब होऊ शकते. अनेकदा वेदना आणि जळजळ कमी करण्यासाठी पेनकिलर प्रिस्क्रिप्शन शिवाय घेतली जातात. यामध्ये 'नॉन-स्टेरॉइडल अँटी-इंफ्लेमेटरी ड्रग्सचा समावेश असतो. आयबूप्रोफेन, डिक्लोफेनॅक, नॅप्रोक्सेनॉ यांचा त्यात समावेश आहे. ॲस्पिरिन, ॲसिटामिनोफेन आणि कॅफीनसह औषधांचे संयोजनदेखील सहज उपलब्ध आहे. परिणामी, डोकेदुखी आणि पाठदुखीसाठी ही औषध घेतली जातात. पेनकिलरमुळे शरीरात पोटॅशियमची पातळी वाढू शकते. किडनी चांगली राहण्यासाठी हर्बल सप्लीमेंट कमी करावीत, नियमितपणे शारीरिक हालचाली करत वजन नियंत्रणाखाली ठेवावे आणि उच्च रक्तदाबाची कोणतीही समस्या उद्‌भवू देऊ नये.

## बोट का दुखतं?



मी ३२ वर्षांचा पुरूष आहे. काही वर्षांपूर्वी माझा छोटासा अपघात झाला होता. त्यावेळी उजव्या हाताच्या अनामिकेला दुखापत झाल्याने टाके घालण्यात आले होते. त्यानंतर माझ्या बोटाला फारसा त्रास जाणवलेला नाही. पण गेल्या काही दिवसांपासून त्या बोटाच्या खालच्या भागात तीव्र स्वरूपाच्या वेदना जाणवत आहेत. तसंच थोडं काठिण्य जाणवत आहे. मी कोणत्या डॉक्टरांकडे जायला हवं? याबाबत त्वचातज्ज्ञाला भेट द्यायला हवी की शल्यविशारदाला ? कृपया मार्गदर्शन करा.

विचारा प्रश्न

उत्तर: बोटाला टाके घालण्यात आल्याचं तुम्ही म्हणताय. म्हणजे तुमची दुखापत तशी गंभीर होती, असं म्हणायला वाव आहे. दुखापत झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनी तुम्हाला बोटामध्ये वेदना जाणवणं हे काहीसं अनपेक्षित आहे. तुमच्या बोटाला सकाळच्या वेळात वेदना आणि काठिण्य जाणवत असेल. थंडी आणि पावसाळ्यात त्रास वाढत असेल. तसंच तुमच्या सध्याच्या लक्षणांचा आणि दुखापतीचा काहीच संबंध नसू शकतो. योग्य तपासणी केल्यानंतरच तुमची नेमकी समस्या लक्षात येईल. तुम्हाला होणारा त्रास भूतकाळातल्या दुखापतीमुळे आहे का त्यामागे दुसरं काही कारण आहे याचं निदान व्हायला हवं. यासाठी तुम्ही ऑर्थोपेडिक सर्जनची भेट द्या. त्वचातज्ज्ञांना भेटून काहीच निष्पन्न होणार नाही.

## कमी झोपेचा परिणाम




आज काल माणूस करिअरच्या मागे इतका पळतोय की त्या नादात झोप अपूर्ण राहते, हे लक्षात येत नाही. कधी मोकळा वेळ मिळाला तरीतो मोबाईलवरील रिल्स पाहण्यात दंग असतो. झोप पूर्ण न झाल्यामुळे आरोग्यावर घातक परिणाम होत आहे. पेनस्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी तब्बल ३,७०० जणांवर संशोधन केले. त्यातही धक्कादायक माहितीसमोर आली. झोपेच्या कमतरतेचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे सर्व वयोगटातील लोकांनी पुरेशी झोप घ्यावी, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अलीकडील संशोधनाने झोपण्याच्या चार पद्धती शोधून काढल्या असून त्यांचा एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यावर कसा परिणाम होतो हे स्पष्ट केले आहे. 'सायकोसोमॅटिक मेडिसिन'मध्ये गेल्या महिन्यात प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार डिमेंशिया असलेल्या लोकांना जुनाट आजार होण्याची शक्यता जास्त असते. पेनस्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी ३,७०० लोकांच्या डेटाचे विश्लेषण केले. त्यांच्या झोपेच्या सवयीआणि दहावर्षांच्या अंतराने दोन टप्प्यांवर त्यांच्या आरोग्याच्या दीर्घकालीन स्थितींचा अभ्यास केला. संशोधन पथकाने झोपेचे चार वेगवेगळे नमुने अधोरेखीत केले. त्यात चांगले झोपणारे, वीकेंडस्लीपर, निद्रानाश आणि नॅपर्स यांचा समावेश आहे.

आपण कुठे चुकतो?

'सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन'ने प्रौढांना रात्री किमान सातातास विश्रांती घेण्याची शिफारस केली आहे; परंतु बऱ्याच लोकांना तेवढी झोप येत नाही. संशोधनातील अर्ध्याहून अधिक सहभागी निद्रानाश आणि नॅपर्स म्हणून ओळखले गेले. झोपण्याच्या या दोन्ही पद्धती चांगल्या मानल्या जात नाहीत. दहावर्षांपासून निद्रानाशाचा त्रास असलेल्या लोकांना हृदयविकार, मधुमेह, नैराश्य आणि शारीरिक दुर्बलतेच्या अनेक तक्रारी होत्या. दिवसावारंवार डुलकी घेणाऱ्यांना मधुमेह, कर्करोग आणि अशक्तपणाचा धोका वाढला होता. संशोधकांनी सांगितले की, कमी शिक्षण आणि बेरोजगार लोकांमध्ये निद्रानाशाची तक्रार होण्याची शक्यता असते. वृद्ध, प्रौढ आणि निवृत्त लोकांमध्ये झोपेची सवय जास्त असते. संशोधनाच्या प्रमुख सुमीली म्हणतात, 'योग्य झोपे जीवनशैलीवर अवलंबून असते. लोक अजूनही त्यांच्या झोपेचे महत्त्व आणि झोपेच्या कमतरतेच्या परिणामांबद्दल जागरूक नाहीत. लोकांना चांगल्या झोपेबद्दल सांगण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे. चांगली झोप येण्यासाठी, झोपण्यापूर्वी मोबाईल फोन न वापरणे, दररोज व्यायाम करणे आणि संध्याकाळी कॅफिनचे सेवन न करणे अशा सवयी लावून घ्याव्या लागतील.

नवसंशोधन

## हे जनुक ठरू शकतं कॅन्सरविरोधी!



केसगळतीशी संबंधित जनुक कॅन्सरवरच्या उपचारांना नवी दिशा देऊ शकतं, असा महत्त्वपूर्ण शोध लावण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. या जनुकामुळे शरीर स्वत:ची रोगप्रतिकारक शक्ती वापरून कॅन्सरशी लढू शकतं. 'आयकेझेडएफ १' असं या जनुकाचं नाव आहे. हे जनुक ॲलोपेशिया एरियाटा या शारीरिक स्थितीत टी पेशींची निर्मिती करतं. या स्थितीत रोगप्रतिकारक पेशी केसांच्या पेशींवर हल्ला करून नष्ट करतात. विविध प्रकारच्या कॅन्सरमध्ये हे जनुक बंदिस्त अवस्थेत असतं. या बंदिस्त अवस्थेमुळे रोगप्रतिकारक शक्तीपासून कॅन्सर पेशींचं रक्षण होतं. पण हे जनुक कार्यरत झालं तर कॅन्सरच्या पेशी रोगप्रतिकारक शक्तीसमोर उघड्या पडतील. यामुळे रोगप्रतिकारक पेशी कॅन्सर पेशींवर हल्ला करून त्या नष्ट करू शकतील.

## तळलेले, मसालेदार पदार्थ हानीकारक



चायनीज असो की दक्षिण भारतीय, लोकांना मसालेदार पदार्थ आवडतात. आजकाल लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांमध्येच मसालेदार पदार्थ खाण्याची क्रेझ वाढली आहे. जास्त तेलकट आणि मसालेदार पदार्थ खाणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. काहीवेळा मसालेदार अन्न ठीक आहे; परंतु दररोज असे अन्न सेवनकरणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. तेलाचा जादा वापरही धोकादायक ठरतो. अनेकदा महिला स्वयंपाक करताना तेलाचे प्रमाण वाढवतात. त्यामुळे जेवणाला चव येते; पण असे करणे खूप धोकादायक ठरू शकते. तेलामध्ये जास्त प्रमाणात लिपिड असतात. ते आपल्या शरीरासाठी हानिकारक ठरु शकतात. जास्त तेलकट पदार्थ खाल्ल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. याशिवाय लोकांमध्ये पचनसंस्थेच्या समस्याही दिसून आल्या आहेत. जास्त प्रमाणात तेलाचे सेवन केल्याने पोटात जळजळ, ॲसिडिटी, गॅस, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, हृदयविकार, कमी वयात अशक्तपणा यासारख्या समस्या उद्‌भवतात. जास्त तेल आणि मसाले खाल्ल्याने मधुमेह आणि कॅन्सरसारख्या आजारांचा धोका वाढतो. यामुळे उलट्या, जुलाब, चक्कर येणे अशा समस्या उद्‌भवू लागतात. म्हणूनच लोकांनी जास्त तेलकट आणि मसालेदार पदार्थ खाणे बंद करावे. त्या बदल्यात संतुलित आहार घ्यावा. बाहेरचे खाण्याऐवजी घरी बनवलेले साधे अन्न खावे. याशिवाय हेल्दी तेल वापरावे आणि आहारातून मसाले कमी करावेत.

फिटनेस

डोळ्यांचं आरोग्य


## मुलांच्या डोळ्यांची काळजी



लहान मुलांशी संबंधित डोळ्यांच्या अनेक समस्या असतात. पण दृष्टीदोषासारखी लक्षणं दिसत नसल्याने या विकारांची तीव्रता पालकांच्या पटकन लक्षात येत नाही. घरात डोळ्यांशी संबंधित विकारांचा इतिहास असेल तर मुलांना अनेक समस्या जाणवू शकतात. डोळ्यांच्या समस्यांमुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊशकतो. तसंच त्यांच्या एकूण जडणघडणीवरही याचे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे तीन वर्षांपर्यंतच्या मुलांच्या डोळ्यांची वरचेवर तपासणी करत रहायला हवी. तसंच त्यानंतर साधारण दोन वर्षांनी मुलांचे डोळे तपासून घ्यायला हवेत. यामुळे डोळ्यांशी संबधित विकार वेळीच लक्षात येतील आणि त्यावर योग्य उपचार होऊ शकतील.

दंतारोग्य

## दातांमध्ये फट पडली आहे?



सुंदर हास्यामुळे सौंदर्यात भर पडते. पण दातांमध्ये पडलेल्या फटी या सौंदर्याचा विचका करतात. ही फट वरच्या दोन दातांमध्ये असेल तर त्याला डियास्टेमा असं म्हटलं जातं. अनेक कारणांमुळे ही समस्या निर्माण होऊ शकते. जबड्याच्या हाडांची स्थिती बदलण्यापासून दोन दातांमध्ये आपोआप फट निर्माण होण्यापर्यंत कोणतंही कारण असू शकतं. लहानपणी अंगठा चोखण्याची सवय असेल तर पुढे दातांमध्ये फट पडू शकते. यामुळे पुढचे दात पुढच्या बाजूला झुकतात आणि दातांमध्ये फट पडते. गिळण्याच्या चुकीच्या सवयीमुळेही दातांमध्ये फट पडू शकते. पण यावर उपचार होऊ शकतात.

आजीबाईचा बटवा

## लाभदायी कडुनिंब

कडुनिंब ही अत्यंत गुणकारी वनस्पती आहे. त्वचा आणि केसांच्या समस्या कडुनिंबामुळे दूर होऊ शकतात. इतकंच नाही, तर रक्तशुद्धीकरण आणि पचनसंस्था आणि तोंडाचं आरोग्य राखण्यात कडुनिंब महत्त्वाची भूमिका बजावतं. कडुनिंबाच्या वापरामुळे त्वचा उजळते. मुरमं, पुळ्यांचं प्रमाण कमी होतं. कडुनिंबात जंतूनाशक गुणधर्म असतात. कडुनिंबामुळे त्वचेच्या समस्या दूर होऊ शकतात. कोंडा, टाळूवरची त्वचा कोरडी पडणं अशा समस्याही कडुनिंबामुळे दूर होतात. कडुनिंबामुळे रक्त शुद्ध होतं. किडनी, यकृत यांचं कार्य सुधारतं. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यासाठीही कडुनिंब उपयुक्त ठरू शकतं. कडुनिंबाच्या वापरामुळे दातांचं आरोग्य चांगलं राहू शकतं.



**पती-पत्नींचे लैंगिक जीवन अर्थपूर्ण असेल तर त्यांचे वैवाहीक सहजीवनही सुखी होते. लैंगिक जीवनात सुसंवाद असल्यास वैवाहीक जीवनातील इतर आघाड्यावंर सुसंवाद निर्माण होतो. अहंकार दूर सारले जातात. महत्त्वाचे निर्णयात एकवाक्यता असते. लैंगिक क्रिया म्हणजे वैवाहीक जीवनातले सर्वस्व नसले तरी त्याचं एक महत्वाचं स्थान आहे. त्यादृष्टीने दोन्ही जोडीदारांनी प्रयत्नशील रहावं.**

## हवा सुसंवादावर भर

आरोग्य विशेष

**डॉ. अरूण कुमार**

स्त्री-पुरुष विवाहाच्या बंधनात प्रवेश करतात तेव्हा त्यामागे केवळ शारीरिक सुखाचा विचार नसतो तर दोन जीवांनी एकत्र येऊन सहजीवनाचा आनंद लुटावा आणि प्रजनन करून वंशवेल वाढवावी हा हेतू असतो. अनेक पुरुष यातील सहजीवनाचा भाग दुय्यम मानुन शारीरिक सुखाला प्राधान्य देतात तेव्हा खरा प्रश्न निर्माण होतो. लैंगिक सुख हे विवाहाचं एकमेव ध्येय नाही. वैवाहीक जीवनात प्रवेश केल्यानंतर काही काळ लैंगिक क्रियेला महत्व असलं तरी कालांतराने ते ओसरतं. पती-पत्नींना एकमेकांच्या आवडी-निवडी, स्वभावातले बारकावे हळूहळू समजू लागतात. सहजीवन बहरत असताना प्रसंगी



खटके उडतात, मतभेद होतात पण पुन्हा मने जुळून येतात आणि साहचर्याचा खरा अर्थ समजू लागतो. विवाहाचा पहिला बहर ओसरल्यानंतर लैंगिक जीवनात ताजेपणा राखणे, लैंगिक क्रिडेच्या निमित्ताने जवळीक साधणं महत्त्वाचं असतं. या टप्प्यावर अनेक अडचणी निर्माण होतात. महानगरातील छोट्या जागा, कुटुंबातील सभासदांची गर्दी, पत्नीची बाळंतपणं आणि मुलांची वाढती वयं या अपरिहार्य अडचणींमुळे लैंगिक क्रियेचं सुख अनुभवता येत नाही. पर्यायाने लैंगिक क्रिया यांत्रिक आणि नीरस होऊ लागते. कामजीवन नीरस होण्याची अनेक कारणं असतात. पती-पत्नींमध्ये मतभेद, सुसंवादाचा अभाव ही काही प्रमुख कारणं होत. त्यात काही पुरुष मनोमीलनाचा अभाव असूनही लैंगिक सुखाची मागणी नोंदवतात. पत्नीही पुरुषाची इच्छा पूर्ण करणे हा दैनंदिन कर्तव्याचा भाग, असं समजून त्यात अनिच्छेने सहभागी होते. साहजिक अशा संबंधात प्रेमाचा, ओलाव्याचा आणि उत्स्फूर्ततेचा अभाव असतो. अशा शारीरिक संबंधांमुळे वैवाहीक नात्याची वीण घट्ट होण्याऐवजी जास्त उसवत जाते. मासिक पाळी सुरू होण्यापूर्वी अनेक महिलांना निरनिराळ्या समस्यांना तोंड द्यावं लागतं. ओटीपोटीत दुखणं, थकवा जाणवणं, भूक नसणं, विनाकारण औदासिन्य उद्‌भवणे अशा समस्या निर्माण होतात. मात्र, बहुसंख्य पुरूष पत्नीच्या या अडचणींकडे कानाडोळा करुन लैंगिक सुखाची मागणी करतात. यावर पत्नीकडून नकार येतो. पुढच्या वेळी पत्नीच पुढाकार घेईल असा विचार करुन जवळीक टाळतो.

पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना उद्दीपित होण्यासाठी जास्त कालावधीची गरज असते. पती धसमुसळेपणाने सुख ओरबाडून, श्रांत, क्लांत अवस्थेत कामक्रिडा संपवतो त्यावेळी त्याची पत्नी उद्दीपित होत असते. मात्र स्वत:ची लैंगिक तृप्ती झालेला पती पत्नीच्या शारीरिक सुखाची पर्वा न करता कूस बदलून झोपी जातो. आपल्या संस्कृतीत स्त्रियांनी कामभावनेबाबत, सुखाच्या परमोच्च टप्प्याविषयी बोलणे निषिद्ध समजलं जातं. त्यामुळे लग्नाला २०-२० वर्षे होऊनही स्त्रियांना कामपूर्तीचा खरा अनुभव येत नाही. कारण लैंगिक क्रियेत केवळ स्त्रिया 'देणाऱ्याची' भूमिका पार पाडताना आढळतात. त्यामुळे शारीरिक जवळीकीत देवाण-घेवाण होत नाही आणि कामक्रिडेच्या शिळेपणाला कंटाळून स्त्रिया लैंगिक संबंधाना नकार देऊ लागतात. अर्थपूर्ण लैंगिक संबंधासाठी पती-पत्नी दोघांनी प्रयत्न करायला हवा.

दिवसभराचे शारीरिक-मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी निरामय कामजीवन जरूरीचं आहे. या संबंधांमुळे ताणतणाव दूर होतो आणि गात्रन्‌गात्रं शिथिल होतात. यशस्वी लैंगिक क्रिडेनंतर पती-पत्नी दुसऱ्या दिवसाच्या ताणतणावाला नव्याने सामोरे जाण्यासाठी सज्ज होतात. दिवसभरातील भांडणं, मतभेद मिटवण्याची शयनगृह ही खास खोली आहे. अर्थपूर्ण सहजीवनासोबत लैंगिक क्रिया जोडीदारांना आपण एकमेकांसाठीच अस्तित्वात असल्याचं भान देते. मात्र लैंगिक क्रियेत सहभागी होण्यापूर्वी जोडीदारांनी काही पथ्यं पाळण्याची आवश्यकता आहे. पती-पत्नीने लैंगिक क्रियेपूर्वी आंघोळ करावी असं वैद्यकशास्त्र सुचवतं. दिवसभराच्या धावपळीमुळे शरीरावर साचलेल्या घामाची दुर्गंधी लैंगिक क्रियेत अडथळा निर्माण करू शकते. पुरुषांच्या तोंडाला येणारे सिगारेट, तंबाखू, गुटखा आदींचे तर स्त्रियांच्या तोंडाला येणारे कांदा-लसूण आदी पदार्थांचे वास कामक्रिडेबाबत घृणा निर्माण करतात. लैंगिक क्रिया घडणाऱ्या जागेत सौंदर्यदृष्टी जोपासण्याची आवश्यकता असते. मंद प्रकाश देणारे दिवे, हळूवार संगीत, खोलीभर पसरलेला फुलांचा सुवास, प्रफुल्लीत मानसिकता अशा पार्श्वभूमीवर लैंगिक खऱ्या अर्थाने फुलतो. महानगरात वास्तव्य करणारी अनेक जोडपी दिवसभराच्या दगदगीने कंटाळलेली असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी थकल्या भागल्या शरीराने कामक्रिडेत भाग घेण्याऐवजी ते लवकर झोपणे पसंत करतात. अशी जोडपी पहाटेच्या वेळी लैंगिक क्रियेत सहभागी होतात. त्यानंतर ही जोडपी नव्या उत्साहाने सज्ज होतात.







# लखनौचा थरारक विजय

## सुपर जायंट्सचे गोलंदाज ठरले मॅचविनर, रहाणेची खेळी व्यर्थ







■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** , लखनौ सुपर जायंट्स संघाने उत्कृष्ट कामगिरीसह अखेरीस केकेआर संघावर ४ धावांनी थरारक विजय मिळवला. ईडन गार्डन्सच्या मैदानावर लखनौने प्रथम फलंदाजी करत २३९ धावांचा मोठा डोंगर उभारला.

लखनौकडून मिचेल मार्श आणि निकोलस पुरन यांनी वादळी फलंदाजी करत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली. पण प्रत्युत्तरात केकेआरने घरच्या मैदानावर चांगली सुरूवात केली. तरीही सुपर जायंट्सच्या संघाने अखेरच्या षटकांमध्ये भेदक गोलंदाजी करत केकेआरच्या धावांवर आळा घातला आणि अखेरीस विजय नोंदवला.

लखनौचा संघ या विजयासह गुणतालिकेत चौथ्या स्थानी पोहोचला आहे. अखेरच्या षटकात केकेआरला विजयासाठी २४ धावांची गरज होती. रवी बिश्नोईकडे गोलंदाजीची संधी होती. हर्षित राणाने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावला. तर दुसरा चेंडू डॉट बॉल गेला. यानंतर तिसऱ्या चेंडूवर हर्षितने एक धाव घेत रिंकूला स्ट्राईक दिली. आता केकेआरला विजयासाठी १९ धावांची गरज होती. रिंकूने पुढच्या दोन चेंडूवर दोन चौकार तर अखेरच्या चेंडूवर षटकार लगावला, मात्र संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकला नाही.

लखनौने दिलेल्या २४० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरूवात फारच दणक्यात झाली. केकेआरने पॉवरप्लेमध्ये ८० धावा केल्या. क्विंटन डिकॉक १५ धावा करत बाद झाला. यानंतर अजिंक्य रहाणे आणि सुनील नरेन यांनी संघाला चांगली सुरूवात करून दिली. सुनील नरेन ३० धावा करत बाद झाला. तर कर्णधार अजिंक्य रहाणेने कर्णधाराला साजेशी खेळी करत ३५ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांसह ६१ धावा केल्या. तर वेंकटेश अय्यरने २९ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह ४५ धावा केल्या. रमणदीप, अंगक्रिश आणि आंद्रे रसेल एकेरी धावसंख्येवर झेलबाद झाले.

लखनौने या सामन्यात प्रथम फलंदाजी केली आणि सलग दुसऱ्या सामन्यात त्यांच्या सलामीवीरांनी धमाकेदार सुरुवात केली. एडन मारक्रम आणि मिचेल मार्श यांनी १०.२ षटकांत ९९ धावांची धमाकेदार भागीदारी केली. माक्रम त्याचे सलग दुसरे अर्धशतक पूर्ण करण्यापासून हुकला पण मार्शने या हंगामात त्याचे चौथे अर्धशतक केले. गेल्या सामन्यातील अपयशातून सावरत, निकोलस पूरनने पुन्हा एकदा आपली विध्वंसक खेळी केली आणि फक्त २१ चेंडूत अर्धशतक झळकावले. मार्श ४८ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह ८१ धावांची खेळी केली.

# रोहितने 'ती' गोष्ट सुधारली, तर मुंबईलाही फायदा होईल



## गावसकरांनी दिला मोलाचा सल्ला



**पुणे :** गेल्या दोन सामन्यात विजयाच्या जवळ येऊन मुंबईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे सध्या मुंबईला संघाच्या कामगिरीची तर चिंता आहेच. पण त्यांना त्यांचा माजी कर्णधार रोहित शर्माच्या फॉर्मचीही चिंता आहे. आत्तापर्यंत त्याला ३८ धावाच करता आल्या आहेत. दरम्यान आता त्याच्या या कामगिरी भारताचे माजी कर्णधार सुनील गावसकर यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. गावसकर म्हणाले, 'पुढच्या काही सामन्यांमध्ये त्यांना मोठ्या खेळीची अपेक्षा असेल. जरी त्याला लगेचच मोठी खेळी करता आली नाही, तरी त्यने पॉवरप्लेमध्ये आणि नंतर ८-९ षटकापर्यंत फलंदाजी केली आणि ३०-४० धावा जरी केल्या, तरी त्याचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल. पण तो जेव्हा पॉवरप्लेमध्येच बाद होतो, तेव्हा त्याचा त्रास होतो, मग तो मुंबई इंडियन्ससाठी किंवा भारतासाठी किंवा कोणत्याही संघासाठी खेळत असो.' गावसकर पुढे म्हणाले, 'योगदान देण्यासाठी त्याच्याकडे खूप काही आहे. मला विश्वास आहे की त्याच्या शॉट्सची निवड थोडी सुधारण्याची गरज आहे. पहिल्या ६ षटकात आक्रमक होऊ शक्य तितक्या अधिक धावा करायच्या असतात, पण योग्य जोखीम निवडणे महत्त्वाचे आहे. जर त्याला तो समन्वय सापडला, तर तो मोठ्या धावा पुन्हा करू शकतो.'

## तिसरी द पूना क्लब स्विमिंग लीग २०२५

# एसएसआर डॉल्फिन्स, एसके फ्लिपर्स, संघ आघाडीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूना क्लब यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या द पूना क्लब स्विमिंग लीग 2025 स्पर्धेत गटसाखळी फेरीत एसके फ्लिपर्स, एसएसआर डॉल्फिन्स, जेट्स, अडवाणी स्प्लॅश टायटन्स, अद्विक परमार ऑल स्टार्स, रियल रिच या संघांनी आगेकूच केली.



पूना क्लब स्विमिंग पूल या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अ गटात शौर्य चतुर्वेदी, अरुण जोशी, मिहिका मोहिते, तुषार एम, आदित्य एमएस, दीप्ती राजपाल, माईशा जे., रिनिया ओवळेकर यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर एसएसआर डॉल्फिन्स संघाने 375गुणांसह आघाडी प्राप्त केली. तर, रहयान खैराज, रयान संघवी, सुरुधा संघवी, प्रमीत सूद, जयवंत थोरात यांनी केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर एसके फ्लिपर्स संघाने 337गुणांची कमाई केली. तर, जेट्स संघाने 314गुणांसह आगेकूच केली. जेट्स संघाकडून शायनेल पहलानी, सोफिया बेकर, निखिलेश एस यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

## सनसनाटी युवा खेळाडू माया राजेश्वरण हिचे भविष्यासाठी नियोजन

# ज्युनियर ग्रँड स्लॅम स्पर्धेत सहभाग हेच "लक्ष्य"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन संघटनेच्या वतीने आयोजित बिली जीन किंग कप आशिया ओशनिया गट 1 महिला टेनिस स्पर्धेसाठी भारतीय संघात राखीव खेळाडू केवळ 15 वर्षे वयाच्या माया राजेश्वरण हिची निवड झाली आहे.



माया राजेश्वरण म्हणाली की, माझ्या भविष्यकालीन योजनांमध्ये 2025 या वर्षात ज्युनियर ग्रँड स्लॅम स्पर्धेसाठी पात्र ठरणे आणि त्याबरोबरच महिला ग्रँड स्लॅम साठी पात्र ठरणे हे माझे प्राथमिक लक्ष्य आहे. त्याबरोबरच येत्या काही वर्षांत ज्युनियर ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकणे हे माझे मध्यावधी लक्ष्य आहे.

नुकत्याच झालेल्या डब्ल्यूटीए मुंबई ओपन महिला टेनिस स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी बद्दल बोलताना माया म्हणाली की, वाईल्ड कार्ड द्वारा मुंबई ओपन टेनिस स्पर्धेत मिळालेला प्रवेश हा माझ्यासाठी आनंदाचा धक्का होता. खरे म्हणजे यंदाच्या मोसमातील स्पर्धांच्या माझ्या वेळापत्रकात मुंबई ओपन स्पर्धेचा समावेशच नव्हता. परंतु एम एसएलटीएचे व सुंदर अय्यर सरानी वाईल्ड कार्ड द्वारे मला ही संधी दिली. त्यामुळे मी अचानक राष्ट्रीय स्तरावर प्रकाशझोतात आले. त्यामुळे मी त्यांची अत्यंत आभारी आहे. वाईल्ड कार्ड द्वारा प्रवेश मिळाल्यावर ही सुवर्णसंधी असल्याचे मला कळून चुकले. पहिला सामना जिंकल्यावर माझ्या खेळाबद्दल मला आनंद झाला होता. परंतु मी समाधानी नव्हते. कारण ज्युनियर ग्रँड स्लॅम स्पर्धेसाठी पात्र ठरणे हे माझे खरे लक्ष्य आहे.

मुंबई ओपन टेनिस स्पर्धेत प्रवेश मिळाल्यामुळे माया राजेश्वरण हीला जगातील अव्वल खेळाडूंशी खेळण्याची संधी मिळाली. माझ्या कारकिर्दीतील या अत्यंत महत्वाच्या टप्प्यात मी ज्युनियर गटातून महिला गटात प्रवेश करत असताना मला मिळालेल्या या संधीमुळे पुढच्या टप्प्यात जाण्यासाठी मला मदत होणार आहे. त्यामुळे मला त्याचा विशेष आनंद वाटला.

बिली जीन किंग कप स्पर्धा पुण्यात होत असल्यामुळे मला विशेष आनंद होत असल्याचे सांगून माया म्हणाली की, हि स्पर्धा भारतात आणि पुण्यात होणे हे स्थानिक खेळाडूंसाठी महत्वाचे ठरेल. अखेर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. मी ज्युनियर स्तरावर भारतासाठी खेळले असले तरी महिला गटासाठी खेळणे हेच मुख्य लक्ष्य होते. आता महिला संघाचा एक भाग असल्याचा मला आनंद वाटत असून ही संधी मला दिल्याबद्दल मी टेनिस संघटनेची आभारी आहे. आम्ही या स्पर्धेत उत्तम कामगिरी असा मला विश्वास वाटतो. पुण्यातील टेनिस प्रेमींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आम्हाला प्रोत्साहन द्यावे असे मी सर्वांना आवाहन करते.

## वरिष्ठ राष्ट्रीय टेनीकवाईट स्पर्धा

# प्रथमेश ढवळे व संजय चेटूले यांना रौप्य पदक



**पुणे :** दि.२५ ते २९ मार्च दरम्यान भुवनेश्वर, ओडीसा येथे संपन्न झालेल्या ४८ व्या वरिष्ठ गट स्पर्धा २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र टेनीकवाईट (रिंगटेनिस) संघातील पुरुष दुहेरी स्पर्धेतील प्रथमेश ढवळे व संजय चेटूले यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला .त्या अगोदर त्यांनी उपांत्य फेरी मधे आंध्रप्रदेश संघातील दुहेरी स्पर्धकांना २०- २२ २२- २१ २१-११ असे हरवत अंतीम फेरीत धडक मारली. अंतीम फेरीतील सामन्यामध्ये तामिळनाडू संघातील दुहेरी स्पर्धकांशी मात्र २१-१७ ,२१- १९ असा पराभव स्वीकारत रौप्यपदक पटकावले. राष्ट्रिय स्पर्धे मध्ये रौप्य पदक मिळविल्याबद्दल महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष .श्री.मोहनदादा जोशी,कार्याध्यक्ष डॉ. विजय दर्डा,सचिव श्री अनिल वरपे कोषाध्यक्ष ॲड मृणाल बांडेबुचे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# पहिल्या पुणे पिकल बॉल लीग स्पर्धेत टस्कर टायटन्स संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पिकल हाऊस एक्स एसबीए यांच्या वतीने आयोजित पहिल्या पुणे पिकल बॉल लीग स्पर्धेत अंतिम फेरीत टस्कर टायटन्स संघाने रेजिंग रायनोज संघाचा 3-2 असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.



कोरेगाव पार्क येथील एनफिल्ड अरेना कोर्टवर सुरू असलेल्या कुमार बिल्डर्स यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभलेल्या या स्पर्धेत चुरशीच्या अंतिम लढतीत टस्कर टायटन्सच्या हणमंत धोत्रे व निपुण खुराणा यांनी रायनोजच्या कुलदीप रुचंदानी व ईशांत रेगे यांचा 15-08 असा पराभव करून संघाचे खाते उघडले. तर, रायनोजच्या मोक्ष जैन व संकेत राज यांनी टायटन्सच्या सागर दिवाण व आशना पेडणेकर यांचा 15-06 असा पराभव करून संघाला बरोबरी साधून दिली. टायटन्सच्या सागर दिवाणने ध्रुव दयालच्या साथीत रमा कुलकर्णी व संदेश मनवार यांचा 15-07 असा पराभव करून संघाला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर रायनोजच्या प्रियल चॅटर्जी व संदेश मनवार यांनी हरजस बाजवा व प्रियांका सूर्तानी यांचा 15-12 असा पराभव करून संघाला 2-2 अशी बरोबरी निर्माण करून दिली. त्यामुळे सामना टाय ब्रेकरमध्ये खेळविण्यात आला. टायब्रेकरमध्ये टायटन्सच्या हणमंत धोत्रे व निपुण खुराणा या जोडीने इशांत रेगे व संकेत राज यांचा 15-13 असा पराभव करून संघाला विजय मिळवून दिला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धा संचालक सुधांशू मेडसीकर, भाव्या मेहता व यश मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले.

# 22 यार्डस क्रिकेट अकादमी संघाची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक 16 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत श्रीकृष्ण मराठे(3-9) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीसह अर्णव सिद(51धावा), अथर्व शिंदे नाबाद(43धावा)यांनी केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर 22यार्डस क्रिकेट अकादमी संघाने पेस ॲथलिटस क्रिकेट अकादमी संघाचा 3 गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली.

व्हिजन क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना पेस ॲथलिटस क्रिकेट अकादमी संघ 49.3षटकात सर्व बाद 247धावाच करू शकला. यात अंगद ठाकूर 77, गुरुमुख मेघावत 58, विराज नांगरे 40 यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. 22यार्डस क्रिकेट अकादमीकडून श्रीकृष्ण मराठे(3-9), भावेश चौधरी(2-44) यांनी अचूक गोलंदाजी केली.



हे आव्हान 22यार्डस क्रिकेट अकादमी संघाने 45.4षटकात 7बाद 248धावा करून पूर्ण केले. यात अर्णव सिद 51, अथर्व शिंदे नाबाद 43, यशराज सोळंकी 35, ओम पवार 33, भावेश चौधरी 26, प्रतीक शिंदे नाबाद 19 यांनी धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.

# आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचे ९ एप्रिलपासून आयोजन

**पुणे :** पुणे क्रिकेट ॲकॅडमी आणि सागर कांबळे स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे तिसऱ्या 'प्रशांतभाऊ शिंदे (पीएस) करंडक' १४ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेचे ९ एप्रिल २०२५ पासून आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघांनी भाग घेतला आहे. ही स्पर्धा स्वारगेट येथील पंडीत जवाहरलाल नेहरू स्टेडियम मैदानावर होणार असून साखळी आणि बाद फेरीमध्ये खेळवण्यात येणार आहे. महाराष्ट्रीय मंडळ ॲकॅडमी, आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी, पुणे पोलिस बॉईज, योगेश इलेव्हन, २२ याडर्स, स्केलअप ॲकॅडमी, पुणे इन्स्टिट्युट ऑफ क्रिकेट (पीआयओसी) आणि क्रिकरायझिंग स्टार ॲकॅडमी (सीएसआर) हे संघ विजेतेपदासाठी झुंझणार आहे. विजेत्या संघाला आणि उपविजेत्या संघाला करंडक आणि मेडल्स् मिळणार आहे. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टीरक्षक तसेच उदयोन्मुख खेळाडू याबरोबरच मालिकेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू याशिवाय प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर आणि फायटर ऑफ मॅच अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.वाईट बोल आणि कलर ड्रेस या फॉरमॅटमध्ये होणाऱ्या स्पर्धेचा सलामीचा सामना महाराष्ट्रीय मंडळ ॲकॅडमी विरुद्ध पुणे पोलीस बॉईज असा रंगणार आहे.

# एमईएस क्लब, मॅव्हरीक्स् बॉईज संघांची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लिजंड्स स्पोर्टस क्लब यांच्यावतीने आयोजित 'सीएसके करंडक' खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेत एमईएस क्लब आणि मॅव्हरीक्स् बॉईज या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.



मुंढवा येथील चंचलाताई कोद्रे स्पोटर्स कॉम्प्लेक्स्च्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत जलदगती गोलंदाज वैभव गोसावी याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे एमईएस क्लबने स्केलअप क्रिकेट ॲकॅडमीचा ४५ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना एमईएस क्लबने १८१ धावांचे लक्ष्य उभे केले. यश बोरामनी (३४ धावा), अजित गव्हाणे (३१ धावा), सागर बिरदावडे (२६ धावा) आणि अदवय सिधये (२१ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचा डाव उभा केला. या लक्ष्याचा पाठलाग करताना स्केलअप क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १३६ धावांवर मर्यादित राहीला. पार्थ दळवी याने ५९ धावांची खेळी केली. वैभव गोसावी याने प्रभावी गोलंदाजी करताना ३२ धावा देत ३ गडी टिपले. सागर बिरदावडे आणि वैभव दरकुंडे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

अखेरच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात आदित्य लोंढे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे मॅव्हरीक्स् बॉईजने पुनित बालन ग्रुपचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना पुनित बालन ग्रुपने हर्ष संघवी याने फटकावलेल्या १०४ धावांच्या खेळीच्या जोरावर १६८ धावा धावफलकावर लावल्या. हे लक्ष्य मॅव्हरीक्स् बॉईजने ७ गडी गमावून पूर्ण केले. अभिनव तिवारी याने ५४ धावांची खेळी केली. यासह आदित्य लोंढे (नाबाद ३४ धावा) आणि देवराज बी. (२२ धावा) यांनी मोक्याच्या क्षणी धावा जमवून संघाचा विजय साकार केला.

## 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्रीय मंडळ, कॉशन्ट्स स्पोटर्ससह

# उत्कर्ष क्रीडा मंच, स्पोटर्स मेनिया विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हॉटफुट स्पोटर्स यांच्या तर्फे आयोजित च्या ९ वर्षाखालील गटामध्ये महाराष्ट्रीय मंडळ एफसी, कॉशन्ट्स स्पोटर्स, उत्कर्ष क्रीडा मंच एफए आणि स्पोटर्स मेनिया या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

बावधन येथील हॉटफुट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये ९ वर्षाखालील गटात युवान लोढा, ओवि औदीक आणि दिवेंश जी. यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर महाराष्ट्रीय मंडळ एफसी संघाने व्हिजन स्पोटर्स ॲकॅडमीचा ३-१ असा पराभव केला. कॉशन्ट्स स्पोटर्स ब संघाने ॲड्रेलाईन स्पोटर्स अ संघाचा २-१ असा निसटता पराभव केला. कॉशन्ट्स संघाकडून अश्मित जोगळेकर आणि विराट पिंपळे यांनी एकेक गोल केला. मल्हार गुजार याने केलेल्या हॅट्रीक गोलांच्या जोरावर उत्कर्ष क्रीडा मंच संघाने फोर लायन्स् एफए ब संघाचा ३-२ असा पराभव केला. फोर लायन्स्कडून अबिर कमाल आणि अहान पवार यांनी गोल केले. स्पोटर्स मेनिया संघाने स्निग्मय एफसी संघाचा ३-१ असा पराभव केला. स्पोटर्स मेनियाकडून मोहम्मद खान याने दोन तर, अयांश पवार याने एक गोल केला.



१५ वर्षाखालील गटामध्ये प्रणव बाळ आणि अभिराज नायर यांनी केलेल्या गोलांमुळे लौकिक फुटबॉल ॲकॅडमीने मेट्रोसिटी एफएचा २-० असा पराभव केला. या गटामध्ये स्पोटर्स मेनिया, स्निग्मय एफसी, बीएफसी ब्ल्युज् ऐलिट आणि फाल्कन्स् एफए या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

#रा